CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ३ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८७ | पाने १२ | किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### ४ मे रोजी उघडणार बद्रीनाथ मंदिराचे कपाट

**टिहरी गढवाल** : वसंत पंचमीला टिहरी राजदरबार नरेंद्रनगर येथे झालेल्या गणेशपूजेसह जगप्रसिद्ध बद्रीनाथ धामचे कपाट उघडण्याची तारीख जाहीर करण्यात आली आहे. ४ मे रोजी



सकाळी ६ वाजता विधिवत पूजा करून मंदिराचे कपाट सामान्य भाविकांसाठी उघडले जातील. २२ एप्रिल रोजी भगवान बद्रीचा तिळाच्या तेलाने महाअभिषेक केला जाईल. त्याच दिवशी, राज दरबार येथून कलश यात्रा सुरू होईल. यासोबतच चारधाम यात्रा देखील औपचारिकरीत्या सुरू होईल. रविवारी, नरेंद्रनगर येथील राजदरबारात वसंत पंचमीनिमित्त, गणेश, पंचांग आणि चौकीपूजनानंतर राजपुरोहित आचार्य कृष्ण प्रसाद उनियाल यांनी महाराजा मनुज्येंद्र शाह यांच्या जन्मकुंडलीचा अभ्यास केल्यानंतर आणि ग्रहांची स्थिती पाहून भगवान श्री बद्रीनाथ मंदिराचे कपाट उघडण्याची तारीख जाहीर केली. ■

### 'त्या' आठ नक्षलवाद्यांवर होते १६ लाखांचे बक्षीस

**बिजापूर** : छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात रविवारी झालेल्या चकमकीत ठार झालेल्या आठ नक्षलवाद्यांवर एकूण १६ लाख रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. गंगलूर पोलिस ठाणे हद्दीतील तोडका गावाजवळील जंगलात नक्षलविरोधी कारवाईदरम्यान प्रतिबंधित माओवादी संघटनेच्या नक्षलवाद्यांना गोळ्या घालून ठार करण्यात आले होते. राज्य पोलिस दलाच्या जिल्हा राखीव रक्षक दलाचे दोन जवान यात जखमी झाले. ठार केलेल्या नक्षलवाद्यांपैकी, माओवाद्यांच्या पश्चिम बस्तर विभागाच्या अंतर्गत गंगलूर क्षेत्र समितीचा सदस्य कमलेश नीलकंठ याच्या शिरावर पाच लाख रुपयांचे बक्षीस होते. गंगलूर एलओएसमधील ताती कमलू आणि मंगल ताती अशी ओळख पटवण्यात आलेल्या दोघांवर प्रत्येकी तीन लाख रुपयांचे बक्षीस होते. लच्छू पोटाम, शंकर टाटी, राजू टाटी, विज्जू पोडाम आणि सन्नू टाटीवर प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस होते.

### महाकुंभ चेंगराचेंगरी प्रकरणी आज सुनावणी

**नवी दिल्ली** : प्रयागराज महाकुंभात झालेल्या चेंगराचेंगरीप्रमणी दाखल जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. न्यायालयाच्या संकेतस्थळानुसार ही जनहित याचिका ३ फेब्रुवारीसाठी सूचीबद्ध करण्यात आली आहे. उत्तरप्रदेशमधील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात २९ जानेवारी रोजी झालेल्या चेंगराचेंगरीत किमान ३० जणांचा मृत्यू आणि ६० जण जखमी झाले होते. या दुर्घटनेला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. सर्व राज्यांना प्रयागराजमधील त्यांच्या सुविधा केंद्रांमध्ये भाविकांना सुरक्षा उपाय आणि मार्गदर्शक तत्त्वांबद्दल मूलभूत माहिती देण्याचा निर्देश देण्यात यावा, अशी मागणी करणारी जनहित याचिका वकील विशाल तिवारी यांनी न्यायालयात दाखल केली होती.

### ३१.७५ लाखांचा प्रतिबंधित कफ सिरफचा साठा जप्त

**मुंबई** : ठाणे जिल्ह्यातील नारपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीतून पोलिसांच्या गुन्हे शाखेने प्रतिबंधित कफ सिरफचा साठा जप्त करून पाच आरोपींना अटक केली. सर्व आरोपींचे वय २४ ते ४५ वर्षे आहे. जप्त केलेल्या कफ सिरफची किंमत ३१.७५ लाख रुपये आहे.

विश्वचषकासह विजयाचा आनंद साजरा करताना भारतीय महिला क्रिकेटपटू



# विश्वविजयी भारतीय महिला

**◆ क्वालालम्पूर, २ फेब्रुवारी**

रविवारी येथे अंतिम सामन्यात निकी प्रसादच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा ९ गड्यांनी पराभव करून सलग दुसऱ्यांदा १९ वर्षांखालील महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक जिंकला. भारताने ५२ चेंडू शिल्लक ठेवत ९ गड्यांनी दणदणीत विजय नोंदवला. या विजयाबरोबरच भारत एकही सामना न गमावता स्पर्धा जिंकणारा पहिला संघ ठरला.

दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ८२ धावांत गुंडाळल्यानंतर भारताने ११.२ षटकांत १ बाद ८४ धावा काढून आपले विश्वविजेतेपदाचे स्वप्न साकार केले. अष्टपैलू त्रिशा गोंगडी विजयाची शिल्पकार ठरली असून तिलाच सामन्यातील व स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

त्रिशाने अंतिम सामन्यात १५ धावांच्या मोबदल्यात सर्वाधिक ३ बळी टिपले व ३३ चेंडूंत नाबाद ४४ धावांची खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. त्रिशाने या स्पर्धेत एकूण सर्वाधिक ३०९ धावा काढल्या व सर्वाधिक ७ बळी घेतले. (वृत्तसंस्था)

# लोकांनी लोकांसाठी केलेला अर्थसंकल्प

### निर्मला सीतारामन् यांचे प्रतिपादन

**◆ नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

अब्राहम लिंकन यांच्या प्रसिद्ध वाक्याचा वापर करीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी, लोकांनी लोकांसाठी केलेला हा अर्थसंकल्प असल्याचे रविवारी म्हटले. मध्यमवर्गासाठी करकपात करण्याच्या कल्पनेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पूर्ण पाठिंबा होता. पण, नोकरशहांना पटवून देण्यासाठी वेळ लागला, असे सीतारामन् म्हणाल्या.

आम्ही मध्यमवर्गाचा आवाज ऐकला. ते प्रामाणिक करदाते असूनही, आपल्या अपेक्षा पूर्ण न झाल्याबद्दल तक्रार करीत होते, असे सीतारामन् यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.



महागाईसारख्या घटकांचा प्रभाव मर्यादित करण्यासाठी सरकारने अधिक प्रयत्न करावेत, अशी प्रामाणिक आणि अभिमानी करदात्यांची इच्छा असल्याने त्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी मार्ग शोधण्याचे काम सीतारामन् यांच्याकडे सोपवले होते. नरेंद्र मोदींनी कर सवलतीसाठी तत्काळ सहमती दर्शवली असली, तरी कल्याणकारी आणि इतर योजना पूर्ण करण्यासाठी महसूल संकलन सुनिश्चित करण्याची जबाबदारी असलेल्या अर्थ मंत्रालय आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या अधिकाऱ्यांना पटवून देणे थोडे कठीण होते, असे सीतारामन् म्हणाल्या.

पंतप्रधानांनी थोडक्यात सांगितले की, हा जनतेचा अर्थसंकल्प आहे, लोकांना हवा असलेला अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पाचे मूळ स्वतःच्या शब्दात वर्णन करण्यास सांगितले असता सीतारामन् म्हणाल्या, अब्राहम लिंकनच्या शब्दात लोकशाही म्हटल्याप्रमाणे हा लोकांचा, लोकांसाठीचा अर्थसंकल्प आहे.

**करकपातीवर सुरू होते काम**

नवीन दरांमुळे मध्यमवर्गीयांचे कर लक्षणीयरीत्या कमी होतील आणि त्यांच्या हातात अधिक पैसे राहतील. यामुळे घरगुती वापर, बचत आणि गुंतवणूक वाढेल. या मोठ्या घोषणेमागील विचार स्पष्ट करताना सीतारामन् म्हणाल्या की, करकपातीवर काही काळापासून काम सुरू होते.

**नवीन कायदा येणार**

त्यातील एक कल्पना म्हणजे प्रत्यक्ष कर सोपे आणि त्याचे अनुपालन सोपे करण्याची होती. जुलै २०२४ च्या अर्थसंकल्पात यावर काम करणे सुरू केले आणि आता नवीन कायदा येत आहे, जो भाषा सोपी करेल, अनुपालनाचा भार कमी करेल आणि थोडाफार वापरकर्ता अनुकूल राहील, असे सीतारामन् म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

दिल्ली विधानसभा निवडणूक

# आज संपणार प्रचार

**◆ नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

७० सदस्यीय दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार सोमवारी संपत आहे. दिल्लीत बुधवार ५ फेब्रुवारीला मतदान होत असून, शनिवार ८ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

दिल्लीत आप, भाजपा आणि काँग्रेस या तीन राष्ट्रीय पक्षांत लढत होत आहे. या निवडणुकीत भाजपासमोर २७ वर्षांचा सत्तेचा, तर काँग्रेससमोर १२ वर्षांचा राजकीय वनवास संपवण्याचे आव्हान आहे. आपसमोर आपली १२ वर्षांपासून असलेली सत्ता कायम ठेवण्याचे मोठे आव्हान आहे.

आप सर्व म्हणजे ७० जागा स्वबळावर लढवत आहे. भाजपाने जदयु आणि लोजपा या बिहारमधील आपल्या मित्रपक्षांसाठी दोन जागा सोडल्या व उर्वरित ६८ जागा लढवत आहे.

काँग्रेसही सर्व जागा लढवत आहे. २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आपले खातेही उघडता आले नव्हते. त्यामुळे यावेळी काँग्रेससमोर खाते उघडण्याचे आव्हान आहे.

भाजपातर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी प्रचार केला. (तभा वृत्तसेवा)

### वक्फवरील जेपीसीचा अहवाल आज लोकसभेत

**◆ नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

वक्फ (दुरुस्ती) विधेयकावरील संसदीय संयुक्त समितीचा (जेपीसी) अहवाल सोमवारी लोकसभेत सादर केला जाणार आहे. लोकसभा कामकाजाच्या यादीनुसार, जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल, भाजपा खासदार संजय जयस्वाल यांच्यासोबत जेपीसीचा अहवाल सादर करतील.

जेपीसीसमोर दिलेल्या पुराव्यांचे रेकॉर्डही ते सादर करणार आहेत. हा अहवाल ३० जानेवारी रोजी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना सादर करण्यात आला. तथापि, विरोधी पक्षनेत्यांनी अहवालावर त्यांच्या असहमत नोट्स जारी केल्या. जेपीसीने यापूर्वी वक्फ विधेयक १९९५ ला १४ कलमे आणि कलमांमध्ये २५ सुधारणांसह मंजुरी दिली होती. (वृत्तसंस्था)

# मी जे बोलतो, तेच करतो

### पंतप्रधान मोदींनी दिली दिल्लीकरांना 'गॅरंटी'

**◆ नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**



मी जे काही बोलतो, ते करीत असतो. खोटी आश्वासने देणार नाही. दिल्लीत आपदावाल्यांनी मागील दहा वर्षांपासून फक्त खोटी आश्वासने देऊन सत्तासुख उपभोगले. मात्र, भाजपा सर्वसामान्यांच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी काम करीत असते. शनिवारी संसदेत सादर झालेला अर्थसंकल्प सर्वसामान्यांसाठीच आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी येथे केले.

आरके पुरम येथे आयोजित जाहीर सभेला ते संबोधित करीत होते. यावेळी मोदी यांनी आम आदमी पार्टी आणि पूर्वीच्या काँग्रेसी सरकारांवर जोरदार हल्ला चढविला. नेहरूंच्या काळात जर तुमची १२ लाख रुपयांची कमाई असती, तर त्यावर एक चतुर्थांश कर आकारला असता, असे मोदी यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

**यावेळी भाजपाच सत्तेत येणार**

यावेळी दिल्लीत भाजपा सरकार बनणार आहे. येथील जनता मागील ११ वर्षांपासून 'आपदा' सहन करीत आहे. आता त्यांनी भाजपाला सेवेची संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. आज मी तुम्हाला वचन देतो की, तुमच्या प्रत्येक समस्या दूर करण्यासाठी सातत्याने काम करणार आहे. आपल्याला असे सरकार आणायचे आहे, जे फक्त जनतेची सेवा करेल, बहाणेबाजी किंवा नौटंकी नाही, असे मोदी म्हणाले. ■

# दहावी, बारावी नवनीत पुस्तकाच्या झेरॉक्स काढून विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**◆ साखरखेर्डा, २ फेब्रुवारी**

येथील एका झेरॉक्स सेंटरवर नवनीत पब्लिकेशन्सच्या १० वी व १२ वीच्या पुस्तकाच्या मायक्रो झेरॉक्स प्रती काढून विकत असताना एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याजवळून साहित्य जप्त केले आहे.

साखरखेर्डा येथील लक्ष्मी झेरॉक्स सेंटरवर नवनीत प्रकाशनच्या १० वी व १२ वीच्या गाईडच्या मायक्रो झेरॉक्स करून विकत असल्याची माहिती प्रकाशनचे प्रतिनिधी शंकर देवलाल परदेशी यांना मिळाली. लक्ष्मी झेरॉक्स सेंटरवर भगवान विष्णू कांबळे हा ऑनलाईनवरून १० वी व १२ वीच्या नवनीत पुस्तकाच्या मायक्रो झेरॉक्स काढून विकत असल्याने साखरखेर्डा येथे पुस्तक विक्रीवर परिणाम झाला होता.

१ फेब्रुवारीला शंकर परदेशी यांनी साखरखेर्डा पोलिस स्टेशनमध्ये येऊन तक्रार दाखल केली असता, पोलिस हेडकॉन्स्टेबल प्रवीण गवई यांनी झेरॉक्स सेंटरवर धाड टाकली. तेथे नवनीत पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती आढळून आल्या. त्या जप्त करण्यात आल्या.

याच महिन्यात १० वी बोर्डाची परीक्षा सुरू होत आहे. लक्ष्मी झेरॉक्स सेंटर हे तीनही परीक्षा केंद्रांच्या जवळ आहे. नवनीत गाईडची मायक्रो झेरॉक्स काढून मुले परीक्षा काळात कॉपी करण्यासाठी त्याचा उपयोग करतात. पेपर संपल्यानंतर शाळेच्या परिसरात या मायक्रो झेरॉक्स गाईड विद्यार्थी फेकून देतात. त्यामुळे साखरखेर्डा परीक्षा केंद्रावर काय चालते, हे कचऱ्याच्या ढिगावरून दिसून येते.

मागील वर्षी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक नरवाडे यांनी प्रत्येक परीक्षा खोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला होता. तो अंमलातही आणला होता. त्यामुळे संस्थाचालक आणि शिक्षक यांच्यात खळबळ उडाली होती. (तभा वृत्तसेवा)

# मंगळवेढ्यात मेटल, भांडी दुकानाला आग



### अचानक लागलेल्या आगीत तब्बल ७० लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२ फेब्रुवारी -**

शहरातील दामाजी मंदिर परिसरात असलेल्या अंबिका मेटल अँड स्क्रॅप भांडी दुकानास अचानक लागलेल्या आगीमुळे ७० लाख रुपयांचे नुकसान झाले असून या जळीत घटनेची मंगळवेढा पोलिसात नोंद झाली आहे.

यातील खबर देणारे साहेबराव उगाडे यांचे दामाजी मंदिर परिसरात अंबिका मेटल अँड स्क्रॅप हे दुकान असून दि.२६ जानेवारी रोजी रात्री ११.३० च्या सुमारास ते घरी झोपले असताना गल्लीत राहणारे सचिन मुरडे याने घरी येऊन सांगितले की तुझ्या भांड्याच्या दुकानाला आग लागली आहे.त्यावेळी त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता दुकानाला आग लागलेली दिसली. तसेच आजूबाजूचे लोक जमले होते. तेथे पोलिसही आले होते.आग ही प्रचंड स्वरूपात असल्याने त्यांनी माजी नगरसेवक अजित जगताप यांना फोन करून याबाबतची माहिती दिल्यावर मंगळवेढा नगरपरिषदेचे अग्निशामक दल पंधरा मिनिटात दाखल होऊन आग विझविण्यात आली. तदनंतर जळीताची पाहणी केल्यानंतर जवळपास ७० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आला. दरम्यान,उगाडे यांनी दुकानाच्या पाठीमागील बाजूस जाऊन पाहिले असता दुकानाच्या पत्र्याच्या बाजूला वायर जळालेली दिसली. तेथे जयकुमार गोरे यांचे मोटर रिवायडिंग दुकान असून या वायरमुळेच आग लागल्याचा संशय उगाडे यांचा असल्याने या प्रकाराबाबत चौकशी होण्यास पोलिसांकडे त्यांनी दिलेल्या खबरमध्ये विनंती केली आहे.

केसरीच्या फेब्रुवारी-मार्च सहली म्हणजे भरपूर आनंदाची हमी!
गर्दी कमी, किंमती कमी, सिझन मस्त आणि मौज-मजा जास्त!




काश्मीरचा हिमवर्षाव की राजस्थानचं मोहक वातावरण? युरोपचं ट्युलिप की जपानचं चेरी ब्लॉसम?
जगभरात कुठेही चला. बोनान्झासह विविध ऑफर्सचा लाभ घेत पसंतीची सहल बुक करा आणि हजारो वाचवा.

अनेक डिस्काऊंट्स | मेगा डिस्काऊंट* | बोनान्झा प्राईस* | एक्स गेस्ट* | 6+ ग्रुप* | सिनीअर सिटीझन* | लास्ट मिनीट डिल्स* | 2-18 वर्षे स्टुडंट स्पेशल

**स्नो स्पेशल सहली** (टूर कोड दिवस)
KF07 पॅनोरॅमिक काश्मीर वैष्णोदेवी
NR07 दार्जिलिंग गँगटोक
KC08 अमेझिंग काश्मीर वैष्णोदेवी
Y308 शिमला मनाली - हनिमून
HG08 डलहौसी धरमशाला अमृतसर
NF08 नैनिताल मसूरी कॉर्बेट पार्क
KB09 ऑल ऑफ काश्मीर रॅडिसनसह
NO11 ऑल ऑफ सिक्कीम दार्जिलिंग
NT12 अमेझिंग नॉर्थ ईस्ट

**ट्युलिप - चेरी ब्लॉसम** (टूर कोड दिवस)
JF08 जपान चेरी ब्लॉसम
JK09 जपान कोरिया
EQ09 पॅरिस ब्रुसेल्स ॲमस्टरडॅम गिथॉर्न लुक्झेम्बर्ग
P810 युरोप लेक लुगानो
P712 इमेजेस ऑफ युरोप
E712 एंटायसिंग युरोप
E614 बेस्ट ऑफ युरोप
E416 वंडर्स ऑफ युरोप
E122 ऑल ऑफ युरोप

**इझी व्हिसा सहली** (टूर कोड दिवस)
FT06 थायलँड
MI06 मॉरिशस
FY07 फुकेत क्राबी बँकॉक
FH07 हाँगकाँग शेन्झेन मकाऊ
FD07 बेस्ट ऑफ व्हिएतनाम
MS08 श्रीलंका
NP08 नेपाळ
NZ10 भूतान
FV10 व्हिएतनाम कंबोडिया

**वुमेन्स स्पेशल माय फेअर लेडी** (टूर कोड दिवस)
L906 नैनिताल कॉर्बेट पार्क
L207 काश्मीर
L407 लखनौ अयोध्या प्रयागराज वाराणसी
LH07 लेह लडाख
LP08 नेपाळ
LJ08 जपान चेरी ब्लॉसम
L108 शिमला मनाली
LL09 लेह लडाख कारगिल
LE14 युरोप

**इंटरनॅशनल सहली** (टूर कोड दिवस)
WS05 सिंगापूर
F806 सिंगापूर मलेशिया
D107 दुबई अबूधाबी
JS08 क्लासिक साऊथ कोरिया
AI08 फन फिल्ड ऑस्ट्रेलिया
VE09 इजिप्त हूरघडा
F210 सिंगापूर थायलँड मलेशिया
AN11 ऑल ऑफ न्यूझीलँड
EU13 इजिप्त ग्रीस टर्की

**लास्ट चान्स सहली** (टूर कोड दिवस)
WA04 अमृतसर
WX05 पुरी भुवनेश्वर चिलिका
SM05 अंदमान स्वराजद्वीप
B506 मुन्नार पेरियार अलेप्पी
RC07 राजस्थान मारवाड
RF07 राजस्थान मेवाड माऊंट अबू
SF08 केरळ कन्याकुमारी
SC10 केरळ कन्याकुमारी गुरुवायूर
OS12 श्रीकृष्ण चरित्र यात्रा

PZ07 अझरबैजान जॉर्जिया 1,55,000*
VU07 ट्युनिशिया स्पेशल 2,10,000*
PR08 रशिया मुर्मन्स्क नॉर्दर्न लाईट्स 2,40,000*
अधिक माहितीसाठी QR स्कॅन करा
T & C Apply*

9167 835 071 | 1800 266 1100 | सोमवार ते शनिवार 10 ते 7. रविवार 6 पर्यंत.
पुणे बाणेर 020-66465555, 020-69101234 | मुंबई 022-61744100 | ठाणे 022-69721100
वाशी 022-69462222 | नाशिक 0253-6914444 | नागपूर 0712-6921717 | कोल्हापूर 0231-2533222
पुणे निगडी 9890941767 | पिंपळे सौदागर 9049989533 | सातारा रोड 7028012434 | भोसरी 9922151222
औंध 9011948181 | हडपसर 9569300300 | सोलापूर 9689913325 | सोलापूर 9890186186 | अहिल्यानगर 9823140901
अहिल्यानगर 7350553131 | बारामती 9822848988 | सातारा 9922992382 | सांगली 9421128340 | अकलुज, महाबळेश्वर, पंढरपूर, बार्शी
KESARI.in

## संक्षिप्त वृत्त



### दहिटणे आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन

सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

राष्ट्रीय आरोग्य अभियान सोलापूर महानगरपालिका अंतर्गत दहिटणे आरोग्यवर्धिनी केंद्राचे आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. किरण देशमुख, महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अतिश बोराडे, शहर लेखा व्यवस्थापक सिद्धेश्वर बोरगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. नितेश क्षीरसागर, डॉ. ज्योती धाराशिवे, माजी नगरसेवक अविनाश पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शेळगी नागरी आरोग्य केंद्रातील कर्मचारी वृंद व सर्व आशा स्वयंसेविका उपस्थित होते. दहिटणे आरोग्यवर्धिनी केंद्रात रक्त, लघवी व इतर तपासणी मोफत करण्यात येणार आहेत. हे केंद्र संध्याकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध राहणार आहे.



### समता विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-

येथील मागास समाजसेवा मंडळ संचलित समता मराठी विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ अशोक म्हमाणे यांच्या हस्ते पार पडला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जयवंत हक्के होते. याप्रसंगी शाळेतील इयत्ता पहिली ते चौथी मधील विद्यार्थ्यांनी विविध गुण दर्शनातून आपली कला सादर केली. या कार्यक्रमातच विविध स्पर्धा परिक्षा आणि इतर कलांमध्ये यशस्वी ठरलेल्या आणि पारितोषिक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही सन्मान पत्र आणि सन्मान चिन्ह देऊन कार्यकमाचे अध्यक्ष अशोक म्हमाणे यांच्या हस्ते यांच्या उपस्थित गौरव करण्यात आला. प्रास्तविक समिना कौसर यांनी तर सूत्रसंचालन ज्योती वाघमारे यांनी केले उपस्थितांचे आभार समीना मुजावर यांनी मानले या कार्यक्रमाला सुजाता डोंगरे संतोष रजपूत सुनिता पवार मिनाक्षी राठोड, चारूशिला म्हमाणे, मिनाक्षी राठोड, लता क्षिरसागर, अनिता शिंगाडे, रामराव चव्हाण, अनिल चव्हाण उपस्थित होते.



### शिवदारे महाविद्यालयात शेतीविषयक हवामान अंदाजावर चर्चासत्र

सोलापूर दि.२ फेब्रुवारी-

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ सोलापूर व कै. वि.गु. शिवदारे प्रतिष्ठान सोलापूर, व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने शेतीविषयक हवामान अंदाज या विषयासंदर्भात विशेष चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. जी आणि प्रमुख प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई शास्त्रज्ञ सुनील कांबळे यांनी आपल्या चर्चासत्रात शेतकऱ्यांना संबोधित करताना हवामानाविषयी असलेले समज गैरसमज यांची चर्चा केली. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे चेअरमन राजशेखर शिवदारे अध्यक्षस्थानी होते. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ विश्वस्त प्रा.बी.व्ही.शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती. वाले, अंजली तिवारी, डॉ.आर. वाय. पाटील, प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे हे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.डॉ. शुभदा उपासे शिवपुजे यांनी केले. आभार प्राध्यापिका वैशाली वराडे यांनी मानले.



### कृतिशील शिक्षिका पुरस्काराने मंदाकिनी जगताप-पाटील सन्मानित

सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने देण्यात येणारा कृतिशील शिक्षिका पुरस्कार मार्डी येथील महात्मा फुले प्रशालेतील शिक्षिका मंदाकिनी जगताप-पाटील यांना देण्यात आला. माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी गुरुनाथ वांगीकर, प्राचार्य शंकर वडणे, प्राचार्य सुजित इनामदार, पर्यवेक्षक गंगाधर राजमाने व प्रशालेतील सर्व शिक्षक चंद्रकांत शिंदे, संतोष उमरदंड, प्रा. शाहुराजे पाटील, स्वप्नाली राऊत, राजेश साकला, कमलाकर जाधव, स्मिता भडोळे, धनश्री मार्तंडे, हिरालाल पवार, पूजा कोरे उपस्थित होत्या. मंदाकिनी जगताप-पाटील या मार्डी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष मनोहर जगताप यांच्या कन्या व छत्रपती संभाजीराजे तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व स्थापत्य अभियंता संभाजी पाटील यांच्या पत्नी आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अविनाश मार्तंडे, माजी जिल्हा परिषद सदस्या ज्योती मार्तंडे, उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, शशिकांत मार्तंडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## आठ हजार भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

### गणेश जयंतीनिमित्त तळे हिप्परगा येथे विविध कार्यक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-



श्री मशरूम गणपती जन्मोत्सवानिमित्त तळे हिप्परगा येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी माजी खासदार डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी तसेच सोलापूर जिल्हा सरकारी वकील तथा सीबीआयचे विशेष सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांचा हस्ते महाआरती, गुलाल व म हाप्रसाद वाटप करण्यात आले.

याप्रसंगी ७ ते ८ हजार भक्तांनी महाप्रसादचा लाभ घेतला. पहाटे ४ ते ६ पंचामृत महाभिषेक षोडशोपचार पूजा ६ ते ७ सुवर्ण अलंकार पूजा ७ वाजता ध्वजारोहण ७: १५ वा नित्य आरती नंतर श्री गणेशास पाळण्यात स्थानपन्न करणे ९ ते १२ अथर्वशीर्ष स्व:हाकार गणेश भजन दुपारी १२ वा. महा आरती जन्मोत्सव, गुलालोत्सव, पाळणा, अन्नकूट दुपारी १२:३० वाजता महानैवाद्य १२:३० ते ६:०० महाप्रसाद वाटप ६ ते ८ हरिपाठ सायंकाळी ८:३० वाजता महाआरतीने कार्यक्रमाची सांगता तुळजापूरचे नगराध्यक्ष आनंद कंदले यांनी मंदिरात मंदिर फूल सजावट सेवा करून श्री चरणी अर्पण केली. यावेळी आ. राणाजगजीतसिंह पाटील, राजशेखर हत्ती, रूद्रमणी हीरेमठ उपस्थित होते. यावेळी मंदिराच्या वतीने सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. वरील सर्व कार्यक्रमाचे आयोजन मंदिराचे पुजारी धनंजय पतंगे, संजय पतंगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष राजू हौशेट्टी, बाबूराव शितोळे, अमोल तांबे, विशाल सुरवसे, निलेश स्वामी, अर्जुन सुरवसे, विलास माळी सागर भंडारी, कुमार सुरवसे, दीपक देशमुख, गणेश हौशेट्टी, नागराज हौशेट्टी आदींनी परिश्रम घेतले. आभार ईश्वर पतंगे, भैया पतंगे यांनी मानले.



### अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांचा मनसे सोलापूरच्या वतीने सत्कार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-

महाराष्ट्रातील ख्यातनाम वन्यजीव अभ्यासक व निसर्ग लेखक तसेच अनेक पद आणि पुरस्कारांनी सन्मानित झालेले सोलापूरचे सुपुत्र असलेले अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना केंद्र सरकारच्या वतीने पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. याप्रसंगी सोलापूरचे मनसे जिल्हा अध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा मतदार संघ अध्यक्ष प्रशांत इंगळे, शिक्षक सेनेचे राज्य सरचिटणीस जयवंत हक्के, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष संतोषकुमार घोडके, मनसे जिल्हा सचिव रोहित कलशेट्टी, विशाल गुजले, सागर जाडगी उपस्थित होते.



### कला, सांस्कृतिक स्पर्धेत दमाणी अंधशाळेच्या विद्यार्थ्यांचे यश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

भैरूरतन दमाणी अंधशाळा निवासी शाळेतील आठ विद्यार्थ्यांनी लाड कारंजा जिल्हा वाशिम येथे राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र आयोजित सांस्कृतिक शालेय कला व क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केले आहे. यामध्ये काव्यवाचन स्पर्धा प्रथम क्रमांक सना कुरेशी, वक्तृत्व स्पर्धा प्रथम क्रमांक श्वेता माने देशमुख, इतर विद्यार्थ्यांचे स्पर्धेतील क्रमांक पुढीलप्रमाणे काव्यवाचन स्पर्धा तृतीय श्वेता माने-देशमुख, वक्तृत्व स्पर्धा तृतीय रोहित कुंभार, मनाचे श्लोक उत्तेजनार्थ दोन शौर्या करकमकर, कथाकथन स्पर्धा तृतीय श्रीनिवास चव्हाण, सुगम संगीत गायन तृतीय क्रमांक अल्कमर खान. या सर्व विजेता विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे व सचिव संतोष भंडारी तसेच अध्यक्षा जानवी माखीजा यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे, केतकी रानडे, रंजन पंचवारकर, राम चौधरी यांनी मार्गदर्शन केले तर संतोष गव्हाणकर, निवृत्ती जगताप, अर्चना करकमकर व व्यंकट कदम यांनी विद्यार्थ्यांची योग्य ती सेवा केली.

### जीबीएस आजाराच्या अनुषंगाने अन्नसुरक्षेची काळजी घ्या : सहाय्यक आयुक्त देसाई

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-

पंढरपूर येथे दि. २ ते १२ फेब्रुवारी माघ वारी सुरु होत आहे. यात्रा कालावधीमध्ये सर्व हॉटेल चालक व अन्न विक्रेते यांनी ग्राहकांना विना भेसळ अन्नपुरवठा करावा तसेच पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करावे, असे निर्देश अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई यांनी दिले. यात्रा कालावधीमध्ये व गर्दीच्या ठिकाणी सर्व अन्न व्यावसायिक जसे की, हॉटेल, रेस्टॉरंट, हातगाडे, फिरते विक्रेते, ज्युस सेंटर, स्थायी व अस्थायी स्टॉल इत्यादींनी खाली दिलेल्या सुचनांचे पालन करून ग्राहकांना स्वच्छ, निर्भेळ, सकस, ताजे अन्न पदार्थांची विक्री करण्यात यावी. अन्न पदार्थ बनवताना स्वच्छ वातावरणात व स्वच्छ जागेमध्ये तयार करावेत, तयार अन्नपदार्थ हे नेहमी झाकून ठेवलेले असावेत. अन्न पदार्थ व इतर खाद्यपदार्थ खरेदी करताना परवानाधारक नोंदणीधारक आस्थापना कडूनच खरेदी करावेत अशा विविध सुचनांचा समावेश आहे. यात्रा कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही, तसेच जीबीएस आजाराच्या अनुषंगे अन्न सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घ्यावी याबाबत सर्व नागरिकांनी व अन्न व्यावसायिकांनी काळजी घेऊन प्रशासनास सहकार्य करण्यात यावे, असे आवाहन देसाई यांनी केले.



### लैंगिक छळ रोखण्यासाठी प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कार्यालयांमध्ये महिलांचा कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ बद्दल जनजागृती करण्यासाठी तसेच ते प्रकार रोखण्यासाठी महापालिकेच्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना एकदिवसीय कार्यशाळेत प्रशिक्षण देण्यात आले.

महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण, जनजागृती करण्यास तसेच अधिकारीव कर्मचाऱ्यांनाकायद्याविषयीमाहितीदेण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. कॉन्सिल हॉल येथे झालेल्या कार्यशाळेचे उद्घाटन अँड. श्रेया कालेकर, अँड. रेणुका जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले या अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी मुख्य लेखा परीक्षक रुपाली कोळी, सहायक आयुक्त अनिता मगर, विशाखा समिती अध्यक्षा नगर अभियंता सारिका आकूलवार, आरोग्य अधिकारी राखी माने, सचिव ओमप्रकाश वाघमारे, सदस्य संध्या भाकरे, तेजस्विता कासार आदी उपस्थित होते. यावेळी आयुक्त शितल तेली-उगले, अँड. कालेकर, अँड. जोशी यांनी मार्गदर्शन केले. महिलांचा लैंगिक छळाविषयी तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रारीचे निराकरण योग्य पद्धतीने कशाप्रकारे केले जावे. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होवू नये, याकरिता कशाप्रकारे प्रतिबंध करता येईल, त्याचे प्रशिक्षण दिले.

## जयभवानी संकुलात स्नेहसंमेलन उत्साहात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

सोलापूर शहरात महापालिकेच्या जयभवानी प्रशाला, मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक २९ शाळा आणि मनपा कन्नड वारदमड्डी शाळा यांचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले.

यामध्ये इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंतच्या २४ बहारदार गाण्यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक राजकुमार पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकांत गायकवाड उपस्थित होते. यावेळी स्कॉलरशिप मिळविल्याबद्दल किरण जमादार व नॅशनल कराटे स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल सिद्धार्थ गायकवाड या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शीतल बंदपट्टे, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ मनपा सोलापूर अध्यक्ष दत्तात्रय चौघुले, शिक्षक सेना अध्यक्ष राजीव क्षीरसागर, मनपा शाळा २८ केंद्रीय मुख्याध्यापक कृष्णपरमेश्वर सुतार, मनपा शाळा क्र. २५ च्या मुख्याध्यापिका रंजना केंगले, संभाजीराव शिंदे अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्या स्मिता घोणे, कांबळे,



हनुमंत लंगोटे, प्रदीपसिंह ठाकूर, धोंडू केंगले, बालाजी लोकरे, शंकर नरहरे, बाळासाहेब जगताप, महादेव चौरे, गणेश घनवटे, बसवराज माळी, वाघमोडे, शावादे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जय भवानी प्रशालाचे मुख्याध्यापक हरिदास झाडकर, मनपा मुलांची शाळा क्रमांक २९ चे मुख्याध्यापक नवनाथ माळी, मनपा कन्नड भारत मध्यच्या मुख्याध्यापिका अँटमनी, तसेच शिक्षक अरुण डोके, नरसगोंडे, अविनाश हिंगणे, असारेड्डी सर, श्रीमती बायस, मंगल शिंगे, गोपाळकर, शिंदे, यादवें संभाजीराव शिंदे यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन ऐश्वर्या गवळी व सृष्टी राजोळ यांनी केले व प्रास्ताविक झाडकर यांनी केले तसेच आभार नवनाथ माळी यांनी मानले.

## संक्रातीचं वाण म्हणून दिले रोपे

### नरोटेवाडीच्या सरपंचपत्नीचा उपक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

समृद्ध व आनंदी जीवनासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक असुन तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्षसंवर्धन काळाची गरज आहे. पर्यावरण तज्ञांच्या मते वृक्षलागवड व संगोपन ही प्रत्येक नागरीकांची जबाबदारी आहे. तरच भविष्यातील पर्यावरण -हासाचे संकट आपण टाळू शकणार आहोत हळदीकुंकू समारंभात वाण म्हणून दिलेल्या झाडांच्या रोपांचे योग्य संगोपन करा, अशी भावना विकासरत्न दिलीपराव माने विकास सेवा सोसायटीच्या संचालिका प्रियंका



भगत यांनी व्यक्त केली.

उत्तर सोलापूर पत्रकार संघाच्या कार्यक्रमात राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष ना.पाशाभाई पटेल यांनी पर्यावरण बाबतीत आपण सतर्क राहिलो नाही तर त्यांचे दुष्परिणाम आपल्या भावी पिढीला भोगावे लागतील यासाठी वृक्षारोपण व संवर्धन यासाठी गाव,शहर पातळीवर पदाधिकारी, प्रशासन,व नागरीकांनी काम करावे लागेल असा सल्ला त्यांनी दिला. हळदी कुंकू समारंभात वाण म्हणून वस्तू देत असले तर आपल्या पिढीसाठी अनंत काळाची गिफ्ट समजून वाणरूपी रोपांचे संगोपन करा असे भगत यांनी महिलांना सांगितले. प्रियंका भगत यांच्या लय भारी संकल्पनेचे महिलामधुन कौतुक होत आहे.

### विक्रेत्यांना ई-कॉमर्सच्या माध्यमातून नवीन मोहीमेची सुरुवात

सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

अॅमेझॉन इंडियाने दिखोगे तो बिकोगे (याचा अर्थ 'जर तुम्ही सर्वांना दिसलात तर तुमच्याकडील गोष्टी विकल्या जातील') ही भारतातील छोट्या व्यवसायांना अॅमेझॉनच्या डिजिटल मार्केटप्लेसवर विक्री करणे कसे सोपे आणि परिणामकारक आहे याविषयीची जागरूकता मजबूत करण्यासाठी नवीन ब्रँड मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेत तीन क्रिएटिव्ह आणि विनोदी जाहिराती समाविष्ट आहेत.ऑनलाइन विक्री अधिक सुलभ आणि प्रभावी बनवतही ही मोहीम सर्व प्रकारच्या व्यवसायांना सक्षम बनवण्याबाबत अॅमेझॉनच्या वचनबद्धतेवर भर देते. यावेळी संचालक अमित नंदा म्हणाले, अॅमेझॉनमध्ये आमचे मुख्य उद्दिष्ट भारतभरातील छोट्या व्यवसायांना ई-कॉमर्सच्या माध्यमातून सक्षम बनवणे हे आहे. तसेच व्यवस्थापकीय भागीदार आशिष खाझांची म्हणाले,अॅमेझॉन इंडियाची दिखोगे तो बिकोगे मोहीम ही आमच्यासाठी आतापर्यंतच्या सर्वात आकर्षक प्रकल्पांपैकी एक आहे.



## नाते टिकवण्यासाठी संयम आवश्यक : प्रा. पाटील

### वीरतपस्वी व्याख्यानमाला

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कुटुंबातील नातेसंबंध टिकवण्यासाठी प्रत्येकाने संयम राखले पाहिजे, असे प्रतिपादन प्रा युवराज पाटील कोल्हापूर यांनी केले.

श्री वीरतपस्वी चन्नवीर म हास्वामीजींच्या ६९ व्या पुण्यतिथी निमित्त एमआयडीसी येथील वीरतपस्वी शिक्षण संकुलाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत प्रा. पाटील बोलत होते.'चला नाती जपूया 'हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. प्रारंभी चन्नवीर महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन काशी जगद्गुरु डॉ मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते करण्यात आले. यावेळी नागणसूरचे श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. पाटील म्हणाले, एकमेकांमधील समजूतदारपणा कमी झाल्यामुळे नातेसंबंध बिघडत चालले आहेत. नाते हरविल्यामुळे केवळ वृद्धाश्रम वाढले नाही तर जीवन विमाच्या योजना आल्या. घटस्फोटाचे प्रमाणही वाढले. ऑनलाइनच्या जमानात जगणे ऑफलाईन झाले आहे. एकत्र कुटुंबपद्धती अशी ओळख असलेल्या भारतीय संस्कृती विभक्त कुटुंब पद्धती नावारूपाला येत आहे याबद्दल खंत व्यक्त करून नाते जपण्यासाठी सर्वांनी नैतिकतेची उंची वाढवावी असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी नात्यांवर अनेक कविता सादर केले. सूत्रसंचालन मुख्याध्यापक नंदकुमार धायगुडे यांनी केले. यावेळी भगवती गौरी माता कलाशिक्षक संजय पाटील यांनी व्याख्यानाचे व्याख्यान सुरू असताना हुबेहूब चित्र रेखाटले.

## पालिकेच्या पेट्रोल पंपाचे उद्घाटन



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-

महापालिकेच्या महिला आयुक्त यांनी पुढाकार घेऊन महिला कर्मचाऱ्यांमार्फत चालविण्यात येणारा पेट्रोल पंप हा एक आदर्श उपक्रम आहे. शहराबरोबर महानगरपालिकेचा विकास होण्याकरिता हा उपक्रम आहे. हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण आहे. हे स्तुत्य आणि कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी काढले.

प्रजासत्ताक दिनाच्या औचित्याने सोलापूर महानगरपालिका व इंडियन ऑइल यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर मनपामार्फत चालविण्यात येणाऱ्या पेट्रोल पंपाचा शुभारंभ सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर आ. देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी आशिर्वाद कुमार, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, मनपा आयुक्त शीतल तेली-उगले, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्यलेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, नगर रचना विभागाचे उपसंचालक मनिष भिष्णूरकर, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीष पंडित, अनिता मगर, नगर अभियंता सारिका आकूलवार, भाजपचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक पालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भाविकांचे वाहन सापुतारा घाटात कोसळले, सात ठार

### १५ जण गंभीर जखमी

### महाकुंभातून परतताना काळाचा घाला



अपघातात खाजगी बसचा असा चेंदामेंदा झाला

**◆ डांग, २ फेब्रुवारी**

नाशिक-सुरत महामार्गावर सापुतारा घाटात रविवारी पहाटे सव्वाचार वाजताच्या सुमारास खाजगी लक्झरी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात ७ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १५ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

नाशिक-सुरत महामार्गावर सापुतारा घाटात खाजगी लक्झरी बस २०० फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला.

महाकुंभातून परतताना भाविकांच्या वाहनाचा अपघात झाला. या भीषण अपघातात बसचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. नाशिकहून देवदर्शन करून गुजरातकडे देवदर्शनासाठी जात असताना अपघात झाला. अपघात झालेल्या बसमधील सर्व मृत्युमुखी पडलेले आणि जखमी मध्यप्रदेशमधील असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, कोकणात रत्नागिरी येथून महाकुंभाला गेलेल्या भाविकांच्या गाडीला भीषण अपघात झाला. नाशिकजवळ सिन्नर येथे झालेल्या भीषण अपघातात रत्नागिरी येथील तिघांचा मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. या भीषण अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये रत्नागिरी डी. एड. कॉलेजचे माजी प्राचार्य प्रताप सावंत देसाई यांचा समावेश आहे. याशिवाय चालक भगवान उर्फ बाबू झगडे व रत्नागिरी येथील हॉटेल व्यवसायिक अक्षय निकम यांचाही मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

## सोनिया गांधींविरुद्ध बिहार न्यायालयात तक्रार

**◆ मुझफ्फरपूर, २ फेब्रुवारी**

देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यावरील 'गरीब' टिप्पणीबद्दल काँग्रेस नेत्या सोनिया गांधींविरुद्ध बिहारच्या मुझफ्फरपूर जिल्ह्यातील न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली.

वकील सुधीर ओझा यांनी शनिवारी सोनिया गांधींविरुद्ध तक्रार दाखल केली व देशाच्या सर्वोच्च संवैधानिक अधिकाराचा अनादर केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी केली. ओझा यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा यांचीही सहआरोपी म्हणून नावे नोंदवली व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सोनिया गांधी यांनी 'गरीब' असे वक्तव्य करून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा अपमान केला आहे. हा देशातील सर्वोच्च संवैधानिक अधिकाराचा अनादर आहे. राहुल गांधी व प्रियांका वढेरा हे यात सहआरोपी आहेत. त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलमांखाली गुन्हा दाखल करावा, असे ओझा यांनी मुझफ्फरपूर येथील सीजेएम न्यायालयात तक्रार दाखल केल्यानंतर पत्रकारांना सांगितले. (वृत्तसंस्था)



राजस्थानच्या जयपूर शहरात सध्या 'जयपूर साहित्य महोत्सव' सुरू आहे. या महोत्सवाला राज्याच्या विविध भागांतून साहित्यप्रेमी येत आहेत. डोक्यावर राजस्थानी फेटे बांधून या महिला व तरुणींना सेल्फी काढण्याचा मोह आवरता आला नाही

## संभल हिंसाचार प्रकरणी आणखी एकाला अटक

**◆ संभल, २ फेब्रुवारी**

मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान झालेल्या हिंसाचारा संदर्भात एका व्यक्तीला अटक करण्यात आली. अर्शद असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे, अशी माहिती अतिरिक्त पोलिस अधीक्षक श्रीष चंद्रा यांनी दिली.

फुटेजच्या आधारे अर्शदची ओळख पटवल्यानंतर शनिवारी त्याला अटक करण्यात आल्याचे चंद्रा म्हणाले. मागील वर्षी १९ नोव्हेंबर रोजी स्थानिक न्यायालयाने येथील शाही जामा मशिदीचे सर्वेक्षण करण्यासाठी एकतर्फी आदेश एका वकील आयुक्ताद्वारे जारी केला होता. मुघल सम्राट बाबरने १५२६ मध्ये या जागेवरील मंदिर पाडून मशीद बांधली होती, असा दावा हिंदू पक्षाने याचिकेत केला होता. (वृत्तसंस्था)

# हमासने ३ ओलिसांची, इस्रायलने पॅलेस्टिनींची सुटका केली

**◆ जेरुसलेम, २ फेब्रुवारी**

इस्रायल व हमास यांच्यातील गाझा युद्धबंदी करारादरम्यान चौथ्या फेरीत हमासने दक्षिण गाझा पट्टीतील तीन ओलिसांची सुटका केली आणि इस्रायलने १८३ पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली.

सहा आठवड्यांच्या पहिल्या टप्प्यातील युद्धबंदीमध्ये ३३ ओलिसांची आणि जवळजवळ २,००० कैद्यांची सुटका तसेच उत्तर गाझा येथे पॅलेस्टिनींची परतफेड आणि उद्ध्वस्त प्रदेशात मानवतावादी मदत वाढविण्याची मागणी आहे.

इस्रायल आणि हमास पुढील आठवड्यात युद्धबंदीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी वाटाघाटी सुरू करणार आहेत; ज्यामध्ये उर्वरित ओलिसांची सुटका करणे व युद्धबंदी अनिश्चित काळासाठी वाढविण्याची मागणी आहे. जर करार झाला नाही, तर मार्चच्या सुरुवातीला युद्ध पुन्हा होऊ शकते. इजिप्तसोबत दीर्घकाळ बंद असलेली रफा सीमा शनिवारी ज्यांना वैद्यकीय सेवेची गरज आहे, अशा हजारो पॅलेस्टिनींसाठी पुन्हा उघडली जाईल, असे गाझातील पॅलेस्टिनी आरोग्य अधिकाऱ्यांनी जाहीर केले. (वृत्तसंस्था)



सुटका झालेल्या पॅलेस्टिनीचे स्वागत करताना नागरिक

## इस्रायलच्या लष्कर प्रमुखपदी इयाल जमीर

**◆ तेल अवीव, २ फेब्रुवारी**

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी देशाच्या लष्कर प्रमुखपदी इयाल जमीर यांची नियुक्ती केली आहे. ६ मार्च रोजी ते पदभार स्वीकारतील. ते आयडीएफचे २४ वे जनरल बनले आहेत, अशी माहिती इस्रायली पंतप्रधान समाजमाध्यम मंच 'एक्स'वर पोस्ट करून दिली आहे.

हमासचे हल्ले रोखण्यात अपयशी ठरल्यानंतर मागील महिन्यात लष्करप्रमुख पदाचा हलेवी यांनी राजीनामा दिला होता. 'टाईम्स ऑफ इस्रायल'च्या मते, इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धविराम करारानंतर हलेवी यांचा राजीनामा आधीच निश्चित मानला जात होता. हलेवी यांनी जमीरचे अभिनंदन करताना म्हटले, मी एयालला अनेक वर्षांपासून ओळखतो आणि मला विश्वास आहे की, ते पुढील आव्हानांना तोंड देण्यासाठी आयडीएफचे नेतृत्व करतील. या जबाबदारीसाठी मी त्याला शुभेच्छा देतो.

एयाल झमीर २०२३ पासून संरक्षण मंत्रालयाचे संचालक म्हणून काम पाहत आहेत. हलेवी लष्कर प्रमुख झाल्यानंतर ते लष्करातून निवृत्त झाले होते. यापूर्वी त्यांनी डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ म्हणून काम केले आहे. (वृत्तसंस्था)

# अमेरिकी सैन्याचा सोमालियात हवाई हल्ला

### इसिसचे अनेक दहशतवादी ठार

**◆ वॉशिंग्टन, २ फेब्रुवारी**

अमेरिकन सैन्याने शनिवारी आफ्रिकन देश सोमालियात इसिस दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांवर हवाई हल्ले केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ही माहिती समाज माध्यमावर शेअर केली.

ट्रम्प यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, मी सोमालियातील दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांवर हवाई हल्ले करण्याचा आदेश दिला. हे दहशतवादी गुहांमध्ये लपले होते, पण आम्ही त्यांच्यावर अचूक हल्ला केला. या हवाई हल्ल्यात अनेक दहशतवाद्यांना ठार मारण्यात यश आले. अमेरिका आणि आमच्या मित्र राष्ट्रांसाठी धोकादायक असणाऱ्या इसिसच्या दहशतवाद्यांना आम्ही शोधून ठार करणार आहोत.

डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, अमेरिकन सैन्य अनेक वर्षांपासून इसिसच्या हल्ल्यांचे नियोजन करणाऱ्या दहशतवाद्यांना लक्ष्य करीत आहे. पण, बायडेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काम पूर्ण करण्यासाठी पुरेशी जलद कारवाई केली नाही. मी राष्ट्राध्यक्ष होताच ही कामगिरी हाती घेतली असून, या दशतवाद्यांना शोधून ठार करण्याचा आदेश दिला. सोमालियातील हवाई हल्ला याच योजनेचा भाग आहे. (वृत्तसंस्था)

### कैल मिस्कट पर्वत रांगांमध्ये लपले दहशतवादी

वास्तविक, आफ्रिकन देशात झालेल्या अनेक हल्ल्यांमध्ये सोमालियामधील इसिस संघटनेचे दहशतवादी जबाबदार असल्याचे बोलले जाते. सोमालियामध्ये इसिसच्या दहशतवाद्यांची संख्या शेकडोंमध्ये असल्याचा अंदाज आहे, जे पंटलँडच्या बारी प्रदेशातील कैल मिस्कट पर्वतांमधील गुहांमध्ये लपले आहेत.




## पोलिसांनी सुरू केली १६ हजार मोबाईल क्रमांकांची चौकशी



उत्तरप्रदेश पोलिसांच्या विशेष कृती दल अर्थात् एटीएसने प्रयागराज महाकुंभात मौनी अमावास्येला झालेल्या चेंगराचेंगरीच्या तपासाचा वेग वाढवला आहे. एसटीएफ पथकाला या घटनेमागे कट असल्याचा संशय आहे. एसटीएफ संगम नाक्याभोवती सक्रिय असलेल्या १६ हजार मोबाईल क्रमांकांच्या डेटाची तपासणी करीत आहे. घटनेनंतर अनेक मोबाईल नंबर्स बंद असल्याचे चौकशीत समोर आले.

एटसटीएफच्या अधिकाऱ्याने सांगितले की, १६ हजारांहून अधिक मोबाईल क्रमांकांच्या डेटाचे विश्लेषण केले जात आहे. आतापर्यंतच्या तपासात घटनेपासून अनेक मोबाईल क्रमांक बंद असल्याचे आढळून आले. महाकुंभमेळा परिसरात बांधलेल्या कमांड ॲण्ड कंट्रोल रूमच्या सीसीटीव्हीवरून फेस रेकग्निशन ॲपद्वारे संशयितांची ओळख पटवली जात आहे. वसंत पंचमी स्नानाबाबत उत्तरप्रदेश पोलिस हाय अलर्टवर आहेत. दरम्यान, वसंत पंचमीनिमित्त सोमवारी सकाळी होणाऱ्या तिसऱ्या अमृत स्नानापूर्वी परिसरात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आले.

**सर्व व्हीआयपी पास रद्द**

मुख्य स्नान महोत्सवाच्या एक दिवस आधी आणि एक दिवस नंतर शहरात वाहनांवर बंदी घालण्यात आली आहे, सर्व व्हीआयपी पास रद्द करण्यात आल्या. महाकुंभाला शहराशी जोडणारे सर्व ४० पोंटून पूल उघडण्यात आले आहेत. यापूर्वी, वैध असलेल्या वाहनांना महाकुंभमेळा परिसरात उभारलेल्या विविध शिबिरांमध्ये जाण्याची परवानगी होती. दरम्यान, चौथे महास्नान १२ फेब्रुवारी रोजी माघ पौर्णिमेला होणार आहे, तर शेवटचे स्नान २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीला होणार आहे.

# प्रयागराजच्या नागरिकांनी जपली माणुसकी

### भुकेल्या भाविकांसाठी मोफत निवास, जेवणाची सोय

महाकुंभात कोट्यवधी भाविकांच्या सोयीसाठी प्रशासन आपल्या परीने प्रयत्न करीत आहे. मात्र, भाविकांच्या प्रचंड संख्येमुळे पायाभूत सुविधांवर मोठा ताण पडत आहे. अशा परिस्थितीत प्रयागराजमधील रहिवाशांनी अडकून पडलेल्या शेकडो भुकेल्या भाविकांसाठी आपल्या घराचे दरवाजे खुले करीत माणुसकीचे दर्शन घडविले आहे.

स्थानिक रहिवाशांनी अडचणीत असलेल्या भाविकांच्या निवासाची आणि जेवणाची व्यवस्था केली आहे. प्रयागराजमधील रहिवासी, उद्योगपती आणि विद्यार्थीही त्रिवेणी संगमावर येणाऱ्या असंख्य भाविकांना अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची सोय करीत आहे. त्यामुळे प्रशासनाला काहीसा दिलासा मिळाला. स्थानिक रहिवासी डॉ. अंजली केसरी यांनी सांगितले की, महाकुंभासाठी येणाऱ्या भाविकांकडे आम्ही बाहेरील लोक म्हणून पाहत नाही, ते आमचे पाहुणे आहेत. रेल्वे स्थानकानजीक आम्ही थकलेल्या भाविकांना भोजन देत आहोत, आजारी असलेल्या भाविकांना उपचार आणि राहण्याची सोय करीत आहे. दररोज ८० लिटर चहा व अल्पोहार भाविकांना दिला जात आहे. याशिवाय भाविकांच्या भोजनासाठी तेहरी आणि दालखिचडी बनविली जाते.

**अलाहाबाद विद्यापीठही सरसावले मदतीसाठी**

मदत करणे हा प्रयागराजच्या संस्कृतीचा एक भाग आहे आणि हा त्यासाठी योगदान देण्याचा मार्ग आहे, अन्यथा हॉटेलमधील एका खोलीचे एका रात्रीचे भाडे १२ हजार ते १५ हजार रुपयांदरम्यान असल्याचे अलोक सिंग यांनी सांगितले. अलाहाबाद विद्यापीठाने महाकुंभवरून परतणाऱ्या भाविकांच्या तात्पुरत्या निवाऱ्यासाठी आपले कॅम्पस व वसतिगृहे खुली केल्याची माहिती विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. मृत्युंजय परमार यांनी दिली.



### हा तर माणुसकीचा संगम


अनेक स्थानिक भाविकांच्या रात्रीच्या निवाऱ्यासाठी आपल्या घरासमोरील जागा स्वच्छ करीत आहेत. आमच्यासाठी कुंभमेळा केवळ धार्मिक संमेलन नसून, माणुसकीचा संगम असल्याचे डॉ. अंजली यांना सांगितले. दमलेल्या भाविकांची मदत करण्यात प्रयागराजमधील हॉटेल्सही मागे नाहीत. शहरातील सिव्हिल लाईन्समधील विठ्ठल हॉटेलचे मालक अलोक सिंग यांनी भाविकांसाठी १०० खाटांचे विश्रामगृह विनामूल्य उपलब्ध करून दिले आहे.



प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात रविवारी वसंत पंचमीनिमित्त तिसऱ्या शाही स्नानाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येत भाविक येथे आले आहेत. मौनी अमावस्येला घडलेल्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी घेत प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे

## चित्रपट वार्ता

### अक्षयच्या 'स्काय फोर्स'चे १०० कोटींचे उड्डाण



**मुंबई** : अभिनेता अक्षय कुमारच्या 'स्काय फोर्स' चित्रपटाची सिनेमागृहात कमाईच्या बाबतीत घौडदौड सुरूच आहे. २४ जानेवारी रोजी चित्रपट सनेमागृहात प्रदर्शित झाला. तेव्हापासून या चित्रपटाने पकड कायम ठेवली आहे. ९ दिवसांत चित्रपटाने १०० कोटींचा आकडा पार केला. अक्षयचा हा या वर्षातील सर्वांत मोठा चित्रपट मानला जात आहे. अक्षय व्यतिरिक्त हा चित्रपट अभिनेता वीर पहाडियासाठीही भाग्यवान ठरला. या चित्रपटाद्वारे वीरने अभिनय कारकीर्दीला सुरुवात केली. चित्रपटाने प्रदर्शनाच्या ९ व्या दिवशी ५ कोटी रुपये कमावले. निर्मात्यांनी एका अधिकृत पोस्टद्वारे घोषणा केली की, चित्रपटाने ९ दिवसांत भारतात १०४.३ कोटी रुपये कमावले. चित्रपटाने पहिल्या आठवड्यात एकूण ९९.७ कोटींचा गल्ला जमवला आणि रिलीजच्या आठव्या दिवशी चित्रपटाने ४.६ कोटींची कमाई केली.

### दिग्दर्शकाची अजब मागणी, प्रियांकाने सोडला चित्रपट



**मुंबई** : अभिनेत्री प्रियांका चोप्रा नेहमीच तिच्या स्पष्टवक्त्या शैलीसाठी ओळखली जाते. अलिकडेच एका मुलाखतीत तिने तिच्या चित्रपट कारकीर्दीच्या सुरुवातीच्या दिवसांबद्दल बोलताना सांगितले की, ती १९ वर्षांची असताना एक चित्रपट साईन केला होता. पण दिग्दर्शकाने तिला खूप लहान कपडे घालण्याची मागणी केली. नकार दिला असता दिग्दर्शकाने तिच्यावर विविध प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे तिने चित्रपट सोडला. प्रियांकाच्या मते, दिग्दर्शकाने स्टायलिस्टला सांगितले होते की, जर तिने अंगप्रदर्शन केले तरच प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी सिनेमागृहात येतील. दिग्दर्शकाच्या वागण्याने खचले आणि महिलांबद्दल असा विचार करणाऱ्या व्यक्तीसोबत काम न करण्याचे ठरविल्याचे तिने सांगितले.

### रॅम्प वॉक करताना सोनमला कोसळले रडू



**मुंबई** : 'सावरिया' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री सोनम कपूरने आपल्या अभिनयाने इंडस्ट्रीत स्वतंत्र स्थान निर्माण केले. तिने अनेक चित्रपटात दमदार कामगिरी केली. सोनमच्या अभिनयाचा जितका चाहता वर्ग आहे, तितकाच तिच्या सौंदर्याचा, फॅशन सेन्सचा आहे. सध्या सोनमचा एक व्हिडीओ समाज माध्यमावर खूप प्रसारित होत आहे, ज्यात ती अचानक रॅम्प वॉक करताना ढसाढसा रडताना दिसत आहे. सोनम गुरुग्राम येथे आयोजित 'ब्लेंडर्स प्राईड एक्स एफडीसीआय फॅशन टूर'मध्ये सामील झाली. यावेळी तिने जबरदस्त रॅम्प वॉक केला. पण, अचानक तिला अश्रू अनावर झाले. दिवंगत प्रसिद्ध फॅशन डिझायनर रोहित बाल उर्फ गुड्डा याची आठवण झाल्याने रडू अनावर झाल्याचे तिने सांगितले.

## अग्रलेख...

# केजरीवाल निवडणूक जिंकतील?

दिल्ली विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. ५ तारखेला मतदान होईल आणि ८ तारखेला निकाल हाती येतील. निवडणुकीच्या निमित्ताने राजधानीतले वातावरण तापले आहे. आज संध्याकाळी ५ वाजता जाहीर प्रचार थांबेल. आरोप-प्रत्यारोपांच्या तोफा थंडावतील. असे असले तरी ज्या पद्धतीने आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी प्रचारात आरोप केलेत, यमुनेच्या बाबतीत ते जे बोलले, त्याचा फटका त्यांना बसेल, याची दाट शक्यता आहे. अरविंद केजरीवाल हे संपूर्ण देशाला माहिती असलेले एक वादग्रस्त नाव. त्यांचा जन्म वाद निर्माण करून त्यात स्वत:च अडकण्यासाठी झाला आहे की काय, असे वाटावे एवढे वाद ते उकरून काढत असतात. अरविंद केजरीवाल यांनी आपल्या वर्तणुकीने अनेक शत्रू निर्माण केले असले तरी, त्यांचे सगळ्यात मोठे शत्रू ते स्वत:च आहेत. केव्हा कुणाविरुद्ध काय आणि कसे बोलावे याचे भान ते ठेवत नाहीत आणि त्यामुळे ते वादात अडकतात. ते कुणावर कधी कोणता आरोप करतील आणि मानहानीचा दावा ओढवून घेतील, याचा काही नेम राहिलेला नाही. जनहिताची कामे करायची सोडून वाद निर्माण करण्यात त्यांना कोणता आनंद मिळतो, हे त्यांचे त्यांनाच माहीत. दिल्लीत गेली अनेक वर्षे आम आदमी पार्टीचेच सरकार आहे. त्यांच्या सत्ताकाळात जनहिताची कामे कमी आणि वादच जास्त निर्माण झाल्याचे देशाने पाहिले आहे.

सत्तेत आल्यापासूनच केजरीवाल यांनी नायब राज्यपालांशी आणि केंद्र सरकारशी पंगा घेतला. संघर्ष करण्याच्या आधीच्या भूमिकेपासून ते जराही दूर गेले नाहीत. आपण दिल्लीच्या सरकारचे प्रमुख आहोत, सचिवालयात बसलो आहोत हे विसरून ते जंतरमंतरवर आंदोलनात बसल्यासारखेच वागत राहिले. जंतरमंतरचा त्यांना अजूनही विसर पडलेला नाही. जनतेने आपल्याला भरघोस मतांनी निवडून दिले आहे आणि आता आपल्याला जनतेची कामे करायची आहेत, याची जाणीव त्यांना कधी झाल्याचे जाणवलेच नाही. डॉ. कुमार विश्वास, योगेंद्र यादव, प्रशांत भूषण यांच्यासारख्या दिग्गज सहकाऱ्यांना बाजूला सारून त्यांनी स्पर्धा कमी केली असली तरी आम आदमी पार्टी कमकुवत केली आहे आणि त्याची प्रचीती निवडणुकीत येईलच. प्रशांत भूषण हे ज्येष्ठ विधिज्ञ आहेत आणि त्यांच्याकडून पार्टीला फुकटात कायदेशीर सल्ला मिळत होता. ती संधी केजरीवाल यांनी गमावली आहे. योगेंद्र यादव हे उच्च वैचारिक पातळी (अर्थात् आम आदमी पार्टीसाठी केवळ) असलेले नेते त्यांच्याकडे होते. ते पार्टीला विचार देण्याची भूमिका पार पाडायचे. पण, त्यांना बाजूला करून केजरीवाल यांनी तीही संधी गमावली. डॉ. कुमार विश्वास हे एक कवी आहेत. त्यांनीही आम आदमी पार्टीचा जनाधार वाढविण्यासाठी संघर्ष केला. आज आम आदमी पार्टीत जे काही कुख्यात आमदार आहेत, त्यांना सांभाळण्याची आणि त्यांच्यामुळे होणारे पक्षाचे नुकसान टाळण्याची क्षमता कुमार विश्वास यांच्यात होती. पण, त्यांना पक्षातून घालवत केजरीवाल यांनी स्वत:ला कमकुवत करतानाच एक मजबूत शत्रूही तयार केला. गुप्ता बंधूंऐवजी कुमार विश्वास आणि योगेंद्र यादव किंवा प्रशांत भूषण यांना राज्यसभेवर पाठविले असते तर कदाचित आम आदमी पार्टीला आज आणखी बळकटी मिळाली असती. पण, दुर्दैवाने तसे काही घडले नाही. आंदोलनाच्या काळात जे लोक पार्टीसोबत होते, त्यांना बाजूला सारून पैशांना महत्त्व देत खास आदमींना जवळ करण्यातच आम आदमी पार्टीने धन्यता मानली, हे भीषण वास्तव आहे. दोन गुप्तांना राज्यसभेवर पाठविताना अर्थकारणाला महत्त्व देण्यात आले असा आरोप झाला असता तो जरी केजरीवाल यांनी बिनबुडाचा असल्याचे म्हटले होते, तरी त्यावर कुणीही विश्वास ठेवला नव्हता. जे गुप्ता कधीच चर्चेत नव्हते, अशा दोन गुप्तांना एकदम राज्यसभेची उमेदवारी दिल्याबरोबर देशवासीयांना आश्चर्याचा धक्कास बसला होता. पण, गुप्तांची पृष्ठभूमी लक्षात घेता देशवासीय धक्क्यातून लागलीच सावरलेही होते.

अरविंद केजरीवाल यांनी गतकाळात भारतीय जनता पार्टीचे नेते नितीन गडकरी आणि अरुण जेटली यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केल्यानंतर दोन्ही नेत्यांनी त्यांच्याविरुद्ध मानहानीचे खटले दाखल केले होते. नंतर केजरीवाल यांनी कोर्टात चकरा मारल्या. शेवटी भाजपाच्या या दोन्ही नेत्यांनी केजरीवाल यांना माफ करण्याचा मोठेपणा दाखवला होता, हे देशाने पाहिले आहे. माफी मागण्याची वेळ आल्याने केजरीवाल यांची प्रतिमा अधिक मलिन झाली. स्वपक्षीय राज्यसभा सदस्य स्वाती मालिवाल यांना मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यात मारहाण झाली होती. त्यावरून मोठा वाद झाल्यानंतर केजरीवालांच्या पीएला अटक करण्यात आली. या अटक कारवाईमुळेही आम आदमी पार्टीची प्रतिमा डागाळली होती. पक्षाची प्रतिमा उजळ राहावी आणि जनतेचीही कामे व्हावीत यादृष्टीने पाहता केजरीवाल यांची कार्यशैली असफल ठरल्याचे कधीचेच स्पष्ट झाले आहे. आम आदमी पार्टीच्या प्रमुखाच्या म्हणजे केजरीवाल यांच्या पीएने स्वाती मालिवाल यांना मारहाण केल्यानंतर पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून जबाबदार वर्तणुकीची अपेक्षा होती. परंतु, नेहमीप्रमाणेच आपचे नेते बेजबाबदारपणे वागले. हे सगळे केंद्र सरकारच्या इशाऱ्यावरून घडत असल्याचा आरोप करत आम आदमी पार्टीने या प्रकरणालाही राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करून राजकीयदृष्ट्या आपण अजूनही अपरिपक्व असल्याचेच दाखवून दिले होते.

कोणत्याही गोष्टीला आंधळा विरोध करायचा, कुणाहीविरुद्ध पुरावे नसताना बोलायचे अन् मानहानीच्या केसेस ओढवून घ्यायच्या, विरोधकांशी संघर्ष करण्यातच सगळा वेळ खर्ची घालायचा, या आपल्या मूळ स्वभावात केजरीवाल बदल करतील असे आज तरी दिसत नाही. सार्वजनिक जीवनात जगताना जी राजकीय शुचिता पाळणे अपेक्षित असते, तिला केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हरताळ फासला आहे. सरकार चालविण्यासाठी जो समन्वय असावा लागतो आणि सहमतीची जी भावना असावी लागते, ती केजरीवाल यांच्या सरकारमध्ये दूरदूरपर्यंत दिसत नाही. कुठल्याही प्रकारचे कायदेशीर नियंत्रण या सरकारला मान्य नाही. आम्ही म्हणू ती पूर्व दिशा या न्यायाने केजरीवाल आणि कंपू सरकार चालवू पाहात आहे. परंतु, जेव्हा आम आदमी पार्टी सरकारच्या कार्यप्रणालीवर व्यवस्थेकडून वा स्थापित यंत्रणेकडून अंकुश लावण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा केजरीवाल आणि त्यांचे सहकारी कधी दिल्लीच्या नायब राज्यपालांवर आरोप लावतात, तर कधी थेट केंद्र सरकारच्या विरोधात जाहीरपणे बोलतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध बोलताना तर केजरीवाल यांचा उत्साह द्विगुणित झालेला असतो. वास्तविक, दिल्ली हा केंद्रशासित प्रदेश आहे. दिल्लीला अजून पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला नाही. स्वाभाविकच दिल्लीवर केंद्र शासनाचा प्रतिनिधी म्हणून नायब राज्यपालांचाच हुकूम चालणार. पण, अरविंद केजरीवाल यांना हे सत्य पचवता आलेले नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीत सत्तरपैकी ६२ जागा मिळाल्या म्हणजे जनतेने आपल्याला दिल्ली दान केली या आविर्भावात ते आजही जगत आहेत. त्यांनी नेहमी संविधानाचे भान ठेवून राज्यकारभार केला असता तर वाद निर्माणच झाले नसते. परंतु, मी बहुमताने निवडून आलेला मुख्यमंत्री आहे, माझ्यावर कुणाचे नियंत्रण मला मान्यच नाही, ही त्यांची भूमिका एक दिवस त्यांना राजकारणातून बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही. केंद्रात भाजपाचे सरकार आहे म्हणून दिल्लीतल्या केजरीवाल सरकारला सापत्न वागणूक मिळते या आरोपातही काही तथ्य नाही. याआधीही केंद्रात आणि दिल्लीत वेगळ्या पक्षांची सरकारे असताना दिल्ली सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून काम केल्याने कधी वाद उत्पन्न झाला नव्हता. पण, केजरीवाल यांचा उद्देशच वाद उत्पन्न करण्याचा असल्याने त्याला कुणीच काही करू शकत नाही. केंद्राशी संघर्षातून केजरीवाल यांना काहीच साध्य करता येणार नाही. संघर्षाने दिल्लीचेही काही भले होणार नाही.

## दिल्ली दिनांक

# दिल्लीकरांवर बरसात आणि खैरात!

**रवींद्र दाणी**

केवळ ४८ तासांनी दिल्ली विधानसभा निवडण्यासाठी मतदान सुरू होईल. काय आहे या निवडणुकीचे चित्र? 'सारे काही मोफत!' प्रगत देशांमध्ये मोफत काहीच नाही, प्रत्येक सेवेसाठी शुल्क हे धोरण असताना दिल्लीत मात्र 'सारे काही मोफत' होणार असल्याचे चित्र विधानसभा प्रचारात तयार झाले आहे आणि दिल्लीपुरता विचार केल्यास हा चुकीचा पायंडा सुरू केला आहे आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी. समाजाच्या काही घटकांना नि;शुल्क वीज, पाणी, शिक्षण या सोयी देत सत्तेवर आलेल्या केजरीवाल यांनी या निवडणुकीत दिल्लीकरांना आणखी काही मोफत देण्याची घोषणा केली आहे. स्वाभाविकच भाजपा व काँग्रेस यांनाही तशा घोषणा कराव्या लागल्या आहेत.

**आपच्या घोषणा :** केजरीवाल सत्तेवर आल्यापासून त्यांनी समाजाच्या दुर्बल घटकांना मोफत वीज व पाणी देण्याची घोषणा केली व ती लागू केली. मात्र, ही योजना फक्त घरमालकांसाठी होती. आता ती भाडेकऱ्यांनाही लागू करण्याचा निर्णय केजरीवाल यांनी घोषित केला आहे. नि:शुल्क वैद्यकीय सोयी पुरविण्याची योजना केजरीवाल यांनी यापूर्वीच लागू केली आहे. या योजनेनुसार दुर्बल घटकांना नि:शुल्क उपचारासाठी सरकारी रुग्णालयात जाण्याची गरज नसते. ते कोणत्याही खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार, वैद्यकीय चाचण्या करवून घेऊ शकतात आणि हा खर्च दिल्ली सरकारकडून त्यांना परत केला जातो. ही योजना जनतेत लोकप्रिय ठरली आहे.

**महिलांना २१०० रुपये :** मध्यप्रदेशात शिवराजसिंह चौहान सरकारने सुरू केलेली 'लाडली बहन योजना' वेगवेगळ्या नावांनी साऱ्या देशात सुरू होत असल्याचे दिसत आहे. दिल्लीत प्रचार सुरू होताच सर्वप्रथम आम आदमी पक्षाने महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केली. 'संजीवनी' या नावाने सुरू केल्या जाणाऱ्या या योजनेत गरीब घटकांतील महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

**ऑटोचालकांवर मेहेरबानी :** डॉ. बाबासहेब आंबडेकर यांच्या नावाने दलित विद्यार्थ्यांसाठी एक शिष्यवृत्ती सुरू करण्याचीही घोषणा आपच्या जाहीरनाम्यात करण्यात आली आहे. दिल्लीतील ऑटोरिक्षा चालकांनी केजरीवाल यांना पाठिंबा दिला होता. त्या बदल्यात दिल्ली सरकारने ऑटोरिक्षा चालकांसाठी यापूर्वीच काही सोयी घोषित केल्या होत्या. आता त्यात आणखी भर पडली आहे. ऑटोरिक्षा चालकांना १० लाखांचा विमा देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ५ लाखांचा अपघात विमाही काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. शिवाय ऑटोरिक्षा चालकांना त्याच्या मुलीच्या लग्नासाठी एक लाख रुपये देण्याचे आश्वासनही जाहीरनाम्यात देण्यात आले आहे.

**२१०० विरुद्ध २५०० :** आम आदमी पक्षाने महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केल्यानंतर भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात महिला समृद्धी योजना घोषित केली असून या योजनेनुसार महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महिलांना ५०० रुपये दराने गॅस सिलेंडर देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. होळी आणि दिवाळी या सणांना दोन सिलेंडर नि:शुल्क देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. 'आयुष्मान भारत' योजनेंतर्गत ५० लाख दिल्लीवासीयांना आरोग्य सोयी पुरविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी एक सेवानिवृत्ती योजना सुरू करण्याचे वचनही भाजपाच्या संकल्पपत्रात देण्यात आले असून सेवानिवृत्ती वेतनाची राशी २५०० वरून वाढवून ती ३००० करण्याचे नमूद करण्यात आले आहे.

**पाच रुपयांत जेवण! :** केवळ पाच रुपयात चांगले जेवण पुरविण्याची घोषणा भाजपाच्या संकल्पपत्रात करण्यात आली असून 'अटल कँटिन' या नावाने ही योजना राबविण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे. याशिवाय दलित विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या नावाने एक योजना सुरू करण्याचे आश्वासन संकल्पपत्रात देण्यात आले आहे. समाजाच्या दुर्बल घटकांतील मुलांना नि:शुल्क शिक्षण देण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. केजी ते पीजी म्हणजे पदव्युत्तर शिक्षणापर्यंत सारे शिक्षण नि:शुल्क देण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात नमूद न केलेली पण प्रचारात आणलेली एक बाब म्हणजे नायब राज्यपालांशी चांगले संबंध असलेल्या पक्षाला मतदारांनी संधी द्यावी, असे पक्षाकडून म्हटले जात आहे. याचाही परिणाम मतदारांवर होऊ शकतो. आम आदमी पक्षाचे सरकार आल्यास पुन्हा नायब राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री असा संघर्ष सुरू होईल व त्यात सारे प्रशासन ठप्प होईल, असा विचार मतदार करू शकतात. भाजपासाठी हा मुद्दा जमेचा ठरू शकतो.

**आप सरकारची चौकशी :** केजरीवाल यांच्या सरकारने मागील १० वर्षांत घेतलेल्या सर्व चुकीच्या निर्णयांची चौकशी करण्याचे आश्वासन भाजपाच्या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. भाजपाने आपला जाहीरनामा 'संकल्पपत्र' या नावाने जारी केला असून तो तीन भागांत जारी करण्यात आला.

**प्यारी दीदी योजना :** 'लाडली बहन' या योजनेची नक्कल करीत काँग्रेसने 'प्यारी दीदी योजना' राबविण्याचे आश्वासन दिले आहे. या योजनेत महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे. याशिवाय महिलांना ५०० रुपयात गॅस सिलेंडर देण्याचेही आश्वासन दिले असून होळी व दिवाळी या दोन सणांना प्रत्येकी एक गॅस सिलेंडरही दिले जाईल, असे पक्षाने म्हटले आहे. याशिवाय गरीब घटकाला दरमहा ३०० युनिट वीज मोफत देण्याचे पक्षाचे धोरण असल्याचे जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले आहे. दिल्लीतील सर्व नागरिकांना २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा देण्याची बाब घोषणापत्रात नमूद करण्यात आली आहे. शिक्षित पण रोजगार नसलेल्या युवकांना दरमहा ८५०० रुपये देण्याचे आश्वासनही जाहीरनाम्यात देण्यात आले आहे.

**अर्थसंकल्पाचा परिणाम :** १ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर झालेल्या अर्थसंकल्पाचा कितपत परिणाम दिल्ली निवडणुकीवर होईल, असाही एक प्रश्न विचारला जात आहे. केंद्र सरकारने देशासाठी केलेल्या घोषणांचा परिणाम निश्चितपणे दिल्ली विधानसभा निवडणुकीवर दिसून येईल.

**आकर्षक जाहीरनामे :** आम आदमी पक्ष, काँग्रेस व भाजपा तिन्ही पक्षांनी आकर्षक जाहीरनामे जारी केले आहेत. मात्र भारतात आजवर तरी जाहीरनाम्यांच्या आधारे मतदान होत असल्याचा इतिहास नाही. या निवडणुकीत आप, भाजपा व काँग्रेस हे तीन मुख्य पक्ष रिंगणात असले, तरी खरी लढत आम आदमी पक्ष व भाजपा यांच्यातच होणार आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदार एकतर एखाद्या पक्षाला विजयी करण्यासाठी मतदान करतो वा मग एखादा पक्षाला पराभूत करण्यासाठी मतदान करतो. एकतर तो आम आदमी पक्षाला विजयी करण्यासाठी मतदान करील वा मग या पक्षाला पराभूत करण्यासाठी मतदान करील. 'आप'ला भाजपा पराभूत करू शकते; काँग्रेस नाही, हेही त्याला ठावूक आहे. त्यामुळे ही लढत आम आदमी पक्ष व भाजपा यांच्यात होणार हे ठरलेले आहे. काँग्रेस पक्ष काही मतदारसंघात चांगली लढत देऊ शकतो. मात्र किती जागा पक्षाला मिळतील यावर साशंकता आहे. काँग्रेस दुहेरी आकडा गाठू शकण्याची शक्यता फारच कमी असल्याचे मानले जाते.

**एकतर्फी नाही :** २०१५ व २०२० च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाला एकतर्फी कौल मिळाला होता. यावेळी तो मिळणार नाही हे निश्चित. फार कमी जागांच्या फरकाने दिल्ली विधानसभेचा निकाल लागेल.

## वेध

# पडताळणी बहिणींची...!

**अनिरुद्ध पांडे**

आम्ही काही पत्रकार बोलत बसलो होतो. विषय होता सरकारी, म्हणजेच लोकांच्या पैशांचा गैरवापर आणि त्यातून होणारा भ्रष्टाचार. एकाने सांगितले, काही योजना कशा 'भ्रष्टाचारमुक्त' आहेत ते. त्यातील एक म्हणजे 'किसान सन्मान योजना' आणि दुसरी म्हणजे 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना.' वर्षभरात सहा हजार रुपये संपूर्ण भारतातील पात्र शेतकऱ्यांच्या थेट खात्यात जमा होतात, ती म्हणजे 'किसान सन्मान योजना.' महाराष्ट्रातील पात्र महिलांच्या खात्यात दरमहा थेट १५०० रुपये जमा करणारी 'लाडकी बहीण' योजना. 'किसान सन्मान'मध्ये दोन एकरांपर्यंत शेती असलेल्या संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांना दर चार महिन्यांनी प्रत्येकी २ हजार रुपये मिळतात. या हिशेबाने २०२५ च्या सुरुवातीला या प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात असे पैसे विसाव्यांदा जमा होणार आहेत. म्हणजेच संपूर्ण भारतातील या योजनेच्या सुमारे ११ कोटी लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण प्रत्येकी ४० हजार रुपये जमा झालेले असतील. या योजनेतील पैसा थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत असल्यामुळे त्यात एकाही पैशाचा भ्रष्टाचार होण्याची शक्यताच नाही. तसेच आपल्या महाराष्ट्रात सुमारे २.५० कोटी पात्र लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये जवळपास सहा महिन्यांपासून दिले जात आहेत. ही रक्कमसुद्धा या लाडक्या बहिणींच्या खात्यात थेट जमा होत असल्यामुळे त्यातही भ्रष्टाचाराला वावच नाही. वर्षभरात त्यांना जवळपास ४० हजार कोटी रुपये दिले जातील; ते पूर्णपणे भ्रष्टाचारमुक्त असतील. पण समजा त्याच तिजोरीतून असे ४० हजार कोटी वेगवेगळ्या विकास कामांवर खर्च झाले तर त्यात कमीत कमी १० हजार कोटींचा भ्रष्टाचार अधिकृतपणे होईल.

सरकारी कामांमधील जाणकारांच्या मते तर ४० हजार कोटींमध्ये जवळपास अर्धा, म्हणजेच, २० हजार कोटींचा भ्रष्टाचार होत असतो. परवाच बीड जिल्ह्यातील भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी अशा भ्रष्टाचाराबाबत सनसनाटी आरोप करून धमाल उडवून दिली आहे. आ. धस यांनी, धनंजय मुंडे हे बीडचे पालकमंत्री असताना त्यांनी चक्क ७३ कोटी ३६ लाख रुपयांची बोगस बिले दाखवून त्याचे पैसे उचलल्याचे पुराव्यांनिशी आणि तारीखवार सांगितले आहे. एकाही रुपयाचे काम न करता ७३,३६,००,००० इतके पैसे पूर्णपणे खाऊन टाकल्याचे आ. धस यांनी जाहीरपणे सांगितले आहे. म्हणजे १०० टक्के भ्रष्टाचार आणि तिजोरीही तीच महाराष्ट्र सरकारची, म्हणजेच तुमची-आमची सर्वांची..! कुठल्याही लोकोपयोगी योजनेतून, त्यातील नियम, निकषांना बाजूला ठेवून प्रसंगी खोटी माहिती देऊन, आपला कार्यभाग घेण्याची अनेकांची मानसिकता असते. तसेच काही 'लाडक्या बहिणीं'नीही केले असल्याचे गेल्या सहा महिन्यांत उघडकीस आले आहे. सध्याच्या महाराष्ट्रातील महायुती सरकारनेच आपल्या गेल्या कार्यकाळात जुलै २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना जाहीर केली. यात पात्र बहिणींच्या थेट बँक खात्यात दरमहा १५०० रुपये जमा करण्याचा प्रस्ताव होता. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २ कोटी ६३ लाख महिलांनी अर्ज केले. त्यापैकी २ कोटी ४७ लाख महिला पात्र ठरल्या. त्यातील कोणतीही त्रुटी नसलेल्या २ कोटी ३४ लाख महिलांना महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी दरमहा १५०० या हिशेबाने पाच महिन्यांत ७५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात देण्यात आले.

या एकूण २.३४ कोटींपैकी कित्येक महिला पाच महिन्यांत ७५०० रुपये तर सोडाच; पण त्यांच्या आयुष्यात कोणत्याही महिन्यात एकरकमी १५०० रुपयेसुद्धा पहिलेल्या नव्हत्या. ही वस्तुस्थिती नाकारण्यासारखी नाहीच. परिणामी, या बहिणींनीही आपले लाडके भाऊ कोण हे ठरवून टाकले. महायुतीच्या उमेदवारांना भरभरून मतांचे दान देऊन दणदणीत बहुमताने पुन्हा सत्तेत बसवले. पण पुढे नियमांप्रमाणे पडताळणी दरम्यान काही अपात्र बहिणींनी या योजनेत घुसखोरी केल्याचे निदर्शनास आले. त्यांनी चुकीची माहिती देऊन किंवा दडवून ठेवून 'लाडकी बहीण' ही पात्रता मिळवल्याचे स्पष्ट झाले. आधीपासूनच सुरू असलेल्या संजय गांधी निराधार योजनेतून निराधार बहिणींना दरमहा १५०० रुपये मिळतच आहेत. या बहिणी पुन्हा 'लाडकी' होण्यासाठी पात्र नव्हत्याच. प्रधानमंत्री 'शेतकरी सन्मान योजने'त काही महिलांना १००० रुपये मिळतच आहेत. त्यांना ५०० रुपयेच 'लाडकी'मध्ये देण्याची तरतूद आहे. पडताळणी करून काहींना वगळण्यात येणार आहे. 'पडताळणी'ची अपेक्षा नसणाऱ्या काही अपात्र बहिणींनी लाडकीमध्ये जमवून घेतले. पण आता पडताळणीत बिंग फुटेल या भीतीने चार ते पाच हजार बहिणींनी स्वत:हून आता यातून माघार घेतली आहे. अशा लाडक्या नसलेल्या बहिणी कदाचित ४ ते ५ लाखांवर जाऊ शकतील असाही एक अंदाज आहे. काहीही होवो, सध्याच्या २ कोटी ४७ लाखांपैकी २.४० कोटी बहिणी मात्र पात्र आणि लाडक्या राहणारच आहेत, हे निश्चित.

९८८१७१७८२९

## कानोसा

# अर्थसंकल्प जाणून घेणे आवश्यक

**अमोल पुसदकर**

अर्थसंकल्पामधील सगळ्यात मोठी घोषणा म्हणजे सर्वसामान्य मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय लोकांसाठी १२ लाखांपर्यंत वाढविण्यात आलेली करमर्यादा. म्हणजे १२ लाख उत्पन्न ज्यांचे आहे, त्यांना कुठलाही कर द्यावा लागणार नाही. भारतामध्ये जवळपास ५० कोटी लोक हे मध्यमवर्गीय परिभाषेत येतात. म्हणजे इतक्या मोठ्या जनसंख्येला आपल्या भविष्याकरिता पैसे वाचविणे शक्य होणार आहे. समजा एका व्यक्तीचे वर्षाला ५० हजार रुपये वाचले व ते त्याने ते पेन्शन फंडमध्ये टाकले तरी त्याच्या भविष्याची सोय होणार आहे. यामध्ये सरकारने आपली तिजोरी भरण्यापेक्षा सर्वसाधारण माणसाच्या भविष्याची सोय केली आहे. अनेक छोटे व्यवसाय करणाऱ्यांना बँका कर्ज देत नाही. कारण त्यांच्याजवळ आयकर परतावा म्हणजे इन्कम टॅक्स रिटर्न नसतो. आता सरकारने मागील चार वर्षे जुना आयकर परतावासुद्धा भरता येईल, अशी सुविधा दिलेली आहे. यामुळे मागच्या तीन-चार वर्षांपासून ज्यांचा व्यवसाय सुरू आहे, परंतु ज्यांनी तो सरकार दरबारी दाखवला नव्हता व त्यामुळे त्यांना सरकारचे अनेक फायदे तसेच बँकांकडून कर्ज मिळू शकत नव्हते ते आता त्यांना मिळू शकणार आहे.

देशाच्या संरक्षण अर्थसंकल्पात ३७ हजार कोटी रुपयांनी वाढ करण्यात आलेली आहे. आपल्याला माहीत आहे की, भारत आता संरक्षण उत्पादनांचा निर्माता व निर्यातकर्ता झालेला आहे. नुकताच नागपुरातील एका प्रसिद्ध एक्सप्लोसिव्ह कंपनीला २००० कोटींचा ऑर्डर मिळालेला आहे. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा जी ३ लाख रुपये होती, ती आता पाच लाख रुपये करण्यात आलेली आहे व कृषी मंत्रालयाला १००० कोटी रुपये अधिक देण्यात आलेले आहे. जागतिक खेळणी निर्मिती केंद्र बनविण्याचा विचार या अर्थसंकल्पात सांगण्यात आलेला आहे. याआधी जगातील खेळणी उद्योगावर चीनचे वर्चस्व होते. आता भारताने छोट्या छोट्या उद्योगांच्या माध्यमातून भारतीय खेळणे उद्योगाला नवीन ऊर्जा दिलेली आहे.

भारताच्या जंगलांमध्ये अनेक प्रकारच्या फळांचे उत्पादन होते. परंतु जंगलातील ती फळं किंवा शेतकरी ज्या फळांचे उत्पादन करतात ती फळे शहरापर्यंत पोहोचतपर्यंत खराब होऊन जातात. त्यांच्यावर कुठलेही प्रोसेसिंग म्हणजे प्रक्रिया होत नाही. यावेळेस खाद्य प्रक्रियेवर विशेष भर देण्यात आला आहे; ज्यामध्ये २०० नवीन खाद्य प्रक्रिया केंद्रे उभारली जातील.




पूर्वी नेहमी प्रश्न विचारला जायचा की, ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक का मिळत नाही. परंतु मागच्या १० वर्षांमध्ये ऑलिम्पिकमध्ये भारताची कामगिरी उंचावत चाललेली आहे. ती अधिक उंचावण्यासाठी व खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी क्रीडा अर्थसंकल्पामध्ये ३५० कोटी वाढविण्यात आलेले आहे. भारत हा साहित्याचा आणि साहित्यिकांचा देश आहे. आपल्या देशातील प्रत्येकच भाषेमध्ये उच्च दर्जाचे साहित्य निर्माण झालेले आहे. परंतु ते जनतेपर्यंत सर्वत्र पोहोचण्यासाठी व त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी तसेच एक कोटी ग्रंथांच्या ज्या पांडू लिपी आहेत म्हणजे मूळ कृती आहेत, त्याचेही संरक्षण व्हावे यासाठीही विशेष बजेट आरक्षित करण्यात आलेले आहे व भारतीय भाषा पुस्तक ही योजना सरकार सुरू करणार आहे. या अर्थसंकल्पासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक घोषवाक्य सांगितलेले आहे, ते आहे 'विकास भी और विरासत भी...!'

वैद्यकीय क्षेत्रातील नवीन संशोधनांमुळे भारतामध्ये ज्येष्ठ नागरिकांची फार मोठी संख्या आहे. कॅन्सर आज संपूर्ण देशासमोर एक मोठा रोग म्हणून समोर आलेला आहे. पंजाबसारखे राज्य तर कॅन्सरच्या तावडीत सापडलेले आहे. तेथे कॅन्सर ट्रेन चालवली जाते. अशा परिस्थितीला बघून केंद्र सरकारने कॅन्सरसहित जे ३६ आजार आहेत, त्यांच्या औषधींना सीमा शुल्कातून पूर्णतः मुक्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय देशातील सर्वसामान्य नागरिकांना बघून तसेच जे वैद्यकीय उपचारांनी त्रस्त झालेले आहेत, अशांचा खर्च कुठेतरी कमी व्हावा यासाठी ही सूट देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे कॅन्सरसाठी २०० डे केअर केंद्रे स्थापित केली जाणार आहेत. देशाची लोकसंख्या वाढत आहे. त्या प्रमाणात डॉक्टरची संख्या वाढली पाहिजे यासाठी विविध मेडिकल कॉलेजमध्ये १० हजार नवीन जागा निर्माण करण्यात येणार आहेत. स्विगी, झोमॅटोसारखे काम करणाऱ्या देशातील एक कोटी गिग कामगारांना 'पीएम जय' योजनेंतर्गत आरोग्य सुविधा पुरविण्यात येणार आहे. जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था ही त्या देशांच्या पर्यटनावर चालत असते. भारत हा अतिप्राचीन देश आहे. भारताला समृद्ध इतिहास आहे व आमच्या जवळ भारतीयांना तसेच जगाला दाखविण्याकरिता अनेक प्राचीन वास्तू तथा ऐतिहासिक स्थळे आहेत. केंद्र सरकार यावेळेस भारतातील ५० पर्यटन स्थळांचा विकास करणार आहे; ज्यामुळे भारतीयांचे पर्यटन तर वाढेलच; पण विदेशी लोकसुद्धा पर्यटनासाठी भारतात येतील व भारताच्या उत्पन्नामध्ये आपला हातभार लावतील. नवीन नोकऱ्यांचे सृजन झाले पाहिजे. भारत जगाच्या सॉफ्टवेअर स्पर्धेमध्ये मागे पडता कामा नये यासाठी स्टार्टअप उद्योगांना बळ मिळावे म्हणून 'फंड ऑफ फंड्स'चे निर्माण करण्यात आलेले असून त्यासाठी १० हजार कोटी रुपये आरक्षित करण्यात आलेले आहे.

सर्वसामान्य जनतेला अर्थसंकल्प काय आहे हे माहीत नसते. त्यांना एवढेच माहीत असते की, अर्थसंकल्प म्हणजे डोक्याला त्रास देणारी कुठली तरी गोष्ट. परंतु देशाचे सरकार देशाला कोणत्या दिशेने घेऊन जाऊ इच्छित आहे त्यासाठी ते ज्या क्षेत्रांमध्ये पैसे टाकत आहेत त्या क्षेत्रांमध्येच नवीन नोकऱ्यांचे सृजन होणार आहे, नवीन उद्योगांचे सृजन होणार आहे. ज्यांना नवीन अभ्यासक्रम निवडायचा आहे, त्यांनी पण अशा क्षेत्रांची निवड केल्यास त्यांना निश्चितपणे नोकरी अथवा उद्योग उभा करता येईल. म्हणून प्रत्येक भारतीयाने आपल्या देशाचा अर्थसंकल्प काय सांगतो हे किमान जाणून घेणे आवश्यक आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### महाराष्ट्रात २०२४ मध्ये १५,३३५ अपघाती मृत्यू

२०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये रस्त्यावरील अपघातांत वाढ झाली असून त्यांची संख्या १५,३३५ एवढी आहे. एका बातमीनुसार, मुंबई-पुणे एक्स्प्रेसवरील अपघात १९ टक्क्यांनी वाढले आहेत तर समृद्धी महामार्गावरील अपघात ४ टक्क्यांनी कमी झाले आहेत. विशेष म्हणजे नऊ जिल्हे व शहरामध्ये मृत्यूमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. धुळे जिल्ह्यात सर्वांत जास्त म्हणजे २५ टक्के वाढ झाली आहे. एकूणच दिवसेंदिवस रस्त्यावरील अपघातांत मृत्यू होणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे ही चिंताजनक बाब आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या प्रचंड वाढताना दिसून येत आहे. अपघाताची कारणे विविध आहेत . त्यामध्ये वेगात वाहन चालविणे, वेग मर्यादेचे नियम डावलणे, मद्य प्राशन करून वाहन चालविणे, वाहतुकीचे नियम न पाळणे, कमी वयातील मुलांच्या हातात गाडी देऊन अपघाताला आमंत्रण देणे. वरील काही गोष्टींमुळे अपघात होत आहेत. दिवसेंदिवस नागरिकांमध्ये चारचाकी व दुचाकी वाहने घेण्याचे प्रमाण वाढत चालल्याचे दिसते आहे. आज रस्त्यावर प्रचंड वाहतूक आहे. यामुळे दिवसेंदिवस प्रदूषणाचा प्रश्न बिकट होत चालला आहे. रस्त्यावरील वाहनांना कोणतेही निर्बंध नाहीत. त्यांच्या संख्येवरसुद्धा काही मर्यादा नाही. या अपघाताला रस्त्यावरील खाजगी वाहनांची संख्या कमी करून सरकारी वाहनांची संख्या वाढविणे म्हणजेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे हा उपाय होऊ शकतो. त्या दृष्टीने सरकार प्रयत्न करीत आहे. पण हे प्रयत्न फारच कमी आहेत. आज पुण्यासारख्या शहरात रस्त्यावर चालणे मोठे कठीण होत चालले आहे. अशीच परिस्थिती इतर शहरांत दिसून येते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देशात २०२४ मध्ये १.८० लाख मृत्यू झाल्याचे सांगितले आहे ही संख्या खरे तर प्रचंड आहे. ही संख्या हळूहळू कमी करता येईल का, याकडे सर्वांचेच लक्ष हवे.



**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

### जीबीएसचा प्रादुर्भाव अन् जागजागृती

दिवसेंदिवस नवीन आजाराची उत्पत्ती होत असताना पुणे शहर आणि आसपासच्या परिसरात जीबीएसचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत आहे. असे असताना जीबीएस कोणत्या कारणामुळे होत आहे, नागरिकांनी कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी, यावर कुठले प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे, याबद्दल तज्ज्ञ डॉक्टरांकडून वेळोवेळी योग्य मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. जेणेकरून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण न होता जनजागृती होईल आणि आजाराला आळा बसेल. प्रसारमाध्यमांनी जनतेला विश्वासात घेऊन सत्य परिस्थिती सांगितली पाहिजे आणि नागरिकांनी सतर्क राहून यंत्रणेला सहकार्य करणे तितकेच गरजेचे आहे.

**मयूर प्रकाशचंद्र बजाज**/९४२१४४९१३०

### संत असे महान!

पती आणि पिता यांना संसारात फक्त दोन थेंबांच्या सुखाची अपेक्षा असते. जीवन समुद्राच्या काठावर सर्वांच्या कल्याणाकरिता पोटतिडिकीने बोलणारे जड ओझे घेऊन चालणारे आणि कोणीच समजून घेत नाही म्हणून आपले मन मशालीसारखे आतल्या आत जळत ठेवणारे; दु:खाचे प्रदर्शन न करता मनातले शब्द मनातच ठेवणाऱ्या अशा संतांचे दु:ख हळव्या मनाच्या स्त्रिया का समजून घेत नाहीत? वेदनांना काळजातच ठेवून, अनेक अपमान सहन करीत सातत्याने कष्ट करणारे, सर्वांच्या आवडीचा अभ्यास करून परिवार सुखी, आनंदी ठेवणाऱ्या पत्नीला आणि मुलीला त्यांच्याबद्दल माया का वाटत नाही? शेवटी आपले मन मोकळे करण्याचा एकच मार्ग उरतो तो म्हणजे आपला सखा (मित्र). पुरुषांना काळीजच नाही हा सिद्धांत मांडून त्यांना नर्मदेचा गोटा म्हणण्यापर्यंतची मजल जाते! वेदनांना कुशीत घेऊन मुक्यानेच एकतारी भजन म्हणणाऱ्या अशा संतासाठी कुणी आसवे गाळलेली आठवतात का? नसतील तर दोन थेंब सुखाने पिता आणि पती असणाऱ्या संतांना ऊर्जा देऊन आपले जीवन सुखी करा. लहानशा काजव्यात अंधार फेडायची पण ताकद असते. कुठेतरी मनात कर्माची भीती असते म्हणूनच गंगा स्नान घडते. १०००० रुपयात सगळे घर चालवतो तरी तो सर्वांच्या नजरेत अपयशी ठरतो. अशा पतीला किंवा पित्याला घरच्यांचे दोन थेंब सुख मिळाले तर ते त्यांचे लाख रुपयांचे सुख असते. पत्नीच्या कष्टाची दखल आणि नवऱ्याच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगला की संसार नक्कीच सुखाचा होतो. म्हणूनच संत महान असतात.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### पालिका कामगार संघटना कृती समितीतर्फे मुख्य लेखापाल डॉ. जवळगेकर यांचा सत्कार

**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**
राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या खात्यावर ४३ कोटी रुपये जमा केले तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे अर्जित रजेचे वेतन २०२३-२४ पर्यंतचे ९ कोटी रक्कम जमा केल्याबद्दल महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कामगार नेते अशोक जानराव, कोषाध्यक्ष अजय क्षीरसागर, आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसट क्रांती युनियनचे अध्यक्ष लिंबराज जटीथोर,आरोग्य निरीक्षक संघटनेचे सचिव विठोबा शिंदीबंदे, रोहित गवळी, कार्याध्यक्ष सुनील राठोड, भंडारे, कुणाल जानराव, परवेज शेख, अमोल टाकळगी, केतन सुरवसे, अजय जाधव, सतीश नागटिळक, राहुल बनसोडे, रवी बनसोडे, संजय सरवदे, सिद्धेश्वर सोनवणे, राहुल बाबरे, परमेश्वर कांबळे उपस्थित होते.



### कोठारी प्रशालेत डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन

**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**
श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशालेत डिजिटल क्लासरूम उद्घाटन समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमास रोटरी क्लब उत्तर सोलापूरच्या अध्यक्षा जान्हवी माखीजा, अतुल चव्हाण, युगंधर शिंदे, संजीवकुमार मेंथे व मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. रोटरी क्लब सोलापूरच्या वतीने प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम सहित टीव्ही संच देऊ करण्यात आले. जान्हवी माखीजा यांच्या हस्ते फीत कापून डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन करण्यात आले. मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान युक्त शिक्षण देण्यासाठी सहकार्य केलेल्या रोटरी क्लबचे आभार मानले. सूत्रसंचालन पी.एस. उपाध्ये यांनी तर आभार ए. एस. माने यांनी मानले.

### समाजाच्या उन्नतीसाठी संशोधन होणे काळाची गरज : डॉ. गौतम कांबळे

**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**
संशोधन माणसाला विवेकशील बनवते, विचार करण्यास प्रवृत्त करते.संशोधनाचा वापर सामाजिक उन्नतीसाठी व्हावा, संशोधन समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे, संशोधन फक्त वैयक्तिकच नाही तर समाजाच्या प्रगतीसाठी हातभार लावणारे असायला हवे. असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे यानी केले. वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅण्ड सायन्स येथे 'शोधविद्या २०२५' ह्या पदव्युत्तर विभागाच्या वार्षिक विद्यार्थी चर्चासत्र उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी, उपप्राचार्य डॉ. राजशेखर हिप्परगी, डॉ. कपूर व पदव्युत्तर विभागाचे समन्वयक संतोष रेळेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. अनिलकुमार कट्टी यानी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रतिभा होंगल यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. नानासाहेब गव्हाणे यांनी तर आभार प्रा.महेश कोळी यांनी मानले.

### पत्नीचा आर्थिक छळ; पतीसह सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर दि. २ फेब्रुवारी-**
सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून फिर्यादी सपना प्रवीण राठोड (वय-२४,रा. महालक्ष्मी निवास,गुरुदत्त नगर,जुळे सोलापूर) यांना वेळोवेळी मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास देत आर्थिक छळ केला आहे.तसेच आत्महत्या करून घेण्याची धमकीही दिली आहे. अशा आशयाची फिर्याद सपना राठोड यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती प्रवीण राठोड,सासू चांदुबाई राठोड, नणंद सविता पवार,नंदेचा पती देविदास,दीर गणेश राठोड, (सर्व.रा.दुधनी,अक्कलकोट) व कविता पवार (रा.प्रताप नगर तांडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटना ६ जुलै २०१८ रोजी ते २२ नोव्हेंबर २०२४ रोजी दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि/११७३/२०२४ दि. ०२/०१/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. मोहम्मद हनिफ उस्मान आळंद - अर्जदार**
रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय**
**नगर परिषद, मैंदर्गी ता. अक्कलकोट - सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील मोहम्मद हनिफ उस्मान आळंद रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा मुलगा अर्श मोहम्मद हनिफ आळंद याचा जन्म दि.२५/०४/२०१८ रोजी मौजे मैंदर्गी, ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद करुन अर्श मोहम्मद हनिफ आळंद या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२)(३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २५/०६/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०२/०१/२०२५ रोजी अहासा कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

# उर्दू साहित्यकारांनी राष्ट्रवाद मजबूत केले

## सरफराज शेख; बहुभाषिक साहित्य चर्चासत्राचे आयोजन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**
इदार ए इस्लामी हिंद व सोशल महाविद्यालच्या वतीने आयोजित बहुभाषिक साहित्य चर्चाचे सत्र पत्रकार समिक्षक सरफराज शेख यांच्या अध्यक्षतेखाली व अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषदचे सचिव अय्युब नल्लामंदू यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. या चर्चासत्रात डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. देविदास गायकवाड, डॉ. भगवान आदटराव, प्रा. सुभाष शास्त्री यांनी आपल्या विचार व्यक्त करत साहित्याच्या विविध पहलू वर चर्चा करून साहित्य हे समाज प्रबोधनाचे माध्यम आहे भाषा कोणती ही असो ते समाज जोडण्याचे महत्वाचे काम करत असते म्हणून यावर अधिक काम करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक नल्लामंदू म्हणाले, साहित्यात समाजाचे प्रतिबिंब दिसत असते ते प्रतिबिंध स्वच्छ दिसले पाहिजे साहित्यकाराचा लिखाण हे ऐतेहासिक समजला जातो. म्हणून लिहिताना कोणाचे भावना दुखविण्याचे पाप करू नका. आणि जे कोणी नकारात्यक लिखाण करत असेल तर त्याचा प्रेमपूर्वक उत्तर देण्याची आज गरज आहे प्रेम पूर्वक दिलेल्या उत्तराने गैर समज दूर होतात. आणि आपला अस्तिव टिकुन राहतो असे मत व्यक्त केले. अध्यक्ष इतिहासकार सरफराज शेख यांनी इंग्रजीनी आपल्या देशात तोडो फोडो नीतीचा वापर करून देशाची एकात्मतेला मलीन केले हे सर्व जग जाहीर आहे. आज प्रत्येक धर्माला एकतेची गरज आहे, सर सय्यद अहमद खां व इतर उर्दू साहित्यकारांनी देशात एकात्मता निर्माण करत राष्ट्रवाद मजबूत केले आहे हे विसरता येत नाही. भाषा टिकली पाहिजे. भाषा संपली की सांस्कृती संपते आणि संस्कृती संपली तर आपण कोण? आपला अस्तिव काय? असा प्रश्न निर्माण होतो म्हणून भाषेचे जतन करणे जरूरी आहे. असे विचार मांडले. प्रा. डॉ. शफी चोबदार, शफीक काजी यांनी स्वागत केले. सूत्रसंचलन प्रा. रईसा मिर्जा यांनी केले. यावेळी डॉ. सलीम खान, डॉ. मकबूल अहमद, डॉ. इसमाईल शेख, शफीक काजी, इक्बाल बागबान, वायज सय्यद, मन्नान शेख, नजीर मुन्शी, महेमूद नवाज, हसीब नदाफ, बशीर परवाज, असरार नल्लामंदू, सरदार नदाफ, हुसेन बक्षी उपस्थित होते.

मनोरमा परिवार अंतर्गत

**अंकुर सर्व व्यावसायिक नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. राचण्णा माळसिध्दप्पा कटारे, व्हा. चेअरमन (मो. ९४२१०७५४९८)
प्राची अनिल गोसावी, व्यवस्थापिका (मो. ७०५८९५५९८०)

# जिल्ह्यातील उत्कृष्ट रेशीम कोष उत्पादक शेतकऱ्यांना पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**
उत्कृष्ट रेशीम कोष उत्पादन घेणाऱ्या व रेशीम शेतीतून लक्षाधीश झालेल्या शेतकऱ्यांना पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले असल्याची माहिती रेशीम विकास अधिकारी विनित पवार यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यामध्ये १ हजार १७ शेतकऱ्यांकडे १ हजार २६० एकरावर रेशीम उद्योग चालू असून, त्यापैकी मौजे निमगाव, ता.माळशिरस येथील शेतकरी जगन्नाथ पंढरीनाथ मगर यांनी घेतलेली अंडीपुंज संख्या-२ हजार २००, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. १ हजार ७६०, प्राप्त रक्कम १० लाख ८ हजार ४८० रुपये व जयसिंग साहेबराव मगर यांनी घेतलेली अंडीपुंज संख्या-२ हजार ८००, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. २ हजार ११०, प्राप्त रक्कम ११ लाख ३४ हजार. रुपये, हणमंत तुकाराम सांगोलकर मौजे भंडीशेगाव ता.पंढरपूर यांनी घेतलेले अंडीपुंज संख्या-३ हजार २००, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. २ हजार २५७ प्राप्त रक्कम १३ लाख २० हजार ३४५ रुपये, वैभव भिमराव काळे मौजे कंदर ता. करमाळा, यांनी घेतलेले अंडीपुंज संख्या- ३ हजार, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. २ हजार ६८० प्राप्त रक्कम १४ लाख ७ हजार ४३१ रुपय, सौदागर पांडुरंग पांडव मौजे पिरटाकळी, ता. मोहोळयांनी घेतलेले अंडीपुंज संख्या-२ हजार ५०, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. १ हजार ७०१ प्राप्त रक्कम ८ लाख ३३ हजार ४९० रुपये तसेच श्रीशैल मलकाप्पा नंदगाव मौजे हत्तीकणबस ता. अक्कलकोट यांनी घेतलेले अंडीपुंज संख्या १ हजार ५०, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. ८९७, प्राप्त रक्कम ४ लाख ७२ हजार ५६० रुपये इतकी आहे.

# जीवनातील प्रवाहीपण जगण्याला सुंदर करते

## माजी आमदार दिलीप माने

## बेलाटी येथील लिटल हार्ट स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**
लिटल हार्ट इंग्लिश मिडियम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी दिली जाते. सुप्त कलागुणांची मुक्त उधळण होऊन स्वता विकास होण्यास मदत होते. जीवनातील प्रवाहीपण जगण्याला सुंदर करते असे संस्थेच्या अध्यक्ष दिलीपराव माने यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते.

यावेळी संस्थेच्या सचिवा जयश्रीताई माने, कॅम्पस डायरेक्टर राहुल माने, यावेळी ज्यु.कॉलेजचे प्राचार्य प्रतिभा माने उपस्थित होते. या स्नेहसंमेलनाचे वैशिष्ट्य रामायण व तानाजी पदनाट्य, तसेच लावणी,कोळी,रेट्रो,बार्बी इ. गाण्यांवर विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर केले. हा सर्व कार्यक्रम लिटिल हार्टचे प्राचार्य श्रीकांत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांच्या परिश्रमामुळे यशस्वी झाला. सूत्रसंचालन सना शेख आणि विद्यार्थ्यांनी केले. अमित सुरवसे यांनी आभार मानले.

# माता रमाई यांच्या पुतळ्याच्या क्ले प्रतिकृतीची केली पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**
शहरातील न्यू. बुधवार पेठ परिसरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या शेजारी त्यागमूर्ती माता रमाई यांचा पूर्णकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. तो पुतळा पुण्यात तयार करण्यात येत असून पुतळ्याच्या क्ले प्रतीकृतीची पाहाणी करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष सोलापूर महानगरपालिका गटनेते आनंद चंदनशिवे यांच्या प्रस्तावानुसार सोलापूर महानगरपालिकेमध्ये एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. त्यानुसार त्यागमूर्ती माता रमाई याचा पुतळा तयार करण्याची वर्क ऑर्डर पुणे येथील मूर्तिकार सुभाष अल्हाट यांना देण्यात आली. सोलापुरातील आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ अभ्यासक दत्ता गायकवाड यांनी पाहणी केली. यापूर्वी त्यांनी सदरच्या पुतळ्यामधील त्रुटी व उणीवा मूर्तिकार सुभाष आल्हाट यांना लेखी स्वरुपात दिल्या होत्या. त्यानुसार त्यांनी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या पुतळ्यामधील त्रुटी, सुचवलेल्या दुरुस्त्या करून क्ले प्रतिकृती तयार केली. याप्रसंगी मूर्तिकार सुभाष आल्हाट व त्यांचे सहकारी यांचा ज्येष्ठ अभ्यासक दत्ता गायकवाड यांच्या सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आनंद चंदनशिवे, कमलाकर बनसोडे, सुधीर चंदनशिवे, चंद्रकांत सोनवणे, अक्षय मस्के, भीमा मस्के उपस्थित होते.

# वाहनात झोपी गेल्यावर अज्ञात चोरट्याने मोबाईल पळवला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ फेब्रुवारी-**
पिकअप वाहन मध्ये फिर्यादी ज्ञानेश्वर बालाजी नवले (वय-२६,मु.पो.जागजी,जिल्हा धाराशिव यांचा भाऊ गोरबा हा झोपी गेला असता,त्यावेळी अज्ञात चोरट्याने १८ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २१ डिसेंबर २०२३ रोजी मार्केट यार्ड येथे घडली.याप्रकरणी ज्ञानेश्वर नवले यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून १ फेब्रुवारी २०२५ रोजी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल धुमाळ हे करीत आहे. तसेच दुसरी घटना ही जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि.१२ ऑक्टोंबर २०२४ रोजी फिर्यादी बलराम सुकलाल रावत (वय-३२,रा.मध्य प्रदेश) हे मार्केट यार्ड गेट समोर धान्याने भरलेली ट्रक पार्क करून झोपी गेलेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांचा दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे.याप्रकरणी रावत यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

**SHREE PANDURANG SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD,**
SHREEPUR-413 112, TAL-MALSHIRAS DIST. SOLAPUR (Maharashtra)
Phone-(02185)255233, 255344, Fax-255435
Email: spssk_sugar@yahoo.com & spssk_sale@yahoo.com
Website-www.pandurangsugar.com

**TENDER NOTICE**

**SALE OF SUGAR FOR EXPORT**

Sealed tenders are invited for Export of White Crystal Sugar against export policy declared by Central Government of India, from Recognized exporters, those are having IEC No. and registration with GST, DGFT & APEDA.

| Sr. No. | Particulars | Sugar Specifications |
|---|---|---|
| 1 | Grade | S2-30 White Sugar |
| 2 | Production Year | 2024-2025 |
| 3 | Quantity | 3738.0 MT |
| 4 | Packing | 50Kg pp Bags inner lining |
| 5 | Icumsa | 2024-2025 Below 100 Method-10 |
| 6 | Rate | To be quoted Ex-Mill |
| 7 | EMD | Rs. 2000/- per MT. against Confirmation |
| 8 | Inspection / Transportation | To buyers account |
| 9 | Subsidy | If any announced by State & Central Govt. will be on account of Sugar Factory. |

**Other Terms and condition for export.**
1. GST/ Central Excise "No default Certificate" is essential.
2. Exporter shall mention the name of country, where sugar will be export.
3. All Terms and conditions export policy Season 24-25 (10 LMt.) And other related export Terms and conditions binding on exporter.
4. All tenders should be reached at our Factory site on or before 15/02/25 upto 3.00PM by way of E-Mail / post or by hand

**Note- 1) Quantity of White sugar may be changed as per government Quota and rate availability.**
**2) Management reserves all the rights to any changes in above terms and accept or reject any or all the tenders without any reasons thereof.**

| DR.YASHWANT KULKARNI | KAILAS KHULE | PRASHANTRAO PARICHARAK |
|---|---|---|
| Managing Director | Vice-Chairman | Chairman |

**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक**
SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

**शेड्युल्ड - 4(2)**
**जाहीर लिलाव**

ज्या अर्थी बँकेने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माध्यमाद्वारे सिक्युरीटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् अ‍ॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट 2002 (SRFESI) च्या कलम 13 (4) अंतर्गत वसुलीसाठी कर्जदार व जामीनदार यांच्या खालील तपशीलातील तारण मालमत्तेचा पुढील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विक्रीसाठी बंद पाकिटात (बयाणा रकमेसह) निविदा/प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**विक्रीच्या अटी व शर्ती :**
1) निविदा ही बयाणा रकमेसहीत बंद पाकिटात प्राधिकृत अधिकारी, सोलापूर जनता सहकारी बँक लि. यांचे नावाने जमा करावी. 2) राखीव किंमतीपेक्षा कमी रक्कम आणि / किंवा कमी बयाणा रकमेची कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही. 3) शेड्युल मध्ये नमूद केल्यानुसार बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट/ पे ऑर्डर / RTGS / NEFT लिलावात सहभागी होण्यासाठी Authorized Officer, Solapur Janata Sahakari Bank Ltd. यांच्या नावे काढलेली असावी. 4) यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्याबरोबर विक्री किंमतीच्या 25% रक्कम (पंचवीस टक्के) त्यातून बयाणा रकमेपोटी भरलेली रक्कम वजा करून डीडी, पे-ऑर्डर किंवा RTGS/ NEFT द्वारे लगेच भरावी लागेल व उर्वरित रक्कम बँकेद्वारे विक्रीची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून 15 दिवसात किंवा बँकेने दिलेल्या मुदतवाढीच्या तारखेच्या आत भरावी लागेल. 5) विक्री 'जसे आहे, जेथे आहे व आधार विरहीत' तत्वावर केली जात आहे. 6) इतर अटी शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील.

**शेड्यूलमधील मालमत्तेची विक्री बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे खालील निर्धारित तपशिलानुसार जाहीर लिलावाद्वारे केली जाईल.**

| मालमत्ता पाहणी तारीख व वेळ | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | मालमत्ता लिलाव / विक्रीची तारीख व वेळ | लिलाव / विक्रीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| दि.07/03/2025 स.11.00 ते दु.3.00. पर्यंत | दि.१0/03/2025 स.11.00 पर्यंत | दि. 10/03/2025 वेळ स.11.30 वा. दु.2.30 वा. | सोलापूर जनता सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय 'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्ड फिंच पेठ, सोलापूर - ७ |

| क्र. | शाखा, कर्जदार व जामीनदारांचे नाव नोटीस दिनांक व रक्कम | तारण स्थावर मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत |
|---|---|---|---|
| | | | बयाणा रक्कम |
| 1 | **शाखा - नवी पेठ** **कर्जदार - श्री. उमाकांत तुळशीराम बनसोडे** पत्ता-65, सम्राट चौक, चंडक हायस्कूलजवळ, न्यू बुधवार पेठ, उत्तर सोलापूर, सोलापूर मार्केट, सोलापूर. पत्ता-फ्लट नं.111, पहिला मजला, वसंत विहार फेज-3 सोलापूर कलम 13(2) नोटीस दि. 21/09/2024, 13(4) नोटीस दि.10/12/2024 रु. 8,07,827/- + दि. 01/09/2024 पासूनचे व्याज व इतर खर्च **जामीनदार** - 1) **श्री. अंकुर अनिल पंधे** 2) **श्रीमती रोहिणी अनिल पंधे** | **श्री. उमाकांत तुळशीराम बनसोडे** यांचे मालकीची जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, ता.उत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकत यासी जुना सर्व्हे नं.489 नवीन सर्व्हे नं.505, प्लॉट नं.13 वसंत विहार फेज नं.III या इमारतीमधील, T-2 टॉवरमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.111 यांचे क्षेत्र 29.56 चौ.मी. यासी चतु:सीमा पुढील प्रमाणे - पूर्वेस - मोकळी जागा दक्षिणेस - T-2-112 पश्चिमेस - ओपन डक्ट/ कॉमन पॅसेज उत्तरेस - T-2-110 | 9,15,000/- 92,000/- |
| 2 | **शाखा - विजापूर रोड, सोलापूर** **कर्जदार - श्री. संगप्पा लायप्पा इंगळे,** मौजे मंद्रूप, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर कलम 13(2) दि.14/12/2023 कलम 13(4) दि.22/02/2024 रु. 34,35,859/- + दि. 01/12/2023 पासूनचे व्याज व इतर खर्च **जामीनदार-1) श्री.अल्लीसाब अ.रझाक शेख 2) श्री.अशोक नरसप्पा कोळी** | **श्री. संगप्पा लायप्पा इंगळे** यांचे मालकीचे जिल्हा सोलापूर, मौजे मंद्रूप, ता.दक्षिण सोलापूर येथील गट नं.597/2, सब प्लॉट क्र.69, याचे क्षेत्र 92.23 चौ.मी. ही जागा व त्यावरील सध्या असलेले व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह याचे चतुसिमा पुढील प्रमाणे- पूर्वेस - रस्ता दक्षिणेस- प्लॉट क्र.66 पश्चिमेस- प्लॉट क्र.68 उत्तरेस- रस्ता | 8,36,370/- 85,000/- |

**टीप : वरील स्थावर मिळकतीचे वर नमूद राखीव किंमत म्हणजे विक्री किंमत नसून बोलीची सुरुवात त्या किंमतीपासून होईल.**

बँकेस ज्ञात असलेल्या बोजाचा तपशील — नाही.

मालमत्तेबाबत कोणताही दावा कोणी केला असल्यास किंवा त्या स्वरूपाचा व मूल्याचा कोणताही अन्य ज्ञात तपशील — नाही.

दिनांक : 02/02/2025
ठिकाण : सोलापूर
(टीप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी-स्टेट शेड्युल्ड को.ऑप.बँक)**

## महत्त्वाचे

### राही सरनोबतचे सोनेरी पुनरागमन



**डेहराडून :** आजारपणामुळे जवळजवळ दोन वर्षे स्पर्धात्मक नेमबाजीपासून दूर असलेली कोल्हापूरची सुवर्णकन्या राही सरनोबतने ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सोनेरी वेध घेत शानदार पुनरागमन केले. सातव्या फेरीत राहीच्या पिस्तुल बिघाड होऊनही संयमी खेळ करीत तिने सुवर्ण यशाचा अचूक निशाणा साधला. अनुभवी राहीने २५ मीटर पिस्तुल प्रकारातील अंतिम लढतीत ३५ गुणांनी सुवर्णपदकाचा वेध घेतला. समरन प्रीत कौर ब्रार (पंजाब) व टी. एस. विद्याला (कर्नाटक) अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळाले. महाराष्ट्राच्या रिया थत्ते हिने चौथा क्रमांक पटकाविला. २०२२ ते मे २०२३ या कालावधीमध्ये कोरोनाच्या आजारपणामुळे एक वर्षे राही ही पूर्णपणे अंथरुणावरच होती. त्यावेळी तिची नेमबाजीची कारकीर्द संपुष्टात येणार की काय अशी भीती निर्माण झाली होती. ऑक्टोबर २०२३ पासून तिने सुरुवातीला काही मिनिटे सराव सुरू केला त्यानंतर तिने सन २०२४ ऑलिम्पिकमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, संधी हुकल्यानंतर तिने पुन्हा आपल्या तंदुरुस्तीवर अधिक लक्ष केंद्रित केले. गतवर्षापासून राहीने आपल्या तांत्रिक कौशल्यामध्ये परिपूर्णता आणण्यावर भर दिला. त्यामुळेच तिला येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अव्वल यश मिळवता आले. ती सध्या पुण्यातील बालेवाडीत सराव करीत आहे.

### वॉटरपोलोत महाराष्ट्राचे दोन्ही संघ उपांत्य फेरीत

**डेहराडून :** महाराष्ट्राच्या महिला व पुरुष या दोन्ही वॉटरपोलो संघांनी ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली. महिलांना विजयासाठी चांगलाच संघर्ष करावा लागला, पण पुरुषांनी सहज विजय मिळवित आगेकूच केली. इंदिरा गांधी स्टेडियमची जलतरण तलावावर ही स्पर्धा सुरू आहे. महिला गटात महाराष्ट्र व पश्चिम बंगाल यांच्यात अतियश रंगतदार लढत झाली. कधी तर कधी बंगालकडे आघाडी असायची मात्र, ७-७ अशा बरोबरीनंतर महाराष्ट्राने लागोपाठ २ गोल करत आघाडी घेतली. मग ही आघाडी टिकवत महाराष्ट्राच्या महिलांनी ९-७ गोल फरकाने बाजी मारली. सर्वाधिक ५ गोल करणारी मुंबईची तन्वी मुळे या विजयाची शिल्पकार ठरली. राजश्री गुगळे (२गोल), याना अग्रवाल (१), पुजा कुमरे (१) यांनीही विजयात वाटा उचलला. पुरुष गटात महाराष्ट्राने केरळचा १०-३ गोल फरकाने धुव्वा उडविला. महाराष्ट्राकडून अश्विनकुमार कुंडे व सारंग वैद्य यांनी २-२ गोल केले, तर भूषण पाटील, श्रेयस वैद्य, ऋतुराज बिडकर, अक्षयकुमार कुंडे, पीयूष सुर्यवंशी, पार्थ अंबुलकर यांनी प्रत्येकी एक गोल केला.

### दर्शन पुजारी, कौशल उपांत्यपूर्व फेरीत

**डेहराडून :** ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या बॅडमिंटनपटूंनी आपली विजयी घोडदौड रविवारपासून सुरू केली. दर्शन पुजारी, कौशल धर्ममिरने उपांत्यपूर्व फेरीत मजल मारली आहे. परेड मैदानातील हॉलमध्ये सुरू असलेल्या कोर्टवर पुरूष एकेरीच्या पहिल्या फेरीत पुण्यच्या दर्शन पुजारीने राजस्थानच्या संस्कार सारस्वतला २१-१८, २२-२४, २१-१६ गुणांनी पराभूत केले. कौशल धर्ममिरने कर्नाटकच्या रघू एम. याला १८-२१, २१-१३, २१-१२ गुणांनी हरवले. महिला एकेरीत आलिशाला पराभवाचा सामना करावा लागला.

# भारताने सलग दुसऱ्यांदा जिंकला विश्वचषक

**१९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषक**

**दक्षिण आफ्रिकेवर ९ गड्यांनी विजय**

**त्रिशा गोंगडी सामनावीर व मालिकावीर**

◆ **क्वालालम्पूर, २ फेब्रुवारी**

रविवारी येथे दक्षिण आफ्रिकेचा ९ गड्यांनी धुव्वा उडवून निकी प्रसादच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा १९ वर्षांखालील महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक जिंकला. या विजेतपदाबरोबरच भारताने क्रिकेटच्या सर्वात परिपूर्ण युवा संघाची झलक दाखवली. भारताने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ५२ चेंडू शिल्लक ठेवत ९ गड्यांनी दणदणीत विजय नोंदवला.

दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ८२ धावांत गुंडाळल्यानंतर भारताने ११.२ षटकांत १ बाद ८४ धावा काढून आपले विश्वविजेतपदाचे स्वप्न साकार केले. अष्टपैलू त्रिशा गोंगडी विजयाची शिल्पकार ठरली असून तिलाच सामन्यातील व स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.



त्रिशा गोंगडीची अष्टपैलू कामगिरी

त्रिशाने अंतिम सामन्यात १५ धावांच्या मोबदल्यात सर्वाधिक ३ बळी टिपलेत व ३३ चेंडूंत नाबाद ४४ धावांची खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. त्रिशाने या स्पर्धेत एकूण सर्वाधिक ३०९ धावा काढल्या व सर्वाधिक ७ बळी टिपलेत.

या विजयाबरोबरच भारत एकही सामना न गमावता स्पर्धा जिंकणारा पहिला संघ ठरला.

कायला रेनेकेच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यांचा हा निर्णय लवकरच अंगलट आला. भारताच्या तीन-स्तरीय फिरकी गोलंदाज दक्षिण आफ्रिकेवर अक्षरशः तुटून पडले व त्यांना ८२ धावांत गुंडाळले. सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करणारी मिके व्हॅन वुर्स्टने तेवढ्या सर्वाधिक २३ धावा केल्या, तर उर्वरित फलंदाज भारताच्या फिरकी गोलंदाजीसमोर खेळपट्टीवर टिकाव धरू शकल्या नाही. लेग-स्पिनर त्रिशा गोंगडीने १५ धावांत ३ बळी, डावखुरी फिरकी गोलंदाज आयुषी शुक्लाने ९ धावांत २ बळी, वैष्णवी शर्माने २३ धावांत २ बळी, डावखुरी फिरकी गोलंदाज पारुनिका सिसोदियाने अवघ्या ६ धावांत २ बळी, तर मध्यम गती गोलंदाज शबनम शकीलने ७ धावांत १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना भारताची सलामीवीर जी. कमलिनी (८) लवकरच बाद झाली, परंतु त्यानंतर त्रिशा गोंगडी व उपकर्णधार सानिका चालकेने नाबाद खेळी करत भारताचा विजय साकार केला. सानिकाने एअक चौकार हाणत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. त्रिशाने ३३ चेंडूंत ८ चौकारांसह नाबाद ४४ धावांची, तर सानिकाने २२ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद २६ धावांची विजयी खेळी केली. (वृत्तसंस्था)

# भारतीय संघासाठी हा खास क्षण : कर्णधार निकी प्रसाद

◆ **क्वालालम्पूर, २ फेब्रुवारी**

भारतीय १९ वर्षांखालील महिला संघाने सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकल्याबद्दल खूप आनंद झाला. भारत अव्वल स्थानावर राहील याची खात्री केल्याबद्दल आनंदी आहे. हा भारतीय संघासाठी खास क्षण आहे, असे भारतीय संघाची कर्णधार निकी प्रसाद म्हणाली.

भारताने येथे झालेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा नऊ गड्यांनी पराभव केला व सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले.

स्पर्धेदरम्यान सर्व खेळाडूंनी शांत राहण्याचा प्रयत्न केला, संयमी राहून आम्ही आमचे काम करत राहिलो, असेही ती म्हणाली.

आम्हाला विश्वचषकात जाऊन आपण काय करू शकतो हे दाखवायचे होते. बीसीसीआयने आम्हाला सर्वोत्तम सुविधा दिल्याबद्दल धन्यवाद. मी येथे उभी आहे याचा मला आनंद आहे, भारत अव्वल स्थानावर राहील याची खात्री होती व हा आमच्यासाठी एक खास क्षण आहे, असे ती म्हणाली.

दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू खरोखर चांगले खेळत आहेत, आम्ही त्यांच्याविरुद्ध बराच काळ खेळलो, त्यांनी केलेली कामगिरी बघणे छान वाटले, त्यांच्याविरुद्ध स्पर्धा करणे खरोखर छान होते, असेही ती म्हणाली.



**पुढील विश्वचषकातक मजबुतीने उतरू : रेनेके**

विश्वचषक गमावल्याच्या निराशेनंतरही दक्षिण आफ्रिकेची कर्णधार कायला रेनेके हिने संपूर्ण स्पर्धेत आपल्या संघाने केलेल्या कामगिरीचा अभिमान बाळगला आणि २०२७ च्या विश्वचषकातक आम्ही मजबूतीने उतरू, असे वचन दिले. विश्वचषक मिळाले नाही, पण मला माझे पदक मिळाले आहे, असे ती म्हणाली. संघात खूप भावना आहेत. आम्ही या क्षणासाठी खूप मेहनत घेतली आहे, असे रेनेके म्हणाली.

विश्वचषक घरी घेऊन न जाणे कठीण आहे. आम्ही पहिल्यांदाच अंतिम सामना खेळणे हा एक अभिमानाचा क्षण आहे, तो खास आहे. क्रिकेट हा सांघिक खेळ आहे व संघ व्यवस्थापनाशिवाय हे शक्य झाले नसते, असे ती म्हणाली.

मिळालेले पदक आम्हाला २०२७ मध्ये अधिक मजबूत होऊन परत येण्यासाठी प्रेरणा देत राहील, असे ती म्हणाली.

**त्रिशा गोंगडीने पुरस्कार वडिलांना समर्पित केला**

३०९ धावा आणि ७ बळींसाठी प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून निवड झालेल्या त्रिशाने हा पुरस्कार आपल्या वडिलांना समर्पित केला.

मी हे माझ्या वडिलांना समर्पित करू इच्छिते, जे येथे आहेत. मी नेहमीच स्वतःला एक अष्टपैलू मानते. माझे ध्येय देशासाठी खेळणे आणि अधिक सामने जिंकणे आहे, असे त्रिशा म्हणाली. त्रिशाला नाबाद ४४ धावा आणि १५ धावांत ३ बळी टिपल्याबद्दल सामनावीर म्हणूनही गौरविण्यात आले.

मला पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे आभार. योजना नेहमीच माझ्या ताकदीवर लक्ष केंद्रित करण्याची होती, आजही तीच गोष्ट केली. मी नेहमीच मिताली दीदीकडे (भारताची माजी कर्णधार मिताली राज) आदर्श म्हणून बघते, असे ती म्हणाली. (वृत्तसंस्था)

# ‘तू आम्हाला स्वप्ने दाखवलीस...’

**सचिनला जीवनगौरव पुरस्कार मिळाल्यानंतर युवराज सिंगची हृदयस्पर्शी पोस्ट**

◆ **नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

२०११ चा विश्वचषक विजेता भारताचा स्टार खेळाडू युवराज सिंगने त्याचा सहकारी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरसाठी एक हृदयस्पर्शी पोस्ट लिहिली. सचिन तेंडुलकरला कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल त्याने ही पोस्ट लिहीली.

शनिवारी मुंबईत बीसीसीआयच्या वार्षिक नमन पुरस्कार सोहळ्यात आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्या हस्ते महान फलंदाज सचिन तेंडुलकरला जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

युवराजने इंस्टाग्रामवर सचिनचे अभिनंदन केले. सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार जिंकल्याबद्दल मास्टर ब्लास्टर सचिनचे अभिनंदन. आमच्या पिढीतील प्रत्येक क्रिकेटपटूंसाठी, तुम्हीच आम्हाला दाखवून दिले की, अथक परिश्रम व अढळ विश्वासाने स्वप्ने पूर्ण होतात, असे युवराजने इंस्टाग्रामवर लिहिले.



आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्याकडून बीसीसीआय जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना सचिन तेंडुलकर

खेळावर व तुमच्यासोबत मैदान शेअर करण्याचा मान मिळालेल्या आमच्या सर्वांवर तुमचा प्रभाव अतुलनीय आहे. नेहमीच खूप प्रेम व आदर असो, असे युवराजने शेवटी म्हटले.

क्रिकेटचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सचिनला क्रिकेटमधील त्याच्या अतुलनीय कौशल्य व प्रभुत्वासाठी ओळखले जाते. १९८९ के २०१३ पर्यंत सचिनने जगभरातील कोट्यवधी चाहत्यांची मने जिंकलीत.

महाराष्ट्रात जन्मलेल्या या खेळाडूने १५ नोव्हेंबर रोजी १९८९ रोजी वयाच्या १६ व्या वर्षी कराची येथे पाकिस्तानविरुद्धच्या प्रसिद्ध वेगवान गोलंदाजांसमोर कसोटी पदार्पण केले, त्याच वर्षी १८ डिसेंबर रोजी त्याने पहिला वन-डे सामना खेळला. (वृत्तसंस्था)

# विदर्भाचा हैदराबादवर ५८ धावांनी विजय

**रणजी करंडक क्रिकेट**

**अष्टपैलू हर्ष दुबे सामनावीर**

◆ **नागपूर, २ फेब्रुवारी**

पहिल्या डावांत पिछाडीवर राहिल्यानतर विदर्भने जोरदार मुसंडी मारत अखेरच्या रणजी करंडक साखळी सामन्यात पाहुण्या हैदराबाद संघावर ५८ धावांनी दणदणीत विजय संपादन केला. अष्टपैलू कागिरी करणारा हर्ष दुबे सामनावीर पुरस्काराचा मनकरी ठरला.

विदर्भने हैदराबाद संघासमोर विजयासाठी २२० धावांचे लक्ष्य ठेवले होते. १ बाद २३ धावांवरून पुढे हैदराबाद संघान आपल्या चौथ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली व त्यांना विजयासाठी आणखी १९७ धावा काढण्याची गरज होती, परंतु लक्ष्य गाठण्याआधीच हैदराबादचा संपूर्ण संघ ३८.५ षटकांत १६१ धावांतच गारद झाला. विदर्भाच्या गोलंदाजांनी हैदराबाद संघाला सामन्यातून डोके वर काढूच दिले नाही, यात डावखुरा फिरकी गोलंदाज हर्ष दुबेची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरली. हर्षने अवघ्या ५७ धावांत झटपटरित्या ६ बळी टिपण्याची किमया केली. पार्थ रेखडेने २ बळी, तर यश ठाकूर व आदित्य ठाकरेने प्रत्येकी एक बळी टिपत हैदराबाद संघाला बाद करण्यात हातभार लावला.

हर्ष दुबेने पहिल्या डावात ६५ धावा केल्या व ५७ धावांत २ बळी टिपले तसेच दुसऱ्या डावात ५५ धावांची अर्धशतकी खेळी केली व ५७ धावांत ६ बळी टिपले. त्यालाच सामनावीर पुरस्कार घोषित करण्यात आला.

दोन वेळचा रणजी विजेता विदर्भ या रणजी हंगामात अपराजित राहिला. विदर्भने सातपैकी ६ सामने जिंकले व एक सामना अनिर्णीत राहिला. विदर्भने एलिट गट बमध्ये ४० गुणांसह अव्वल स्थान मिळविले आहे. या गटातून विदर्भासह गुजरातने स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविले आहे. गुजरातने ४ विजय नोंदवले व ३ सामने अनिर्णीत राखले. गुजरात ३२ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

एलिट अ गटात जम्मू-काश्मीर ३५ गुणांसह आघाडीवर असून ४२ वेळचा रणजी विजेता मुंबई संघ २९ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

एलिट गट कमध्ये हरयाणा २९ गुणांसह अव्वल, तर केरळ २८ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. एलिट गट ड मध्ये सौराष्ट्र व तामिळनाडूचे प्रत्येकी २५ गुण आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन्ही संघांनी उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविले आहे. उपांत्यपूर्व फेरीचे सामने ८ फेब्रुवारीपासून खेळले जाणार आहे. त्यानंतर १७ फेब्रुवारीपासून उपांत्य सामने व २६ फेब्रुवारी रोजी अंतिम सामना खेळला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र-त्रिपुरा सामना अनिर्णीत

**सिद्धेश वीर सामनावीर**

◆ **सोलापूर, २ फेब्रुवारी**

येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर महाराष्ट्रविरुद्ध त्रिपुरा रणजी सामना अखेर निर्मित अवस्थेत संपला. पहिल्या डावाच्या आघाडीवर महाराष्ट्र विजयी ठरला असून महाराष्ट्राला ३ गुण, तर त्रिपुराला १ गुण मिळाले.

महाराष्ट्राने आपल्या गटात १७ मिळविले आहेत. महाराष्ट्रकडून पहिल्या डावात दमदार शतक झळकविलेल्या सिद्धेश वीरला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

चौथ्या दिवशी २ बाद १३५ वरून त्रिपुराने आपला दुसरा डाव पुढे सुरू केला तेंव्हा चौथ्याच षटकात संकर पॉल (८) हितेश वाळुंजकडून त्रिफळाचीत झाला. दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १२८ धावांची भागीदारी केली. श्रीदाम पॉलने पहिल्या तासात दमदार शतक साजरे केले. त्याने मनदीपसोबत ८३ धावांची भागीदारी केली. श्रीदामला (१२८) सोळंकीने वीरद्वारे बाद केले.

दरम्यान मनदीपने संयमी अर्धशतक पूर्ण केले. मनदीप नाबाद (७७) राहिला. महाराष्ट्राच्या हितेश वाळुंजने २ बळी, तर घोष, दाढे व प्रशांत सोळंकीने प्रत्येकी एक बळी मिळविला. सामनावीर म्हणून सिद्धेश वीरची घोषणा केली. (वृत्तसंस्था)

### बीपीएल भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी स्वतंत्र समिती

◆ **ढाका, २ फेब्रुवारी**

बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये (बीपीएल) गत काही आठवड्यात झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी बांगलादेश क्रिकेट मंडळाने आपल्या भ्रष्टाचारविरोधी विभागाला (एसीयू) मदत करण्यासाठी एक स्वतंत्र चौकशी संस्था स्थापन केली आहे.

२०१३ नंतर बीपीएलमध्ये ही पहिलीच अधिकृत भ्रष्टाचार चौकशी आहे, कारण लीगला खेळाडूंचे विलंबित देयके व तिकिटांच्या वादांचा सामना करावा लागत आहे. सध्या सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, बीसीबी एसीयूला त्याच्या चौकशीत अधिक मदत करण्यासाठी स्वतंत्र चौकशी संस्था स्थापन करण्याच्या प्रक्रियेत आहे, असे बीसीबीने म्हटले आहे. बीसीबी निष्पक्ष आणि पारदर्शक क्रिकेट वातावरण सुनिश्चित करण्यासाठी समर्पित आहे व बांगलादेशमध्ये खेळाची अखंडता जपण्यासाठी ती सर्व पावले उचलत राहील. (वृत्तसंस्था)

# भारताचा टोगोवर ४-० ने विजय

**डेव्हिस चषक जागतिक गट-१ प्ले-ऑफ सामने** | **करण सिंगची पदार्पणात प्रभावी कामगिरी** | **श्रीराम बालाजी, ऋत्विक चौधरीची उत्तम कामगिरी**



सामन्यानंतर प्रतिस्पर्ध्यांशी हस्तांदोलन करताना एन. श्रीराम बालाजी व ऋत्विक चौधरी बोलीपल्ली

◆ **नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

रविवारी येथे भारतीय टेनिस संघाने डेव्हिस चषक जागतिक गट १च्या प्ले-ऑफ सामन्यात टोगोवर ४-० असा विजय मिळवला. या विजयाबरोबरच भारताने डेव्हिस चषक जागतिक गट १ मध्ये आपले स्थान कायम ठेवले. भारताच्या या विजयात एन. श्रीराम बालाजीसह पदार्पण करणारा ऋत्विक चौधरी बोलीपल्लीने जबरदस्त कामगिरी केली, तर करण सिंगने पदार्पणातच प्रभावी कामगिरी केली.

भारतीय टेनिसपटूंनी दिवसाची सुरुवात २-० अशी आघाडी घेऊन केली. भारताला दिवसाच्या तीन सामन्यांपैकी केवळ एक सामना जिंकायचा होता.

बालाजी आणि पदार्पण करणाऱ्या ऋत्विक चौधरी बोलीपल्ली या जोडीने म'लापा टिंगौ अकोमोलो व होडाबालो इसाक पाडिओ यांच्याविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात केवळ ५७ मिनिटांत ६-२, ६-१ असा विजय नोंदवला.

हाताच्या दुखापतीमुळे टोगोने त्यांचा सर्वोत्तम खेळाडू थॉमस सेटोडजीच्या जागी म'लापा टिंगौ अकोमोलोला खेळवले. अकोमोलोला स्पर्धेत एकदाही सर्व्हिस राखता आली नाही. गत वर्षी एकत्र चॅलेंजर जिंकणाऱ्या बालाजी आणि बोलीपल्ली यांचा खेळ अगदी सरळसाधा होता.

भारताने अपेक्षितपणे पहिल्या परतीच्या एकेरीच्या सामन्यात युवा टेनिसपटू करण सिंगला पदार्पणाची संधी दिली. प्रशिक्षक आदित्य सचदेवा यांच्या देखरेखीखाली २१ वर्षीय करण सिंगने पॅडिओवर ६-२, ६-३ असा विजय मिळवला. दोन्ही संघांनी पाचवा सामना न खेळण्याचा निर्णय घेतला.

आश्चर्य म्हणजे, करण खेळत असताना रोहित राजपालऐवजी कर्णधाराच्या खुर्चीवर शशिकुमार मुकुंद बसला होता. करणने अतिशय चांगली सर्व्हिस केली. तो आक्रमक होता व त्याने काही ड्रॉप शॉट्सचाही हुशारीने वापर केला. पॅडिओने काही फटकेबाजी केली, परंतु सामन्यावर करणचे नियंत्रण चांगले होते आणि त्यामुळे सामन्याच्या निकालात मोठा फरक पडला. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राचा पदकांचा सुवर्णमहोत्सव

**३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड**

**१३ सुवर्ण, २२ रौप्य, १५ कांस्यपदकांसह दुसऱ्या स्थानी झेप**

◆ **डेहराडून, २ फेब्रुवारी**

येथे आयोजित ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पुन्हा एकदा विजेतेपद जिंकण्यासाठी महाराष्ट्राने आपली पदकांची घोडदौड कायम ठेवली आहे. स्पर्धेच्या सहाव्या दिवशी महाराष्ट्राने पदकांचा अर्धशतकाचा पल्ला पार करत पदकांचा सुवर्णमहोत्सव साजरा केला. महाराष्ट्राने आतापर्यंत १३ सुवर्णांसह २२ रौप्य, १५ कांस्यपदकांची लयलूट केली आहे.

याचबरोबर महाराष्ट्राने स्पर्धेच्या पदकतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकण्याची कामगिरीही टीम महाराष्ट्राने पहिल्या दिवसापासून कायम राखली होती. सुवर्णपदकांची संख्या कमी असल्यामुळे शुक्रवारपर्यंत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर होता. सकाळच्या सत्रात खो-खोमधील २ व डायव्हिंगमधील ऋतिका श्रीरामच्या पदकामुळे सर्वाधिक १० पदके जिंकण्याचा करिश्मा महाराष्ट्र संघाने घडवून अव्वल स्थान गाठले होते.

महाराष्ट्राने जलतरणात ५, सायकलिंगमध्ये १, ट्रायथ्लॉनमध्ये २, नेमबाजीत २, खो-खोत २, स्क्वॅशमध्ये १, अशी १३ सुवर्णपदके पटकावली आहेत. जलतरणात ५ सुवर्णपदकांसह २० पदकांची कमाई केली आहे. कबड्डी, रग्बी, भारोत्तोलन, योगा खेळातही महाराष्ट्राने पदकांची कामगिरी केली आहे. एक स्पर्धाविक्रमही महाराष्ट्राच्या नावावर आहे. वैष्णव ठाकूर या २३ वर्षीय खेळाडूने भारोत्तोलनामध्ये राष्ट्रीय विक्रम नोंदवित रुपेरी कामगिरी केली आहे.

**कबड्डीत महाराष्ट्राला कांस्यपदक**

हरिद्वार : राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महिलांच्या कबड्डीमध्ये महाराष्ट्राला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. उपांत्य फेरीत महाराष्ट्राला हरयाणाकडून २४-३९ गुणांनी पराभव पत्करावा लागला. हरिव्दारमधील योगस्थळी क्रीडा परिसरात संपलेल्या कबड्डी स्पर्धेतील उपांत्य फेरीत हरयाणाने महाराष्ट्रावर मात केली. उपांत्यपूर्व फेरीत पश्चिम बंगाल हरवून महाराष्ट्राने उपांत्य फेरी गाठली होती. उपांत्य फेरीत महाराष्ट्राला बलाढ्य हरयाणा संघाकडून पराभव पत्करावा लागला. उपांत्य लढतीमधील पराभूत संघांना कांस्यपदक बहाल करण्यात येते. (वृत्तसंस्था)

# स्क्वॅशमध्ये डबल धमाका

**महिलांना सुवर्ण, पुरुषांना रौप्य**

महाराष्ट्राच्या महिला संघाने स्क्वॅशमध्ये प्रथमच सुवर्ण पदक जिंकून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा गाजविली. अंतिम लढतीत अनिका दुबे हिने जखमी असतानाही झुंज देत सुवर्णपदक खेचून आणले. पुरूष संघाने रूपेरी यश संपादन करून स्क्वॅशमध्ये डबल धमाका घडविला. या स्पर्धेत अंजली व ओम सेमवाल या बहिणभावाच्या जोडीने पदकाचा करिश्मा घडविला आहे.



सुवर्णपदक विजेते महाराष्ट्राचे महिला स्क्वॅश खेळाडू

अंतिम लढतीत महाराष्ट्राच्या महिलांनी तामिळनाडूवर २-१ अशी मात केली व सुवर्णपदक खेचून आणले. विजेत्या महाराष्ट्र महिला संघात सुनीता पटेल, अनिका दुबे, आकांक्षा गुप्ता व अंजली सेमवालचा समावेश आहे. पुरुषांच्या गटात मात्र महाराष्ट्राला तामिळनाडूकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला त्यामुळे महाराष्ट्राला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

हे महाराष्ट्राच्या महिलांचे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिलेच सुवर्ण यश आहे.

### नेमबाज आशी चौकसीचा नवीन राष्ट्रीय विक्रम



आशी चौकसी

◆ **डेहराडून, २ फेब्रुवारी**

येथे आयोजित ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रविवारी आशियाई खेळातील कांस्य विजेती नेमबाज मध्यप्रदेशची आशी चौकसी हिने महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन्सचा नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला.

२०२३ मध्ये हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत ५० मीटर रायफल ३ पोझिशन्समध्ये रौप्यपदक १० मीटर एअर रायफल सांघिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या २२ वर्षीय चौकसीने अपवादात्मक ५९८ गुण मिळवले आणि २०२३ मध्ये सिफ्ट कौर समराने प्रस्थापित केलेला ५९४ चा मागील विक्रम मोडला.

मी यासाठी खूप मेहनत घेतली आणि मला वाटते की याचे श्रेय माझे प्रशिक्षक, प्रायोजक, कुटुंब आणि मित्रांसह मला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाला देते, असे चौकसीने तिच्या विजयानंतर सांगितले. (वृत्तसंस्था)

# केसरी स्पर्धेत गोंधळ!

**पराभूत होताच शिवराज राक्षेने पंचाला लाथ मारली**

◆ **अहल्यानगर, २ फेब्रुवारी**

येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेला गालबोट लागला आहे. पृथ्वीराज मोहोळकडून पराभूत झालेल्या नांदेडच्या शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारली आणि स्पर्धेच्या ठिकाणी एकच गोंधळ झाला.

पंचांचा निर्णय मान्य न झाल्यामुळे शिवराज राक्षेला राग अनावर, कॉलर पकडली अन् पंचांना लाथ मारली. यावेळी दोन्ही कुस्तीपटूंमध्ये काहीशी झटापटही झाल्याचे दिसून आले. या गोंधळानंतर पोलिसांनी हस्तक्षेप केला.



पंचांशी वाद घालताना शिवराज राक्षे

महाराष्ट्र केसरी २०२५ ची गादी विभागात अंतिम लढत नांदेडचा शिवराज राक्षे विरुद्ध पुणे जिल्ह्याचा मोहोळ अशी लढत झाली. ही लढत पृथ्वीराज मोहोळने जिंकली. पण शिवराज राक्षेला त्याचा पराभव मान्य झाला नव्हता. त्याने पंचांच्या निर्णयाला विरोध केला. नंतर राग अनावर झाल्यानंतर त्यांने पंचांची कॉलर खेचली आणि लाथही मारल्याचे व्हिडीओमध्ये दिसून आले.

माती विभागात सोलापूर जिल्ह्याच्या महेंद्र गायकवाड विरुद्ध परभणीच्या साकेत यादव यांच्यात सामना झाली व त्यात महेंद्र गायकवाडने बाजी मारली. त्यानंतर महाराष्ट्र केसरी किताबासाठी महेंद्र गायकवाड विरुद्ध पृथ्वीराज मोहोळ यांच्या सामना रंगला. (वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोट येथील शहाजी प्रशालेत वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**अक्कलकोट, दि. २ फेब्रुवारी-**

श्री शहाजी प्रशालेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस. एन. शिंदे होते. कर सल्लागार शुभम चव्हाण, निमंत्रित सदस्य बाबासाहेब निंबाळकर, कार्याध्यक्ष आर. एस. पडवळकर, पोलीस उपनिरीक्षक सुनिता पवार-साळुंखे, विजय पवार, एम. बी. पाटील, माजी मुख्याध्यापक आर. एल. बनसोडे, एम. बी. मुगोळी, माळवदकर, ए. के. गायकवाड, विद्यार्थिनी प्रतिनिधी गायत्री उपरे जनरल सेक्रेटरी खाजप्पा नाईक, जॉईट सेक्रेटरी शरदचंद्र बावणे उपस्थित होते. स्वागत ए. बी. शिंदे यांनी केले तर अहवाल वाचन कार्याध्यक्ष आर. एस. पडवळकर यांनी केले. निवृत्त संगीत शिक्षक एम. पी. भडकुंभे यांच्या मदतीने प्रशालेतील बालचमूंनी स्वागतगीत सादर केले. सुनिता पवार यांना राष्ट्रपती पथक जाहीर झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. पारितोषिक यादीचे वाचन एस. व्ही. गोडसे, जे. एस. बगले, एस. एन. गायकवाड, एम. एस. अहिरे, एस. बी. पवार, महाडकर यांनी केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख योगेश कबाडे यांनी केले तर आभार पी. एस. पापरकर यांनी मानले. आर्या कुलकर्णीला १८ हजार ६६१ रुपयांची पारितोषिके मिळाली.



### मातोश्री ईश्वराम्मा विद्यालयात महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**पंढरपूर, दि. २ फेब्रुवारी-**

महात्मा गांधी यांच्या ७६ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री. रुक्मिणी विद्यापीठाच्या मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय व ज्युनिअर कॉलेज पंढरपूरमध्ये संस्थापक सचिवा सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्या नंदिनी गायकवाड यांच्या हस्ते व पाचवीच्या विद्यार्थ्यांकडून अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रीडा सप्ताहात विशेष प्राविण्य प्राप्त सोहम अनंत चव्हाण, ऋतुराज रावसाहेब गोड, आदित्य किशोर कवडे, समर्थ संजय शास्त्री, करण अतुल देवरासे, मेघा राजू धोत्रे, कल्याणी अर्जुन जुमाळे, मुक्ता अर्जुन जुमाळे, ईश्वरी युवराज सुतार यांच्यासह क्रीडा शिक्षिका कुमुदीनी सरदार यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सविता लोखंडे यांनी केले तर आभार विभावरी डुबल यांनी मानले. यावेळी माधुरी बोडके, फरहाना कादरी, इरफान शेख, गणेश डुबल, अभिजीत कोष्टी, पुंजाजी ढोले, विजय भंडारे, कल्याणी कांबळे उपस्थित होते.

### उपवनसंरक्षकांतर्फे सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी, वनरक्षकांचा गौरव

**सांगोला, दि. २ फेब्रुवारी-**



सन २०२४-२५ मध्ये पुणे मुख्य वनसंरक्षक, सोलापूर उपवनसंरक्षक, सहा. वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांनी वनांचे संरक्षण, वन्य प्राण्यांचे संरक्षण, मालकी क्षेत्रात अवैध वृक्षतोड कारवाई, अवैध वाहतूक, अवैध चराई, कोळसा लिलाव कारवाई करून शासकीय भरणा १८ लाख रुपये केला. तसेच एक पिकअप, मोटरसायकल सरकार जमा केली. तसेच सांगोला वनपरिक्षेत्रामधील वनरक्षक वनिता इंगोले व हटकर मंगेवाडी वनरक्षक आनंदा करंडे यांनी त्यांच्या नियत क्षेत्रात वन्य प्राण्यांचे संरक्षण करणे, रोपवन उत्कृष्ट करणे व रोपे तयार करणे हे उत्कृष्ट काम केले. याबद्दल सोलापूर उपवनसंरक्षक कुशाग्र पाठक यांनी सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक यांचा दि.२६ जानेवारी रोजी सोलापूर येथे विशेष सन्मानपत्र देऊन गौरव केला. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक विशाल चव्हाण, अजित शिंदे, सर्व वनपाल, वनरक्षक उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### भीमराव भांगे



**माढा, दि. २ फेब्रुवारी-**

भीमराव प्रल्हाद भांगे (वय ६४) यांचे हृदय विकाराच्या झटक्याने शुक्रवारी निधन झाले. पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### जनाबाई कांबळे



**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

बॉम्बे पार्क येथील जनाबाई सदाशिव कांबळे (वय १०४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर खो-खो असोसिएशनचे पंच मंडळ सचिव गोकुळ कांबळे यांच्या त्या मातोश्री होत.

### सुनील गायकवाड



**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील जेष्ठ नागरिक तथा कटारे स्पिनिंग मिलचे कामगार नेते सुनील विठ्ठल गायकवाड (वय ६०) यांचे शनिवार, दि. १ जानेवारी २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुन आणि नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर तरुण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड यांचे ते चुलत भाऊ होत.

### सुभद्रा घावटे



**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

तालुक्यातील पांढरी येथील सुभद्रा रामचंद्र घालणे (वय ७४) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष व सोलापूर जिल्हा प्रमुख तात्यासाहेब घावटे यांच्या त्या मातोश्री होत.

# पिलीव ग्रामपंचायतीची निवडणूक महायुती लढवणार

### श्री महालक्ष्मी ग्रामविकास पॅनलची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि २ फेब्रुवारी-**

आगामी होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूक माजी आ. राम सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा महायुती लढवणार असून यासाठी श्री महालक्ष्मी ग्रामविकास पॅनलची स्थापना करण्यात आली आहे. या ग्रामविकास पॅनलच्या अध्यक्षपदी प्रमोद भैस व सचिवपदी अतुल नष्टे यांची निवड करण्यात आली.

निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. श्री गणेश दर्शन व ग्रामदैवत श्री महालक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पगुच्छ घालण्यात आला. यावेळी डॉ. निलेश कांबळे, प्रवीण वाघमारे, भाजपा नेते शिवराज पुकळे, बाजीराव जाधव, अनंत जामदार, संकेत देशमुख, शिवम घोंगडे, राहुलसिंग रजपूत, अंकुश भैस, मयूर भैस, सागर भैस, प्रदीप चोबे, मनोजकुमार गुजरे, संकेत देशमुख, श्रीशैल्य जंगम, प्रवीण माने, सुशील करडे, राहुल चोबे, दत्तात्रय जनवर, अजित भैस, तानाजी सुळे, कुबेर भैस, संतोष रेळेकर, जयशिव गलांडे, विजय भैस, फिरोज शेख, संजय नाईक,इकबाल जमादार विनायक चोबे ,सुरज जामदार, सुनील भिसन, संतोष कोरे, ओंकार मोरे, सुयश पाटील, अप्पा भैस, दिगंबर भैस, यश उरवणे, सागर भैस, राम गलांडे यांच्यासह भाजपा तसेच श्री महालक्ष्मी ग्रामविकास पॅनलचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



माळशिरसचे माजी आ. रामभाऊ सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीव गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी काम करणार असून पॅनलच्या माध्यमातून येणारी ग्रामपंचायत निवडणूक लढविणार आहे.
-प्रमोद भैस, अध्यक्ष, श्री महालक्ष्मी ग्रामविकास पॅनल

## निर्भया पथकाकडून वामनराव शिंदे विद्यालयात मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ फेब्रुवारी-**

सांगोल्यातील वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयातील विद्यार्थ्यांना उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, मंगळवेढा अंतर्गत निर्भय पथकाच्या पोलिस उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस कविता सावंत, अमोल राऊत यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर संस्था सचिव निलकंठ शिंदे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना निर्भया पथकाचे कार्य समजावून सांगितले. शाळेत, आपल्या परिसरात जर आपणास कोणी जाणीवपूर्वक त्रास देत असेल तर त्याची कल्पना आपल्या शाळेतील शिक्षक, पालकांना किंवा जवळच्या पोलिस स्टेशनला कळविण्याचे अथवा शाळेतील तक्रार पेटीत टाकावी असे आवाहन केले. महिला व मुलींसाठी रात्री अपरात्री पोलिसांची मदत लागली तर ११२ हा मोफत मदत क्रमांक डायल करून मदत घेण्याचे आवाहन केले. यावेळी बॅड टच, गुड टच असे स्पर्श विद्यार्थिनींना समजावून सांगितले. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

## गांजा, हातभट्टी दारू जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. २ फेब्रुवारी-**



अवैधरित्या गांजा व हातभट्टी दारू ची विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्या अड्डा वर धाड टाकून ६०० ग्राम गांजा व ११० लिटर हातभट्टी दारू जप्त केली आहे.

हरणशिकारी कॉलनी येथे ही धाड घालण्यात आली होती या प्रकरणी आनंद मोहन चव्हाण (वय ३७), रियाज अब्दुल नरसनगी (वय २३) यांना अटक करून साठ हजार किंमतीचे ६०० ग्राम गांजा जप्त करण्यात आले तर वासु राजू चव्हाण (वय २५) याला अटक करून त्यांच्याकडून ११० लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पोलिस प्रमुख लक्ष्मण निंबरगी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

## अल्पवयीन मुलीला पळवून नेले; अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२ फेब्रुवारी-**

बठाण परिसरातून एका पंधरा वर्षीय ऊसतोड कामगाराच्या अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून तीच्या आईच्या तक्रारीवरून या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.



यातील फिर्यादी हे मराठवाडा विभागातील असून ते ऊस तोडण्यासाठी बठाण परिसरात कोप घालून रहावयास आहेत. दि.२९ रोजी रात्री ११.०० ते पहाटे ४.०० च्या दरम्यान,फिर्यादीची पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी फूस लावून कायदेशीर रखवालीतून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून आईच्या तक्रारीवरून अज्ञाताविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. रंग सावळा, बांधा सडपातळ, उंची १५२ सेंमी, चेहरा उभट, केस काळे, नाक सरळ, अंगात लाल रंगाचा टॉप व काळ्या रंगाची पँट तसेच राखाडी रंगाचा स्वेटर अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. याचा अधिक तपास पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक विनोद लातूरकर (मोबा.९०८२९२०५८३) हे करीत आहेत.

## टीईटीचा अंतरिम निकाल जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत १० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा अंतरिम निकाल जाहीर करण्यात आला आहे.

परीक्षा परिषदेमार्फत टीईटी परीक्षा पेपर १ (इ. १ ली ते ५ वी) व पेपर २ (इ. ६ वी ते ८ वी) साठीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्यातील विविध केंद्रांवर ३ लाख २९ हजार ३४६ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. https://mahatet.in या संकेतस्थळावर उमेदवारांना लॉगिन करून निकाल पहावयाचा आहे. या परीक्षेच्या निकालाच्या अनुषंगाने गुण पडताळणी करावयाची असल्यास अथवा त्रुटी, आक्षेप असल्यास संकेतस्थळावर ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत उमेदवारांच्या लॉगिनमधून ऑनलाईन पद्धतीने नोंदविता येणार आहे.

## मोडनिंबमध्ये बुधवारपासून भागवत कथा सप्ताह

### बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर करणार निरुपण



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता. माढा) येथे बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या संगीतमय भागवत कथा सप्ताहास बुधवार (दि.५) फेब्रुवारीपासून प्रारंभ होत आहे.

राष्ट्रसंत सद्‌गुरू श्रीपादबाबा यांच्या २७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त या संगीतमय सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संगनबसवेश्वर मठ येथे बुधवारी ५ ते मंगळवारी ११ फेब्रुवारी या कालावधीत हा सप्ताह पार पडणार आहे. या सप्ताहाचे आयोजन समस्त मोडनिंब ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. रोज रात्री सात ते दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात टेंभुर्णी, मोडनिंब, अरण, बावी, गिड्डेवाडी, आष्टी, तेलंगवाडी, शेटफळ, जाधववाडी, तुळशी, बैरागवाडी, भेंड येथील हजारो भाविक सहभागी होणार आहेत. बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या प्रासादिक अमृत वाणीतून निरुपण होणाऱ्या कथा श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. याचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे.

## कुंकूलोळ हायस्कूलमध्ये भरला आनंद बाजार



### ओम शांतीचा घोष करत मोहनभाईंनी केले उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

येथील शेठ अगरचंद कुंकूलोळ हायस्कूलच्या मैदानात आज खेरदीसाठी झुंबड उडाली. निमित्त होते विद्यार्थी आनंद बाजाराचे. सांस्कृतिक विभाग प्रमुख सहशिक्षक अरविंद कोळी व रविंद्र उन्हाळे यांनी मुख्याध्यापक दिपक उंबरदंड व पर्यवेक्षक सुनिता महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थी आनंद बाजाराचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांनी भाजीपाला, फळफळावळ, खाद्यपदार्थ, कापडी पिशव्या यांच्यासहीत अनेक वस्तू विक्रीस ठेवल्या होत्या. विद्यार्थ्यांचा उत्साह ओसांडून वहात होता. आपल्या पाल्यांना प्रोत्साहन देण्यास पालकांनी ही गर्दी केली होती. पालक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संस्थाचालक विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधत या बाल विक्रेत्यांकडून खरेदी करत होते. त्याना व्यवहार ज्ञानाचे धडे ही देत होते. खरेदीदाराने दिलेले एकूण पैसे वजा वस्तूची विक्री किंमत पहाता विद्यार्थी उरलेले सुट्टे पैसे व्यवस्थित हिशोब करून देतात का हे ही अजमावले जात होते.

या आनंदबाजाराचे उद्घाटन ब्रह्माकुमारी विद्यालयाचे वरिष्ठ कुमार मोहनभाई बुचडे यांच्या हस्ते झाले. मोहनभाईनी ओम शांती महामंत्राचे उच्चारण करत आनंद बाजाराच्या उद्घाटनाची फित कापली. उपस्थितांनीही ओमशांती मंत्राचे उच्चारण करत प्रतिसाद दिला. यावेळी संस्थेचे सचिव महादेव बुचडे यांची प्रमुख उपस्थिती होती. आनंद बाजाराच्या उद्घाटनापूर्वी सावित्रीबाई फुले व संस्थापक भगवानराव बुचडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेचे संचालक रावसाहेब मनगिरे यांनी या आनंद बाजारास सदिच्छा भेट देवून शिक्षक व विद्यार्थी यांचे कौतुक केले.



## एस. पी. स्कूलमध्ये बाजार डे, फूड फेस्टिव्हल उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २ फेब्रुवारी-**

नांदोरे (ता. पंढरपूर) येथील पायल फाउंडेशन नांदोरे संचलित एस. पी. पब्लिक स्कूलमध्ये बाजार डे व फूड फेस्टिव्हल मोठ्या उत्साहात पार पडला.

उद्घाटन पालक तानाजी भिंगारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष डॉ. संतोष वलगे, सचिव अश्वराज वाघ, खजिनदार विक्रम भिंगारे, प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण, निर्मला भिंगारे, स्वाती वाघ उपस्थित होते. करकंब पोलीस स्टेशनचे सपोनी सागर कुंजीर व त्यांच्या सहकाऱ्यांनी या आनंद बाजाराला भेट दिली. विद्यार्थ्यांनी भरवलेल्या बालआनंद बाजार तसेच फूड फेस्टिव्हलमध्ये विद्यार्थ्यांनी विविध वस्तू, खाद्यपदार्थ व भाजीपाला विक्री करीत खरेदी विक्रीचा अनुभव घेतला. भाजीपाला खरेदीसाठी पालक व गावकऱ्यांनी मोठा उत्साह दाखवला. शेतातील स्वच्छ, ताजा भाजीपाला, विविध फळे, विविध वस्तूंचे स्टॉल लागले होते. या आनंद बाजारात अवघ्या तीन तासात २२८ स्टॉलच्या माध्यमातून दोन लाख४२ हजार ३०० रुपयांची उलाढाल झाली. पाचवी आदर्श वलगे खेळणी स्टॉलमधून ५७२० रु. विक्री प्रथम, सातवी प्रणव सावंत इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिकच्या स्टॉलमधून ३७५० रु. विक्री द्वितीय, सातवी वेदांत वलगे बुक स्टॉलमधून ३,६०० रु. विक्री करून तृतीय क्रमांक पटकाविला. स्वस्त दरात ताज्या भाजीपाला मिळाल्याने पालकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. मकरसंक्रांतीचे औचित्य साधून मातापालकांसाठी हळदी-कुंकूचा पार पडला.

# करमाळ्यातील कुगावमध्ये साकारलीय 'एआय'वर शेती

### कृषी विभागासह शेतकरी, अभ्यासकांच्या वाढू लागल्या भेटी; मिळू लागली नवनवीन माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २ फेब्रुवारी-**

कुगाव (ता. करमाळा) येथील धुळाभाऊ कोकरे हे एआयच्या माध्यमातून शेती करत आहेत. या शेतीचे सगळ्यांना कौतुक आणि उत्सुकता लागली असून, स्थानिकांबरोबरच बाहेरचे शेतकरीही शेतीला भेट देऊन नव्या तंत्रज्ञानाची माहिती घेत आहेत.

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने जिल्हा मासिक चर्चासत्र व प्रक्षेत्र भेटीचा कार्यक्रम कुगाव येथील कोकरे आयलॅन्ड येथे द्रोपदी शेतकरी गट व कृषी विभागाने घेतला. द्रोपदी शेतकरी गटाच्या माध्यमातून शेती क्षेत्रात करत असलेले विविध प्रयोग, विविध डेमो प्लॉट, शेतीत एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, केळीची परदेशातील निर्यात, शेतीचा पर्यटनासाठी वापर, मंडल कृषी विभाग जेऊर व तालुका कृषी अधिकारी कार्यालय करमाळा यांच्या मार्गदर्शनातून बदल करण्यात आलेली पीक पद्धती, अनुदानातून देण्यात आलेल्या अवजारांचा शेतातील प्रत्यक्ष वापर यांची अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले अन् मार्गदर्शन केले. वनभोजनाचा आस्वाद घेऊन कोकरे आयलॅन्ड येथील उजनी बॅकवॉटर परिसरातील बोटिंगचा आनंद घेतला. शेतकऱ्यांसह नागरिक शेतीला भेट देत आहेत.

यावेळी कांतप्पा खोत, अभिजीत घेडे, संजय वाकडे, राम चंद्र माळी, देवराव चव्हाण, हर्षद निगडे, अविनाश चंदन, दीपाली जाधव, आबासाहेब रुपनवर, मंगळुरे, जीवन जगदाळे, सुधीर काशीद, सांगळे, मधुकर मारकड, काशिनाथ राऊत, अनिल चव्हाण, देवीदास चौधरी, पंकज मडावी, चंद्रकांत सरडे, विजय कोकरे, नवनाथ कोकरे, किसन कोकरे उपस्थित होते. स्वागत द्रोपदी शेतकरी गटाचे अध्यक्ष धुळाभाऊ कोकरे यांनी केले.





## संक्षिप्त वृत्त



### चंद्रकांत गोब्बूर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**अक्कलकोट, दि.२ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या जिल्हास्तरीय जीवनगौरव पुरस्कार विभागीय शिक्षक आ. प्रा.जयंत आसगावकर आणि माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या हस्ते नागणसूर येथील एच. जी. प्रचंडे माध्यमिक प्रशालेचे माजी प्राचार्य चंद्रकांत गोब्बूर यांना देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार विनायक मगर, शांभवी कल्याणशेट्टी, म्हाळप्पा सुरवसे, मल्लिकार्जुन पाटील, महेश इंगळे, अमोलरजे भोसले, कल्लाप्पा बुळ्ळा, काशिनाथ धानशेट्टी, राजकुमार उमराणीकर, मोहन गुरव, राजकुमार गोब्बुर आदी मान्यवर उपस्थित होते. चंद्रकांत गोब्बूर ठाणे, नागणसूर येथे ३२ वर्षे सेवा बजावली. त्यांनी पुणे, नागपूर, कोल्हापूर, अमरावती, मराठवाडा आदी विभागात कन्नड माध्यमाचे अनुवादक म्हणून काम पाहिले आहे. पुस्तक निर्मिती कमिटीत काम पाहिले आहे. त्यांचे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, केंद्र प्रमुख शिवाजी शिंदे, प्राचार्य शंकर व्हनमाने, माजी प्राचार्य महादेव लिंबितोटे, संजयकुमार गंगदे, बसवराज धानशेट्टी यांनी अभिनदन केले.



### मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी प्रभाकर बंदीछोडे यांची निवड

**अक्कलकोट, दि.२ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी प्रभाकर बंदीछोडे, सचिवपदी सिद्धय्या स्वामी, उपाध्यक्षपदी शिवराज किलजे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. श्रीशैल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली. लक्ष्मण चलगेरी उपस्थित होते. विद्या सचिवपदी सोनाली सुतार, कोषाध्यक्षपदी अशोक कलशेट्टी, क्रीडा प्रमुखपदी अनिल देशमुख, प्रसिध्दी प्रमुखपदी शंकर व्हनमाने, कार्यकारणी सदस्यपदी मलकाप्पा भरमशेट्टी, महेश चानकोटे, महादेव माने, आसिफ मुजावर, सिद्रामप्पा हडपद, वेंकटेश बोकडे आर्दीची निवड करण्यात आली.

### राज्य पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारिणी सदस्यपदी स्वामीराव गायकवाड

**अक्कलकोट, दि. २ फेबुवारी-**



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्यपदी अक्कलकोट येथील पत्रकार स्वामीराव गायकवाड यांची निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे होते. याप्रसंगी हेमंत देसाई, संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष रणधीर कांबळे, कार्याध्यक्ष निलेश सोमणी, सोशल मीडिया अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव आदी उपस्थित होते.



### शिवसेना उबाठा अक्कलकोट शहर प्रमुखपदी राम जाधव

**अक्कलकोट, दि.२ फेब्रुवारी-**

अक्कलकोट शहर उबाठा शिवसेना प्रमुखपदी राम जाधव यांची तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी निवड करून निवडीचे पत्र दिले. विधानसभा संपर्कप्रमुख उमेश सारंग, जिल्हाप्रमुख अमर पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोटमध्ये शिवसेना वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे राम जाधव यांनी सांगितले.

### प्रिसीजन वाचन अभियान कार्यक्रमात शुक्रवारी संजय जोशी यांची मुलाखत

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**



प्रिसीजन वाचन अभियान कार्यक्रमात शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात कांदबरीकार, उत्तम वक्ते संजय भास्कर जोशी यांची मुलाखतीचा कार्यक्रम होणार आहे. नावीन्यपूर्ण विषयांवरचं अत्यंत बांधीव लेखन हे त्यांच्या लेखनाचं वैशिष्ट्य. 'नचिकेताचं उपाख्यान' या त्यांच्या पहिल्याच कादंबरीला ना. सी. फडके पुरस्कार मिळाला होता. काळजातील खोल घाव, रेणुका-मृणालची उपाख्याने, स्वप्नस्थ, श्रावणसोहळा, दी कॅचर इन दी राय अशी त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत.

# महिलांनो, व्यावसायिक मानसिकता सिद्ध करा : ॲड. चव्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

मानिनी म्हणजे स्वाभिमानी. प्रत्येक महिलेने स्वाभिमानाने जीवन जगले पाहिजे. संपूर्ण जगाची निर्मिती महिला करते. तिला जगताना दुसऱ्याच्या आधाराची गरज का वाटावी? केंद्र व राज्य शासनाच्या कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून महिलांसाठी अनेक मोफत कोर्सेस उपलब्ध आहेत. यासाठी प्रशिक्षण व मानधन पुरविले जाते. महिलांना दहा ते वीस लाखापर्यंतची कर्जे कोणत्याही तारणाशिवाय दिली जात आहेत. याचा फायदा घेऊन व्यावसायिक मानसिकता सिद्ध करा, असे आवाहन पिंपरी चिंचवड येथील मानिनी फौंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा ॲड. भारतीताई चव्हाण यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त जिजाऊ सावित्री रमाई महिला बळ विकास समितीच्यावतीने रविवारी महिला मेळावा तथा महिला स्वयंरोजगार अभियान



> **मुलींबरोबरच मुलांवरही संस्कार करा**
>
> स्वप्न झोपेत पाहू नका. पाहिलेले प्रत्येक स्वप्न साकार होत असतात. श्रम, कर्तृत्व, निष्ठा व विश्वास या जोरावर स्वप्ने पूर्ण होतात. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात कर्मवीरांचे योगदान उल्लेखनीय आहे. महिला सुरक्षितता हा चिंतेचा विषय आहे. मुलींबरोबर मुलांवरही संस्कार करा. महिला धोरण व कायदे आहेतच. परंतु गरज आहे ती आपल्या मानसिकतेची. कायद्याची माहिती घेऊन अन्याय व अत्याचार दूर करा. स्वतःला बदला. काळाबरोबर चाला. स्वतःला माणूस म्हणून स्वीकारा. स्वतःचा आत्मविश्वास वाढवा, बाजारपेठेचे व वस्तू विक्रीचे कौशल्य शिका आणि व्यवसाय सुरु करा, असे सुवर्णा पवार-खंडागळे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त सुवर्णा पवार-खंडागळे होत्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार तथा सांस्कृतिक प्रमुख जयकुमरबापू शितोळे, राजेंद्र पवार, डॉ. मीराताई यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

ॲड. चव्हाण यांनी बचतगट महिलांना आर्थिक सक्षमतेची हमी देतात. पुरस्कार मिळण्याची खंत न बाळगता पुरस्कार प्रदान करा. देण्याच्या भूमिकेत काम करुन सक्षमीकरण करा. महाराष्ट्र शासनाने महिलांचे नाव अधिकृत कागदावर लावण्यास परवानगी दिली आहे. उद्योग व व्यवसाय उभे करा. ते चालविण्यासाठी प्रशिक्षण घ्या. संस्थेने कौशल्य विकास केंद्र सुरु करावे. याकामी सर्वेतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. नेतृत्व, आत्मविश्वास, जिद्द या महिलांमध्ये असतात. त्या जोरावरच त्यांनी पुढे येणे गरजेचे आहे.

नकारात्मक व संकुचित मानसिकता बाजूला ठेवून काम करा. मुली व महिलांना शिक्षणासाठी प्रेरित करा. व्यावसायिक मानसिकता सिद्ध करा. नियोजन, निर्णयक्षमता, आत्मविश्वास, संघटन याची रुजवणूक करा. महिला ही समाजाची व देशाची शक्ती आहे. या शक्तीला सकारात्मक दिशेने नेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक समितीच्या अध्यक्षा प्रा. एस. एस. सुरवसे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापिका कविता धावणे व प्रा. ज्योती यादव यांनी करुन दिला. सन्मान पत्राचे वाचन डॉ. एल. आय. राठोड यांनी केले. प्रा. मंजुषा श्रीमंगल यांनी समितीचे अहवाल वाचन केले. आभार डॉ. दैवशाला रसाळ यांनी मानले.

# ग्रामपंचायतींची कोटींची उड्डाणे!

**मालमत्ता करापोटी तब्बल ३२ कोटी २८ लाख येणेबाकी; बीडीओंसह ग्रामविकास अधिकाऱ्यांना वसुलीच्या सक्तसूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

जिल्ह्यातील सुमारे १ हजार २४ ग्राम पंचायतींची मालमत्ता करापोटी नागरिकांकडे ३२ कोटी २८ लाखांमध्ये १४ लाखांची रक्कम येणे बाकी आहे. सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ग्रामपंचायतींकडील मालमत्ता कराची डिसेंबर अखेर ८१ टक्के वसुली झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार फेब्रुवारी व मार्चमध्ये कर वसुलीसाठी ग्रामपंचायतनिहाय शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. तर उर्वरित कराची वसुली पूर्ण करण्याच्या सूचना गटविकास अधिकारी, ग्रामविकास अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, अशी माहिती ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी दिली.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील ग्राम पंचायतींच्या मालमत्ता कराची नोव्हेंबरअखेर मालमत्ता कराची थकबाकी व चालू मागणी अशी

> **तालुकानिहाय मालमत्ता कर वसुलीची आकडेवारी (लाखांत)**
>
> अक्कलकोट-३८६.१४, बार्शी - ३८८.२५, करमाळा-३२५.३, माढा-३७७.०८, माळशिरस-४४४.८, मंगळवेढा- २०१.०३, मोहोळ-२२०.३६, पंढरपूर- २५२.५४, सांगोला-२०३.८४, उत्तर सोलापूर-१९८.८९, दक्षिण सोलापूर- २३०, एकूण - ३२२८.१४ इतकी वसुलीचे टार्गेट देण्यात आले आहे.

एकूण ३२ कोटी २८ लाख १४ हजार इतकी झाली आहे. त्याची टक्केवारी ६४.०९ इतकी आहे. तर डिसेंबरअखेर ८१ टक्के करवसुली झाली असून, उर्वरित थकबाकी व चालू मागणी वसुलीसाठी शिबिरांचे आयोजन करणार असल्याचे ग्रामपंचायत विभागाने सांगितले.



जिल्ह्यात १ हजार २४ ग्रामपंचायती आहेत. त्यांच्याकडील मालमत्ता करापोटी ३१ मार्चअखेर ५ कोटी ४२ लाख ९९ हजारांची थकबाकी होती. तर ३१ मार्च २०२४ अखेर ६ कोटी ९० लाख ५९ हजार इतकी थकबाकी होती. थकबाकी व २०२४-२५ मधील चालू कर मागणी अशी एकूण ५० कोटी ३७ लाख २४ हजारांची मागणी आहे. त्यापैकी १६ कोटी ७७ लाख २७हजारांची थकबाकी तर चालू मागणीपैकी ११ कोटी ४२ लाख ३४ हजारांची वसुली झाली आहे. नोव्हेंबरअखेर एकूण ३२ कोटी २८ लाख १४ हजारांची वसुली झाली आहे.



# पंढरीच्या वारीतून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

**आत्माराम घाटगे : अक्कलकोटच्या वटवृक्ष मंदिरात दिंडी पूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. २ फेब्रुवारी -**

पंढरीची वारी ही राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. लाखो विठ्ठल भक्त पंढरीला वारीसाठी एकत्र येतात.हा मोठा भक्तीचा महिमा आहे, यामुळे पंढरीची वारीचा एकदा तरी अनुभव घ्या असे प्रतिपादन वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे विश्वस्त सचिव आत्माराम घाटगे यांनी केले.

वटवृक्ष मंदिरात श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे विश्वस्त सचिव आत्माराम घाटगे यांच्या हस्ते दिंडीपूजन झाले, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी हभप मारुती महाराज कासार, हभप लक्ष्मी मुळजे, श्रीमुख जगदाळे, धनराज ढगे, अनंत पाटील, बाबुराव पांचाळ, बीदर जिपच्या माजी सदस्या मुक्ताबाई मदने आदी उपस्थित होते.

माघ वारीसाठी तुळजापूर, भालकी, मटकी, घोटाळ, आळंद (कर्नाटक) मटकी उमरगा, अक्कलकोट तालुक्यातून सुमारे १५० विठ्ठल भक्तांना विठ्ठलाच्या भेटीसाठी आस लागून राहिली आहे. पंढरीकडे त्यांनी वटवृक्ष स्वामी समर्थाचे दर्शन घेऊन प्रयाण केले. रविवार पायी दिंडीचा प्रथम मुक्काम वळसंग, दुसरा मुक्काम सोलापूर, तिसरा मुक्काम तिऱ्हे, चौथा मुक्काम अंकोली, पाचवा तारापूर नाला सुस्ते, सहावा पंढरपूर येथे होणार आहे.

या पायी दिंडी सोहळ्यात दिंडीचालक दिनकर पाटील, अप्पाराव चव्हाण, राजेद्र मोरे-पाटील, शशीकांत मोरे-पाटील, व्यंकट पाटील, धोंडीराम पाटील, मधुकर महाराज, शिवाजी केदारे, अण्णाराव पाटील, जगन्नाथ सुरवसे, बाळासाहेब मोरे, हरी मुळे, भारती पाटील, सचिन सावकार, सागर सावकार, संग्राम सोमवंशी, रविंद रोट्टे, पांडुरंग शिंदे, बाळू कोकरे, पद्माकर पाटील, सुभाष कोकरे, मारुती चव्हाण, मुरलीधर पाटील, अनंत पाटील, बालाजी बिराजदार, मुरलीधर बिराजदार, राजू आवले, सदानंद जाधव, अविनाश जाधव, मंगलाबाई गोवले, मंगलाबाई जाधव, सुधाकर नागदे, चंद्रकांत गवळी, तुकाराम थोराजी, करण पाटील, अमोल ढगे, चित्रसेन ढगे-पाटील सहभागी आहेत.

# आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी घेतला आढावा

**शिरभावी नळपाणी पुरवठा योजना, जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, आयोग्य केंद्रांसह विविध विषयांवर चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ फेब्रुवारी-**

शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी बचत भवन, पंचायत समिती, सांगोला येथे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे उपस्थितीत तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती अधिनस्त विभाग प्रमुख तसेच विस्तार अधिकारी यांची विविध विकास कामासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.



यावेळी गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, सहा. गटविकास अधिकारी वसंत फुले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अविनाश खांडेकर, बांधकाम उपअभियंता अतुल लेंडवे, पाणीपुरवठा उपअभियंता सेनापती केदार, बाल विकास प्रकल्प अधिकारी अभिजीत मोलानी, गटशिक्षणाधिकारी अमोल नवले, पंचायत विस्तार अधिकारी देवराव पुकळे, अमोल तोडकरी, सांख्यिकी विस्तार अधिकारी पुंडलिक गंगदे, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, शिक्षण विस्तार अधिकारी अमोल भंडारी उपस्थित होते.

शिरभावी नळपाणी पुरवठा योजना, जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरुस्ती, औषध साठा आरोग्य केंद्रातील सोयी सुविधा, सार्वजनिक शौचालय, शालेय पोषण आहार, शाळा इमारत बांधकाम निर्लेखन करावयाच्या इमारती, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, राज्य पुरस्कृत घरकुल योजना रमाई, घरकुल योजना जागा बक्षीस पत्र व जागा अडचणी, घरपट्टी व पाणीपट्टी वसुली, शाळा अंगणवाडी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व संभाव्य पाणी टंचाई यासह अकांक्षीत तालुका याबाबत कार्यक्रमाच्या फेलो अनुजा गावडे यांनी या विषयावर बैठकीत चर्चा केली व त्यातील अडचणी जाणून घेण्यात आल्या. उमेशचंद्र कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली २०२५-२६ जीपीडीपी आराखडा वेळेत पूर्ण केले बद्दल ग्रामपंचायत सरपंच व अधिकारी यांचे अभिनंदन देवराव पुकळे यांनी केले. मिलिंद सावंत यांनी आभार मानले.

# लावणीच्या रंगात रंगले लावणी रसिक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ फेब्रुवारी-**

लावणी स्पर्धेच्या आजच्या दुसऱ्या दिवशी शीतल पूजा भूमकर यांच्या जय अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी या संघाने लावणी कलावंत व अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या जीवनावर आधारीत व लावणी कलेमध्ये त्यांचे असणारे योगदान यावर आधारीत 'दु:ख वाटलं कलावंत मधुताईचं...' ही लावणी सादर करीत अकलूजच्या रंगमंचाचा इतिहास मांडला.

याला खुर्चीचा मोह माया, राजकारण गेलं वाया...राजकारणावर भाष्य करत राजकीय पक्षांची सत्तेसाठी होत असलेली चढाओढ दर्शविणाऱ्या लावणीमधून जय अंबिका कला केंद्र सणसवाडी यांनी राजकीय परिस्थितीवर ओरखडे ओढले. दोन दिवस चाललेल्या या लावणी स्पर्धेच्या रंगामध्ये महाराष्ट्रासह इतर राज्यातून आलेले लावणी रसिक रंगून गेले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती शंकरनगर व प्रताप



क्रीडा मंडळ अकलूज यांचे वतीने स्मृती भवनच्या बादशाही रंगमंचावर लावणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या पहिल्या व दुसऱ्या दिवशी स्मृतीभवन कलारसिकांनी भरून गेले होते. यावेळी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, आमदार दिलीप सोपल, जयसिंह मोहिते-पाटील, प्रांताधिकारी विजया पांगारकर, मंडलाधिकारी मनिषा लकडे, स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्यासह लावणी रसिक उपस्थित होते.

न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, केडगांव चौफुला यांच्या 'घुंगरा संगं केला मी संसार' या बैठकीच्या लावणीस कलारसिकांची उत्कृष्ट दाद मिळाली. या केंद्राने 'याल म्हणून वायदा केला, नाही आला एकटी' व 'दोघांचे गुण आमचे जुळले समसमान, भैरोबाची खाण, राया माझा पैलवान' या लावणी सादर करून रसिकांना मंगत्रमुग्ध केले. नटरंग कला केंद्र, मोडनिंब या संघाने 'तुझ्या पायाची धूळ आहे मी रसिका, घेऊन निघाले सुर, ताल ठेका ही लावणी सादर केली. त्यानंतर 'राजं पुन्हा जन्म घ्या, दृष्ट लागली महाराष्ट्राला' ही वास्तवावर आधारीत लावणी सादर करून सर्वांच्या डोळ्यात अंजन घातले.

> गेली २८ वर्षे लावणी स्पर्धा जयंती समारंभ समितीच्या माध्यमातून सुरू आहेत. त्यासाठी थिएटर मालक, कलाकार, प्रेक्षकांनी सहकार्य केले आहे. पुढील वर्षी अ आणि ब गटामध्ये स्पर्धा होणार असून तो कार्यक्रम एकत्रच होणार आहे. कलाकार टाळ्यांचा भुकेला असतो. टीव्ही, मोबाईल आणि डिजिटल युगाच्या जमान्यात ही पारंपारिक कला जिवंत राहणे गरजेचे आहे.
>
> **- जयसिंह मोहिते-पाटील, संयोजक**

शीतल पूजा भूमकर या पार्टीने सादर केलेली 'मी घसरले रे, हात मला दे कान्हा' ही गवळण अप्रतिम झाली पतीच्या विरहाची 'पती विन चैन नसे जीवाला...' ही लावणी सादर केली. 'मला पाहिजे अस्सल वस्ताद, ज्याने केला बैलगाडीचा नाद' ही फक्कड ग्रामीण भागाची लावणी सादर केली.

'मला खुर्चीचा मोहमाया, राजकारण गेलं वाया...' ही राजकारणावर भाष्य करणारी लावणी सादर करताच उपस्थितांनी वन्समोअरची मागणी करीत टाळ्यांच्या गजरात लावणीस दाद दिली. दि.२ फेब्रुवारी रोजी अर्चना वालवणकर पिंजरा सांस्कृतिक कला केंद्र, वेळे, कालिका लोकनाट्य सांस्कृतिक कला केंद्र, चोराखळी, शामल, प्रिया, स्नेह लखनगांवकर नटरंग सांस्कृतिक कला केंद्र, मोडनिंब, न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, यवत या संगीत पार्ट्यांनी आपली कला सादर केली. यावेळी पार्टी मालक अशोकराव जाधव, किसनआप्पा जाधव, सुरेश हलकुडे, सुरेखाबाई पवार, नृत्य दिग्दर्शक योगेश देशमुख, महेंद्र बनसोडे, आकाश गाडे, गोपाळ पाटणकर, रेश्मा परितेकर, वर्षा परितेकर, रूपा परभणीकर यांचा सन्मान करण्यात आला.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महापालिकेतर्फे ऋषी मार्कंडेय महामुनी यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने थोर ऋषी मार्कंडेय महामुनी यांच्या जयंती दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील कार्यालयामध्ये थोर ऋषी मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेस महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार,अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### एसटी स्टँड परिसरातून कार पळवली

**सोलापूर दि. २ फेब्रुवारी-**

एसटी स्टँड परिसरा जवळील गीता लॉज येथे कार क्रं.केए.३२.झेड.७६३३ ही कार पार्क करून ठेवलेली असताना फिर्यादी सचिन राघवेंद्र हरवाळकर (वय-४९, रा.शहाबाद रिंग रोड जवळ, राजेंद्र कॉलनी बालाजी नगर, कलबुर्गी,कर्नाटक) हे झोपी गेल्यानंतर त्यांच्या ओळखीचा मंजुनाथ रुकमय्या गुत्तेदार (रा. कादरी चौक, गुलबर्गा,कर्नाटक) याने चार चाकी वाहनाची चावी घेऊन वाहन घेऊन गेला आहे. ही घटना १ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास घडली.त्यानंतर फिर्यादी यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी फिर्याद दाखल केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

**सोलापूर दि. २ फेब्रुवारी-**

मृत्यूसू कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ जानेवारी रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास विजापूर रोड बायपास येथे घडली.याप्रकरणी बाबासाहेब रमजान शेख (वय-२१,रा.देशमुख वस्ती, देगाव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचे वडिल रमजान शेख हे फिर्यादीस शिवाजीनगर बाळे येथे जाऊन येतो असे सांगून दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीजी.०५२५ यावरून गेले असता वरील ठिकाणी बंजारा हॉटेल जवळ अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक एम.एच.२२.बी ७७७७ हे वाहन निष्काळजीपणाने व भरधाव वेगात चालवून फिर्यादी यांचे वडील चालवत असलेल्या दुचाकीला जोरात धडक देऊन गंभीर जखमी करत त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कसबे हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

**सोलापूर दि. २ फेब्रुवारी-**

भद्रावती पेठ येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीआर.९९८७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३० ते ३१ जानेवारी दरम्यान घडली.याप्रकरणी करण वेणुगोपाल गाजूल (वय-२०,रा.भद्रावती पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शेख हे करीत आहेत.

### घरासमोरून दुचाकी लंपास

**सोलापूर दि. २ फेब्रुवारी-**

राहत्या घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीएक्स.१९६७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३१ जानेवारी रोजी दुपारी तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान भवानी पेठ घोंगडे वस्ती येथे घडली.याप्रकरणी व्यंकटेश वसंत तुम्मा (वय-४८,रा.भवानी पेठ,घोंगडे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

### प्रा. स्वप्नगंधा सोनवणे यांना पीएच.डी. प्रदान

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

दयानंद महाविद्यालयातील स्वप्नगंधा सोनवणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून विद्यापीठाचे प्र-कुलगुरु लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते पीएच. डी. प्रदान करण्यात आली. यावेळी बाह्य परीक्षक म्हणून डॉ. होमी भाभा स्टेट यूनिवर्सिटीचे डॉ.मनोहर पडूळ, सोलापूर विद्यापीठातील सायन्स आणि टेक्नॉलॉजीचे डीन डॉ.प्रशांत पवार, विद्यापीठाचे सिनेट सदस्य वीरभद्र दंडे, डॉ. रमेश सोनवणे, रेखा सोनवणे, IQC समन्वयक डॉ. अनमोल वळसंगे यांची उपस्थिती होती.. प्रा. स्वप्नगंधा सोनवणे यांनी जैवतंत्रज्ञान विषयातील इंविट्रो स्क्रिनिंग ऑफ सम मेडिसिनल प्लांट्स फॉर अँटीहाइमलीटीक अँड अँटीऑक्सिडंट ऍक्टिव्हिटी ऑन रॅट या विषयावर प्रबंध सादर केला आहे. या शोध कार्यासाठी प्राध्यापक डॉ.लक्ष्मीकांत दामा यांचे मार्गदर्शन लाभले.



# श्री विठ्ठल-रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा उत्साहात

## वसंत पंचमीचा शुभ मुहूर्त; भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ फेब्रुवारी-**

वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर रविवारी (ता.२) श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचा विवाह सोहळा परंपरेनुसार श्री विठ्ठल सभा मंडप येथे मोठ्या थाटामाटात आणि दिमाखात पार पडला.

दुपारी १२ वाजता श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची पाद्यपूजा सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, संभाजी शिंदे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते पार पडली.

त्यानंतर श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची अलंकाराने सजवलेली उत्सवमूर्ती या विवाह सोहळ्याच्या ठिकाणी म्हणजे श्री. विठ्ठल सभामंडपातील फुलांनी सजविण्यात आलेल्या शाही मंडपात आणण्यात आली. दोन्ही देवतास मुंडावळ्या बांधून आणल्या गेल्या. यानंतर अंतरपाट धरले आणि मंगलाष्टकास सुरवात झाली. त्यामध्ये मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंगलाष्टका म्हटली. मंगलाष्टक झाल्यावर सर्व उपस्थित भाविकांनी शाही विवाह सोहळा साजरा केला. यावेळी मंदिर समितीमार्फत संत तुकाराम भवन येथे भोजनाची व्यवस्था भाविकांसाठी करण्यात आली होती. यावेळी भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला असल्याची माहिती मंदिर समितीची व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

### असा पार पडला विवाह सोहळा

सकाळी श्री विठ्ठल रुक्मिणीमातेला शुभ्र वस्त्र तसेच श्री रुक्मिणी मातेस मोत्याचे दागिने, नथ आणि अलंकार परिधान करण्यात आले होते. श्री. रुक्मिणी मातेच्या गर्भागृहातून गुलाल श्री. विठ्ठलाकडे नेण्यात आला. तिथे गुलालाची उधळण केल्यानंतर श्री विठ्ठलाचा गुलाल रुक्मिणी मातेकडे नेण्यात आला. तिथेही गुलालाची उधळण करण्यात आली.



### श्री विठ्ठल-रुक्मिणी विवाह सोहळ्यासाठी आकर्षक फुलांची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.२ फेब्रुवारी -**

वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचा शाही विवाह सोहळा संपन्न होत असून त्यानिमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

जिप्सी, डिजी, सुर्यफुल, गुलाब, रेड गुलाब, पांढरा गुलाब, पिंक गुलाब, पिवळा गुलाब, जरबरा, ऑर्किड जिनेयिम, तगर, गुलछडी, कामिनी, तुक्स, गोंडा (लाल पिवळा) बिजली, अस्टर, शेवंती, पासली, काडी, गिलाडो, डीर्शना इत्यादी सुमारे साडेतीन ते चार टन फुलांचा आणि एक टन ऊसाचा वापर करण्यात आला आहे. श्रींचा गाभारा, विठ्ठल सभामंडप, श्री संत नामदेव महाराज पायरी, उत्तरद्वार अर्थात व्हीआयपी गेट, सोळखांबी, रुक्मिणी सभामंडप, मिरवणूक रथ या ठिकाणी सजावट करण्यात आली आहे. याकरिता सुमारे १०० स्वयंसेवकानी परिश्रम घेतले असून, सदरची सजावट पुणे येथील भाविक भारत भुजबळ यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे.

## संविधान उपक्रमात सोलापूर जिल्हा परिषद राज्यात अव्वल

### १९ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

संविधानाच्या ७५ व्या वर्षानिमित्त राज्यात महाराष्ट्र शासनाकडून घर घर संविधान उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने हा उपक्रम राबविण्यासाठी वारंवार बैठका घेऊन सूचना दिल्या होत्या. त्यामुळे जानेवारी महिन्यात या उपक्रमात जिल्ह्यातील दोन हजार १५५ शाळेतील १९ हजार १५३ विद्यार्थी १५ हजार २७७ शिक्षक, आठ हजार ७२९ पालक, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी सहभाग घेतला. त्यांनी दोन हजार ५२८ विविध उपक्रम राबवून ऑनलाइन नोंदणी केली होती. ही नोंदणी राज्यातसर्वाधिक असल्याने जिल्हा परिषद प्रथम क्रमांकावर आला आहे. फेब्रुवारी महिन्यांत संविधानाच्या महत्त्वपूर्ण मूल्यांबद्दल जागरूक करणे, त्यांचे हक्क व कर्तव्ये समजून सांगणे, संविधान तयार करतेवेळी घडलेल्या घटनांची माहिती देणे, संविधानातील मूलभूत हक्क आणि कर्तव्ये याची चर्चासत्रे घेण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली. उपक्रम सहभागात राज्यात टॉप वनमध्ये आहे. या संविधान जागरबाबत शुक्रवारी झेडपी सीईओ यांच्या कार्यालयात ऑनलाईन बैठक झाली. सोलापूर, नाशिक, जालना, बुलढाणा, गडचिरोली जिल्ह्यातील एका हजारापेक्षा जास्त सहभागी झाल्या आहेत. तर १४ जिल्ह्यात संविधानाचा जागर बाबत दहा पेक्षा कमी शाळा आहेत. सध्या संविधानात कोणते अधिकार, कर्तव्य, कायदे या जागरच्या माध्यमातून कळणार आहे. त्यासाठी वर्षभर हा उपक्रम चालणार असून प्रत्येक महिन्यात कोणता विषय संविधानातील मुद्दा घ्यायचो आहे ते ठरले आहे. त्यामुळे या संविधाना जागरच्या उपक्रमाचे महत्व वाढले आहे.

> घर-घर संविधान हा शासनाचा उपक्रम असून यासाठी सोलापूर झेडपीच्या सर्वाधिक शाळा राज्यातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत चांगला सहभाग आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडी आपण या उपक्रमाची कार्यवाही करतो. या उपक्रमाला जिल्ह्यातून चांगला प्रतिसाद आहे.
>
> **- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी**

## शिवछत्रपतींच्या मूर्ती साकारण्यात राजस्थानी कारागीर व्यस्त

### शहरात शिवजयंतीची लगबग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्य संस्थापक जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्त सोलापूर शहरात मूर्ती साकारण्याचे काम जोमात सुरू आहे. विजापूर रोड येथील राजस्थानी कारागीर छत्रपतींच्या सौंदर्यपूर्ण मूर्ती साकारण्याचा व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दृष्टीक्षेपात आली आहे. १९ फेब्रुवारी रोजी जयंतीचा उत्साह सर्वत्र पहावयास मिळणार आहे. त्या अनुषंगाने शहरात कारागीर सिंहासनाधीश्वर शिवछत्रपतींची मूर्ती साकारत आहेत. लहान आणि मोठ्या आकारातील छत्रपतींच्या मूर्ती आकर्षक व लक्षवेधी ठरत आहेत. पीओपी पासून तयार केलेल्या याम ूर्तींना सोलापूर शहरासह जिल्ह्यातून आणि कर्नाटक येथून मागणी मिळत आहे. शिवप्रेम ींनी आपल्या घरामध्ये शिवजयंती साजरी करण्यासाठी देखील वैशिष्ट्यपूर्ण अशा मूर्ती साकारण्याची मागणी देखील मूर्तिकारांकडे केली आहे. दरम्यान, शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या बैठकीत यंदाची शिवजयंती मोठा उत्साहात साजरी करण्याचे ठरवण्यात आले आहे. त्यासाठी पारंपारिक मिरवणूक काढण्यात येणार आहे. लेझीम झांज नाशिक ढोल अशा पारंपारिक वाद्यांच्या तालावर मिरवणूक काढण्यात येणार आहे. डॉल्बीला फाटा देत सर्वच मंडळांनी पारंपारिक मिरवणुकीस प्राधान्य देण्याचे आयोजिले आहे. त्यामुळे यंदाची शिवजयंती लक्षवेधी ठरणार आहे.



### विशेष पाळणा कार्यक्रम

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा कार्यक्रम दि.१८ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजता आयोजित केला जातो. यंदाच्या वर्षी देखील हा उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केला जाणार आहे. त्यासाठी मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने तयारी करण्यात येत आहे.

# बोरामणी विमानतळ होणार नसेल तर भूसंपादित जमिनी परत करा

### बाधित शेतकऱ्यांची शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सोलापूर जिल्ह्यातील जनतेचा जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणून विमानसेवेकडे पाहिले जाते. विमानसेवा नसल्याने सोलापूर शहर-जिल्हा विकासाला मर्यादा येऊ लागल्या आहेत. याची वारंवार चर्चाही होते. निवडणुकांत हा मुद्दा प्रकर्षाने सत्ताधारी अन् विरोधकही हाती घेतात. यंदाच्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत आपण विमानतळाचा विषय कित्येक सभांमधून ऐकला...विमानसेवा चालू करण्याचे चक्क उद्घाटनही झाले...सोलापूर विकास मंच सदस्य, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जीवाचं रान केलं मात्र आजपावेतो ना होटगी रोड ना बोरामणी विमानसेवा सुरू झाली नसल्याने जिल्ह्यातील नागरिकांतूनही आता संताप व्यक्त होत आहे. बोरामणी विमानसेवा चालू करण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादन करून १५ वर्षापर्यंतचा काळ लोटला तरी त्या जागेवर विमानतळ झाले नसल्याने त्या बळीराजाच्या किमान वाहीक जमिनी तर मोबदला घेवून परत कराव्यात, अशी मागणी जाणकार शेतकऱ्यांतून आता होत आहे.

होटगी रोड विमानतळ की बोरामणी विमानतळ अशा पेचात सोलापूरची विमानसेवा अनेक वर्षे अडकली होती. मध्यंतरी होटगी रोड विमानतळ सुरू करण्यासाठी या विमानतळावरील धावपट्टी, संरक्षक भिंत व प्रशासकीय इमारतीची कामे करण्यासाठी ६४.९५ कोटी इतका खर्चही करण्यात आला आहे. आता ७२ प्रवासी क्षमतेचा विमान परवाना फ्लाय ९१ या कंपनीकडे नसल्याने हा विषय प्रलंबित असल्याचे कारण सांगून ही विमानसेवा सध्यातरी बंदच आहे. हा परवाना लवकर मिळाला तर उडान या योजनेतून ही विमानसेवा कार्यान्वित होईल मात्र बोरामणी विमानतळाचे काय? असा सवाल जाणकार शेतकरी व नागरिक विचारू लागले आहेत.



बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी या भागातील शेतकऱ्यांच्या ५७५ हेक्टर जमिनीचे संपादन झालेले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी आवश्यक असलेली धावपट्टी या विमानतळावर उपलब्ध करता येते. सोलापूरची शेती उत्पादने पाहता या शहराला प्रवासी विमानसेवेसह कार्गो विमानसेवेचीही तितकीच गरज आहे. बोरामणी या विमानतळावरून कार्गो सेवा सुरू करता येऊ शकते. सध्या विमानसेवा नसल्याने उद्योग बाहेर जात आहेत. सोलापुरात कामगार वर्गही मोठा असल्याने या ठिकाणी उद्योगाला मोठी संधी आहे मात्र आवश्यक ते प्रयत्न स्थानिक लोकप्रतिनिधींकडून होताना दिसत नाहीत.

प्रवासी, शेतकरी व व्यापारी असा जिल्ह्याचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी २००८ मध्ये बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळाची अभ्यासपूर्ण घोषणा झाली होती. या विमानतळासाठी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील इतरही काही नेत्यांनी मोठे प्रयत्नही केले होते. बोरामणी विमानतळाचा हा प्रकल्प अद्यापही भूसंपादनातच अडकला आहे. वनविभागाची जागा वगळता ५८० हेक्टरचे १२० कोटी रुपये खर्चुन तीन टप्प्यात २०१४ पर्यंत भूसंपादन करण्यात आले. आजतागायत हा प्रकल्प जैसे थेच आहे. याबाबत शासन स्तरावर अनेक बैठका झडल्या. मात्र त्यातून तोडगा निघाला नाही. या दरम्यान महाविकास आघाडी, महायुतीची सत्ता होती. या दोन्ही सरकारला बोरामणीचे विमानतळ सुरू करणे शक्य झाले नाही. दरम्यान, केंद्र शासनाच्या उड्डाण योजनेत होटगी रोड विमानतळाचा समावेश केला गेला आणि तीही विमानसेवा चालू करण्यास विलंब होत आहे. सध्या बोरामणी विमानतळ प्रकल्प प्रलंबित राहिला असून, शासनाने भूसंपादनावर घातलेले १२० कोटी रुपये सध्या तरी पाण्यात गेल्याचे चित्र आहे.

भविष्यातील गरज ओळखून सोलापूर शहरातील टेक्सस्टाईल, गारमेंट व्यापारी, शेतकऱ्यांचे उत्पादन आणि नागरिकांना प्रवासी सेवा, असा तिहेरी सुवर्णमध्य साधण्यासाठी ६२५ कोटींचे बोरामणी विमानतळ उभारणीची घोषणा झाली. या विमानतळासाठी २०१० मध्ये ५८० हेक्टर खासगी जमिनीचे भूसंपादन सुरू झाले. भूसंपादनाची प्रक्रिया तीन टप्प्यात २०१४ पर्यंत सुरू होती. दरम्यान, वनविभागाची ३३ हेक्टर जमीन माळढोक अभयारण्यासाठी प्रलंबित राहिली आहे. याबाबत विमानतळ प्राधिकरणाने वनविभागाला प्रस्ताव दिला. मात्र माळढोकसह या परिसरातील इतर पक्षांचाही वावर असल्याने ही जागा देण्यास वनविभागाने नकार दिला. वनविभागाची जागा संपादित न झाल्याने हा प्रकल्प रखडला आहे. दरम्यान, या भागात भविष्यात कधीच विमानतळच होणार नसेल तर भूसंपादनासाठी घेतलेल्या रकमेत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळाव्यात, अशी मागणी जाणकार शेतकरीवर्ग सध्या करू लागला आहे.

> आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ होणार आहे म्हटल्यावर अनेक शेतकऱ्यांनी या प्रकल्पासाठी पोटच्या लेकराप्रमाणं सांभाळलेल्या आपल्या वाहिक जमिनी दिल्या आहेत. तर काही आसपासच्या शेतकऱ्यांनीही जमिनीला चांगला मोबदला येत असल्याने जमिनी विकून टाकल्या आहेत. यामुळे माळरान सोडून शेकडो हेक्टर वाहिक जमिनीही उत्पन्न न घेता अनेक वर्षांपासून पडून आहेत. जर शासनाला हा प्रकल्पच चालू करायचा नसेल तर या जमिनी शेतकऱ्यांना परत केल्यास या जमिनीवर माझा शेतकरी भाऊ हिरवेगार नंदनवन पुन्हा उभे करेल.
>
> **- सुनील नागणे, खडकीकर**
> **(राज्य समन्वयक, मराठा क्रांती मोर्चा)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१८

**काय टिळे करिती माळा ।**
**भाव खळा नाहीं त्या ।।**

आपल्या देशाची संस्कृती अध्यात्मिक म्हणून प्रसिध्द आहे. या संस्कृतीत वडीलधाऱ्यांचा, संत- महात्म्यांचा मान-सन्मान करण्याची पध्दत आहे. एखादा वारकरी, प्रवचन-कीर्तनकार, संत, महात्मा समोर आला तर नकळत माणूस आपोआप त्यांच्यासमोर नतमस्तक होत असतो. खरे म्हणजे ही एक अत्यंत महत्वपूर्ण अशी संस्कृतीची देण आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. असे नतमस्तक होण्याचे प्रमुख कारण म्हणजे समोरच्यावरील आमची श्रध्दा, भक्ती, विश्वास व प्रेम होय. हे सर्व त्यांच्या वर्तनामुळे, अनुभवामुळे, आचार-विचारामुळे आमच्यात आपोआप निर्माण होते. पण जेंव्हा अशा लोकांच्या वर्तनामुळे आमच्या विश्वासाला तडा जातो, तेंव्हा मात्र इतरांवरीलही आमचा विश्वास उडू लागतो. कपाळाला टिळा, गळयात माळ, संत-महात्म्यांचा पेहराव धारण केला आणि मनात स्वार्थाशिवाय कांही नसेल किंवा भगवंताबद्दल, जनसामान्याबद्दल श्रध्दा, भक्ती, विश्वास व प्रेम यापैकी कांहीही नसेल तर आमच्या श्रध्देला तडा जाण्याशिवाय त्या पेहरावाचा दुसरा उपयोग काय?हृदयात भावाला स्थान न देणाऱ्या टिळा, माळधारी ढोंगी महाराजांची आपणाला संगत लाभू नये अशी अपेक्षा तुकोब्बांनी व्यक्त केली आहे. अशा ढोंगी महाराजाबद्दल बोलतांना ते म्हणतात,



**काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ।।**
**तुका म्हणे प्रेमेंविण । अवघा बोले भुंके शीण ।।**

हृदयात प्रेमाला, भावनेला स्थानच नसेल तर बाह्य पेहराव व्यर्थ आहे. भाव नसेल तर माणसाला माणसाचा, भगवंताचा खऱ्या अर्थाने परीचय होणारच नाही. भावेविण देव न कळे नि:संदेह ।। असे माऊलींनी म्हटले आहे. भाव नसलेला देह म्हणजे निव्वळ सजवलेले प्रेत होय. भाव असेल तर मुकी प्राणीसुध्दा माणसाच्या जवळ येतात. तीसुध्दा माणसांवर प्रेम करतात. अर्थात, प्रेम देणाऱ्याला प्रेम मिळत असते. ज्याच्या हृदयात प्रेमाला स्थानच नाही, त्याच्याकडून प्रेम मिळत नाही. त्याचबरोबर इतरांनी प्रेम दिले तरी अशांना ते घेता येत नाही. कपाळाला टिळा, गळयात माळ आणि वारकऱ्यांच्या, कीर्तन-प्रवचनकारांचा पेहराव करुन मनात स्वार्थाची भावना जोपासणारे समाजात काही लोक आहेत. अशा ढोंगी लोकांच्या वागण्यामुळे वारकरी सांप्रदाय बदनाम होत आहे. वारकऱ्यांनी, प्रवचन कीर्तनकारांनी वारकरी सांप्रदायाच्या व्यासपीठाचा वापर चुकीच्या कारणांसाठी करु नये. कारण चुकीचा वापर सांप्रदायात फुट पाडण्याकडे किंवा सांप्रदायाकडे चुकीचे बोट दाखवण्यावस कारणीभूत होऊ शकतो. अध्यात्मिक व्यासपीठाला राजकीय रंग आणणे म्हणजे सामान्यांच्या भावनेशी खेळणे होय. अध्यात्मिक व्यासपीठ सर्वांसाठी खुले आहे. पण अध्यात्मिक व्यासपीठाला कांही बंधने आहेत ती या व्यासपीठांनी पाळलीच पाहिजेत. ढोंगी, व्यावहारिक महाराजामुळे हे घडत आहे. प्रवचन- कीर्तनातून भगवंताशिवाय किंवा संत-महात्म्यांशिवाय इतरांचा उदो-उदो करण्याचे कारणच नसावे. बाह्य पेहरावापेक्षा अंतर्गत भावनेला जास्त महत्व आहे, हे ही याप्रसंगी लक्षात ठेवावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## पाच गुन्हेगारांना अटक

# आठ गुन्हे उघडकीस; सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पाच गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून ८ गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत ५ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




निशांत बापू बनसोडे, विशाल आनंद ढेरे, अक्षय अमोल कदम (रा. सोलापूर), अभिजित दिलीप चव्हाण (वय ३०, रा. मेन रोड, चव्हाण ज्वेलर्स बाजार पेठ, पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे) आणि जमीर अब्दुल रहेमान पैरमपैली (वय ३९, रा. कुर्बान हुसेन नगर, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

निशांत बनसोडे, विशाल ढेरे, अक्षय कदम या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून सोलापूर शहर आयुक्तालयातील तसेच बार्शी येथील चोरीस गेलेल्या मोटारसायकलीचे ६ गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच अभिजित चव्हाण यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून चोरलेली चारचाकी गाडी जप्त करण्यात आली. जमीर पैरमपैली यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून विजापूर नाका पोलिस ठाण्यातील मोटार पंप चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले. अशाप्रकारे शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एक चार चाकी गाडी, ६ दुचाकी, चोरीचा मोटार पंप असे ८ गुन्हे उघडकीस आणून ५ लाख ९५ हजारु रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.ही कामगिरी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड, पोलिस अमंलदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठाडे, बाळू काळे यांनी केली.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो.
९९६००५३५२१

### अलकः- (३९) प्रार्थना (३)

अलकः- (४०) प्रार्थना (पूर्वीची)

संघाच्या प्रार्थनेचे पूर्वीचे स्वरूप वेगळे होते. प्रार्थनेत एक मराठी

व एक हिंदी श्लोक होता. तो असाः-

नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी। नमो आर्यभूमी जिथे वाढलो मी। नमो धर्मभूमी जियेच्याय कामी पडो देह माझा सदा ती नमी मी ।।१।।

याला जोडून दुसरा हिंदी श्लोक म्हणत असतः- हे गुरो श्री रामदूता, शील हमको दीजिये, शीघ्र सारे सद्गुणों से, पूर्ण हिंदू कीजिये।

लीजिये हमको शरण में, रामपंथी हम बनें, ब्रह्मचारी धर्मरक्षक, वीरव्रतधारी बनें ।।२।।

।। भारत माता की जय ।।

।। राष्ट्रगुरु श्री समर्थ रामदास स्वामी महाराज की जय ।।

**- क्रमशः**



## नागनाथ अल्ली महाराज मठात सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

सालाबाद प्रमाणे यंदाही श्री समर्थ सदगुरु भाऊसाहेब महाराज पुण्यतिथी व श्री मार्कंडेय महामुनी जयंती निमित्त श्री समर्थ सदगुरु नागनाथ अल्लो महाराज मठात विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाप्रसंगी पहाटे ४ वाजता काकडा आरती, अभिषेक, दुपारची आरती, श्रीमद् दासबोध वाचन, स.स.नागनाथ अल्ली महाराज यांचे एलईडीद्वारे प्रवचन, पुष्पवृष्टी, महाआरती, पादुका दर्शन, व श्री समर्थ सदगुरु नागनाथ अल्ली महाराज यांच्या समाधीचे फुलांनी सजावट केलेली आहे. सार्यकाळी पाच वाजता मठामध्ये पालखी मिरवणूक काढून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमास कृष्णाहरी कटकम, तिप्पण्णा मुदगुंडी, राजू पोतन, अशोक चिप्पा, रमेश गाजूल व संस्थेचे विद्यमान सचिव परमेश्वर कोडम, खजीनदार जनार्दन गंजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## मार्कंडेय प्रशालेत आनंदमेळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांची ६९ वी पुण्यतिथी व मार्कंडेय जयंती यांचे औचित्य साधून श्री मार्कंडेय प्रशाला व ज्युनिअर कॉलेज विडी घरकुल कुंभारी येथे कमवा व शिका या योजनेअंतर्गत भव्य आनंदमेळा उत्साहात पार पडला. प्रथम श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमा पूजनानंतर मेळाव्याला सुरुवात करण्यात आली.

आनंद मेळाव्यात ९० स्टॉल्स उभारण्यात आलेले होते. यामध्ये अंदाजे ५० हजार रुपयांची उलाढाल झाली. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ विक्रीस ठेवलेले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यावसायिकतेचे व्यवहार ज्ञान, खरेदी-विक्री, नफा तोटा यांचे ज्ञान मिळाले. या मेळाव्यातील उंट हे सर्वांचे आकर्षण ठरले. उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापक अमोगसिद्ध कुंभार यांनी केले. तर पर्यवेक्षिका सुमन बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन दत्तात्रय सुतार यांनी केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : सोमवार** | **दिनविशेष -** |
| **दि. ३ फेब्रुवारी २०२५** | **नरवीर उमाजी नाईक पुण्यदिन,** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **चांगला दिवस** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - फाल्गुन** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **शु. षष्ठी - (२८.३७)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - रेवती (२३.१६)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - साध्य (२७.०२)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - कौलव (१७.४४)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

## पोलिस निरिक्षक ढवाण यांची सोलापूरला बदली

### पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी मंगळवेढ्याचा स्विकारला कार्यभार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

मंगळवेढा पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक महेश ढवाण यांची तडकाफडकी सोलापूर येथे बदली झाल्याचा आदेश मंगळवेढा पोलिस स्टेशनला शनिवारी दुपारी प्राप्त झाला. त्यांच्या जागी सोलापूर दहशतवाद विरोधी शाखा येथून पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे हे रूजू झाले असून त्यांनी काल दुपारी आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला आहे. मंगळवेढयाचे पोलिस निरिक्षक महेश ढवाण यांनी मागील सहा महिन्यापुर्वी पदभार घेतला होता. दरम्यान, दि. २५ जानेवारी रोजी बोराळे बीट हद्दीत दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे लाच प्रकरण घडल्याने त्यांच्यावर बदलीची कुऱ्हाड कोसळली असल्याचे बोलले जात आहे शनिवारी दुपारी पोलिस अधिक्षक कार्यालयाकडून ढवाण यांच्या बदलीचा आदेश मंगळवेढा पोलिस प्रशासनास प्राप्त झाला असून त्यांची नेमणूक सोलापूर ग्रामीण कंट्रोल तथा दहशतवाद विरोधी शाखेकडे झाली आहे. पोलिस निरिक्षक बोरीगिड्डे हे तेथून मंगळवेढयास आले आहेत. ते सन २००५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षेत उत्तीर्ण होवून पोलिस खात्यात दाखल झाले आहेत. ते मूळचे सांगली येथील असून त्यांनी आत्तापर्यंत मुंबई, वर्धा, धाराशीव, कोल्हापूर येथे आपली सेवा बजावली आहे.



## हळदी-कुंकू कार्यक्रमात भाजीपाला बीयांचे वाण



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम व पद्मकमळ प्रतिष्ठानच्या आयोजित महिला सौभाग्यवतींना हळदी-कुंकू लावून वाण म्हणून भाजीपाल्यांचे बीया देण्यात आले. यामध्ये पालक, मेथी, टमाटा, हिरवी मिरची व कोथिंबीर या भाज्यांचे बीया होत्या. यावेळी दी रोज क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्ष व परसबागेच्या संयोजिका ममता बोलाबत्तीन, ॲड. शैलजा क्यातम, रेखा रुद्रोज व सायरा मुलाणी, डॉ. प्रफुल्लिता काळजे यांची प्रमुख उपस्थिती होती. पूर्व भागातील, दाजीपेठ येथील श्रीराम मंदिरात हा कार्यक्रम पार पडला. अनन्या ग्रुपतर्फे उपस्थित असलेल्या सौभाग्यवतींना वाण म्हणून अगरबत्ती देण्यात आले. कार्यक्रमानंतर शालिनी दोरनाल (कॅनडा) व सुजाता गोल्ला (मुंबई) यांच्या रोशन टी हाऊस तर्फे अल्पोपहारची सोय करण्यात आले होते. याप्रसंगी बालकलाकार रक्षिता तलकोकूल हिने भरतनाट्यम् सादर उपस्थितांचे मने जिंकली. सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन कला चन्नापट्टण यांनी केले. या कार्यक्रमाला पद्मकमळ प्रतिष्ठानचे संस्थापक गोपीकृष्ण वड्डेपल्ली हे सपत्निक उपस्थित होते. फाउंडेशनचे दयानंद कोंडाबत्तीनी, श्रीनिवास रच्चा, किशोर व्यंकटगिरी, श्रीनिवास पोटाबत्ती, वैकुंठम् जडल, सतीश चिटमील, स्त्रीरोगतज्ञ डॉ. नीता घाटे यांची उपस्थिती होती. उपक्रम यशस्वी करण्यासाठी मेघा इट्टम, पूजा चिप्पा, कल्याणी पेनगोंडा, ममता मुदगुंडी, कल्पना अर्शनपल्ली, गीता भूदत्त, वनिता सुरम, पल्लवी संगा, पद्मा मेडपल्ली, सोनाली तुम्मा, हेमा मैलारी यांचे सहकार्य मिळाले.

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ :** मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन :** स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क :** घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह :** हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या :** मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन :** मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# कृषी पर्यटन करणाऱ्या शेतकऱ्यांना बँकांचा खो

### आधी ‘एनए’ करा अन् पुन्हा कर्जासाठी या!

### तरूण शेतकऱ्यांतून नाराजीचा सूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

शेतकऱ्यांना शेतीला जोडव्यवसाय होवून अतिरिक्त उत्पन्न मिळावे या उद्देशाने शासनस्तरावरून ‘कृषी पर्यटन’ केंद्राचा विषय समोर आला आहे. दरम्यान, यातून शेतकऱ्यांना विविध उत्पादनांना कायमस्वरूपी ग्राहक मिळतात, कुटुंबातील इतर सदस्यांना रोजगाराची संधी मिळते, समुदायांना नवीन रोजगार संधी मिळतात, शेतजमिनी जतन करण्यास मदत होते अशा विविध फायद्यातून ही संकल्पना समोर आली आहे. दरम्यान, कृषी पर्यटनाच्या निर्मितीसाठी कर्ज घेण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडे शेतकरीदादा गेल्यावर आधी तुमच्या जमिनीचे एनए करा आणि मगच आमच्याकडे या असा खो बँका घालू लागल्या आहेत. यामुळे शासनस्तरावरूनच अशा बँकांचा सुचना देवून जमिनीच्या किंमतीप्रमाणे बळीराजाला हवे तितके कर्ज द्यावे, असा जीआर काढावा, अशी अपेक्षा अनेक युवा शेतकऱ्यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना बोलून दाखविली.



### कृषी पर्यटन विभागाकडून बँकांना तातडीने पत्रव्यवहार

ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांच्या शेतीव्यवसायाला जोड देण्यासाठी कृषी पर्यटन ही नवीन संकल्पना शासनस्तरावरून राबविण्यात येत आहे. कृषी पर्यटन निर्मितीसाठी ऑनलाईन अर्ज करून शासनस्तरावरुन नोंदणी प्रमाणपत्र घेतलेल्या सर्व शेतकरी बांधवांना त्यांच्या शेतीची व्हॅल्युएशन (किंमत) पाहून विना अट तातडीने कर्ज देण्यासाठी कृषी पर्यटन विभागाकडून बँकांना सुचना वजा पत्र देण्याची आम्ही लवकर सोय करणार आहोत. हे पत्र बँकांना मिळताच शेतकऱ्यांना कर्ज मिळावे, अशा सुचनाही त्यांना देण्यात येणार आहेत.

**- अमृत नाटेकर, महसूल जिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन अधिकारी**

ग्रामीण भागातील शांत वातावरण, शुध्द हवा, निसर्गरम्य परिसर, कला, संकृती, वेशभुषा, खाद्यसंकृती तसेच गावात मिळणारे दुर्मिळ वनस्पती, झाडे, प्राणी, पक्षी, झरे, डोंगर, दऱ्या, निसर्ग निरीक्षण, शिवार शेतीचा अनुभव घेणे. शहरी जीवनशैलीचा कंटाळा आलेल्या लोकांना कृषी पर्यटन हा पर्यटनाचा नवीन चेहरा. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास या ब्रीद वाक्याला साजेसे कृषी पर्यटन केंद्र महाराष्ट्रात सुरू झाले आहे. पण संपूर्ण महाराष्ट्राला परिचीत नाही.

ग्रामीण भागातील युवा शेतकरी या कृषी पर्यटन उद्योगाकडे मोठ्या अपेक्षेने पाहू लागले असून बँका त्यांना सहकार्य करीत नसल्याची त्यांची खंत आहे. यामुळे शासनाकडून विशेषत: सर्व जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून अशा युवकांना बँकांनी प्राधान्याने कर्ज द्यावे, अशा सुचना देण्याची गरज आहे. इतकेच नाहीतर कृषी पर्यटन निर्माण करणारे इच्छुक शेतकरी आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या प्रतिनिधींची एकत्र बैठक घेवून हा कर्ज विषय तातडीने मार्गी लावावा, अशीही अनेकांची अपेक्षा आहे.



## दंतरोग निदान व चिकित्सा शिबिरात १०० जणांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज जन्मोत्सव व श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवाचे औचित्य साधून मोफत दंतरोग निदान व चिकित्सा शिबीर संपन्न झाले. डॉ. हेडगेवार रक्तपेढी सोलापूर श्री संत सावता महाराज वारकरी प्रशिक्षण संस्था व स्माईल प्लस डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने दंतरोग तपासणी करण्यात आली. शिबिराचा सुमारे १०० रुग्णांनी दंत रोगाची तपासणी केली. डॉ. गजानन भोसले, रश्मी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आज दंत आरोग्य तपासणी संपन्न झाली.

यावेळी दातांची निगा कशी राखावी या संदर्भात यांचे मार्गदर्शन सर्व शिबिरार्थ्यांना लाभले. तत्पूर्वी शिबिराच्या सुरुवातीला हभप सुधाकर इंगळे महाराज, हभप बळीराम जांभळे महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिर सुरुवात करण्यात आले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून शिवश्री शिवाजी भोसले रायगड प्रतिष्ठान संस्थापक हे लाभले. याप्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून डॉ. वैद्य, डॉ. कोरे, अनिल शिंदे, जावळे, सरवदे उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी अनिकेत जांभळे, तुकाराम लोखंडे, अंजली लोखंडे, समर्थ कांबळे, स्वराज केसरे, आर्यन खंदारे, राजवीर जांभळे यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### श्रीपूरच्या शिबिरात ८० जणांचे रक्तदान

**श्रीपूर, दि. २ फेब्रुवारी-**

श्रीपूर येथील ब्रिमा सागर कारखान्यामध्ये कारखान्याचे संचालक यश कोठारी यांच्या दहाव्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित शिबिरात ८० जणांनी रक्तदान केले तर ३५ नागरिकांची दंत तपासणी करण्यात आली. रक्तसंकलन महर्षी शंकराव मोहिते-पाटील ब्लड बँकेने केले. याप्रसंगी डॉ. संजय सुद, ब्रिमा सागर डिस्टलरीचे संचालक यश कोठारी, जनरल मॅनेंजर दिनकर बेंबळकर, अविदादा इनामदार, डॉ संतोष खडतरे, डॉ. निसार अहमद सय्यद, डॉ. सुधीर पोफळे, डॉ. प्रमोद पवार, डे. मॅनेजर चंद्रकांत भागवत, नरेश पाठक आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सुधीर पोफळे यांनी केले. यावेळी बाळासाहेब पिसाळ, जयंत आरगडे, टी. पी. बाक्षी, सुकुमार मंडल, निवृत्ती पवार, अमित तळवळकर, अरविंद इंगळे, सत्यजीत पाटील, भागवत पारसे, सूरज शिंदे, हेमंत पाटील, ऋषिकेश सदगर, नानासाहेब केचे, एडीएसचे रणजीत पुंडे, महेश पाटील, निखिल पगारे, अलोक सिंग, असिफ शेख, बाबू नाईकनवरे, अफजल शेख उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रसाद अक्कलकोटकर यांनी केले.




### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांना मुदतवाढ देण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. २ फेब्रुवारी-**

तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत सहा महिन्यांकरीता निवड झालेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थीनी पुन्हा मुदतवाढ देऊन रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी संघटनेचे तालुकाध्यक्ष गोपीनाथ राठोड यांच्यासह ३० कर्मचारी मुदतवाढ मिळण्यासाठी शासनाकडे प्रयत्न करण्यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी याना निवेदन दिले आहे. सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणून प्रत्येक ग्रामपंचायत येथे गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाने ही नियुक्ती देण्यात आली होती. ती मुदत आता संपत आल्यामुळे सघटनेच्या वतीने या मुदत वाढवून काम करण्याची संधी मिळावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष गोपीनाथ राठोड, उपाध्यक्ष युवराज पाटील, सचिव राहुल बगले, चंद्रकांत साळुंखे, अमर हेगडे यांच्यासह तीस कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. आंबेडकरांच्या पुतळा सुशोभिकरणासाठी कुर्डूवाडीत ठिय्या आंदोलन

**कुर्डूवाडी, दि. २ फेब्रुवारी-**

येथील पंचायत समिती जुने सभापती भवन हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा सुशोभिकरणासाठी उपलब्ध करुन द्यावे या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रिपाइं (आ) गटाच्यावतीने पंचायत समितीवर मोर्चा काढून ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी बीडीओ व उपअभियंता हे गैरहजर असल्याने आंदोलन आणखी तणावग्रस्त झाले होते. यावेळी बापूसाहेब जगताप, समद मुलाणी, डॉ. यु. एफ. जानराव, दिलीप गडदे, अभिजित सोलंकर, किरण रिकिबे, भागवत बनसोडे, राजाभाऊ दणाने, अर्जुन गाडे, बाळासाहेब शेंडगे, बंडू भोसले, सौरभ गायकवाड, गणेश समदाडे, नितीन कांबळे, कृष्णा अस्वरे, अप्पा वाघमारे, रवी शिंदे, भीमा रावडे, राहुल क्षीरसागर, विजू देवकते, भैय्या चांदणे, सुनील शिंदे, समाधान ढावरे, समीर नाईकनवरे, रियाज शेख, संतोष साळवे, सुयश जगताप, पिंटू घोडके, सिद्धार्थ झिंगळे, जितू घोडके आदी उपस्थित होते.

### चाटे शिक्षण समूहातर्फे शनिवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

चाटे शिक्षण समूह कोल्हापूर विभागाच्यावतीने घेण्यात आलेल्या भास्कराचार्य टॅलेंट सर्च व चाटे टॅलेंट सर्च यासारख्या विविध परीक्षेचा बक्षीस वितरण सोहळा शनिवारी ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृह येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून चाटे शिक्षण समूह कोल्हापूर विभागाचे संचालक डॉ. भारत खराटे तसेच शैक्षणिक विभाग प्रमुख प्रा. सर्जेराव राऊत उपस्थित राहणार आहेत. पाचवी ते दहावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थी व पालकांसाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी बार्शी शहर व परिसरातील इयत्ता पाचवी ते दहावीमध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेचे शाखा व्यवस्थापक प्रा. पांडुरंग घाडगे यांनी केले आहे.



### भाजयुमोच्या माढा पूर्व तालुकाध्यक्षपदी शहाजी यादव

**मोडनिंब, दि. २ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या माढा तालुका पूर्वच्या अध्यक्षपदी शहाजी यादव यांची निवड करण्यात आली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या स्वप्नातील भारत देश आणि महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यासाठी पक्षाची ध्येय धोरणे तळागळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी तालुक्यात तालुकाध्यक्ष योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करणार असल्याचे यावेळी शहाजी यादव यांनी सांगितले.

# गणेश जन्मोत्सव भक्तिभावात साजरा

## अथर्वशीर्ष पठणासह पाळण्याचा कार्यक्रम; होमहवन, गणेशयाग, पूर्णाहुती विधी, भाविकांना महाप्रसादाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

**गणेश जयंतीनिमित्त जिल्ह्यातील गणेश मंदिरांसह मंडळाच्या वतीने विविध धार्मिक, सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. अथर्वशीर्ष पठण, पाळणा, होमहवन, गणेशयाग, पूर्णाहुती असे विधी पार पडले. दर्शनासाठी मंदिरांमध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. गणेशाच्या जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला होता.**



### अक्कलकोटच्या विजय गणपती मंदिरात महाप्रसादाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ फेब्रुवारी-**



श्रीक्षेत्र अक्कलकोट शहरातील सुप्रसिद्ध विजय गणपती मंदिरात गणेश जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. दिवसभर हजारो भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले. त्याबरोबर तीन हजार भाविकांनी महाप्रसादाचे लाभ घेतला.

जयंतीच्या आदल्या दिवशी सायंकाळी अथर्वशीर्ष पठण करण्यात आले. जयंती दिवशी पहाटे पूजा गणपती पुळे येथील पुरोहित गोखले गुरुजींच्या हस्ते करण्यात आली. त्यांना राघवेंद्र बागेवाडीकर व त्यांच्या सहकार्यांनी मदत केली. त्यानंतर होमहवन, गणेशयाग, पूर्णाहुती यासह विविध धार्मिक विधी पार पडले. पुजेचा मान ॲड. अनिल मंगरुळे व त्यांच्या पत्नी श्रद्धा मंगरुळे यांना मिळाला. साडेबारा वाजता जन्मोत्सव पार पडला.

सुभाष गल्लीतील रिद्धी-सिद्धी गणेश मंदिरातसुद्धा विविध कार्यक्रम पार पडले. दिवसभरात विजय गणपती मंदिरात सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, ॲड. विजय हर्डीकर, बसवराज माशाळे, किरण सिरसे यांच्यासह विविध बँकेचे अधिकारी, कर्मचारी, प्राध्यापक, शिक्षक आदींनी दर्शन घेतले. कार्यक्रमासाठी प्रा. नितीन पाटील, प्रमोद कोरे, प्रा. जवळगे, सतीश पाटील, रातीकांत पाटील, करमल, राहुल कारले, निगणा भुयारे, बसवराज बिऱ्हाडे, मुन्ना ताची, राजू घोडके, राजू देशपांडे, सैपन वतनदार, संतोष हरवाळकर, विद्यासागर कोरे, अंकुश बेंद्रे, अंबणा चौगुले, रेवसिद्ध मंगरुळे, अनिल विभूते, दिनेश धाराशिवकर, विष्णूपंत कुंभार, महादेव अडवितोटे, राजकुमार सुतार,दत्ता व्हदलूरे, कोशोर कोटी, समर्थ म्हेत्रे, महादेव बिराजदार, तेजराज बिराजदार, मल्लिनाथ फुलारी, शिवलिंग बिराजदार, सतीश पाटील, विशाल मंगरुळे, शिवा मंगरुळे, शिवानंद पुजारी, नितीन खताळ, रोहन खडाखडे, आकाश झपके, प्रा. प्रकाश सुरवसे यांनी परिश्रम घेतले.

### सोमवार पेठचा राजा गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ फेब्रुवारी-**

दाक्षिणात्य पुरोहित तिरुपति बालाजी देवस्थान पुजारी श्री वैष्णव ब्राम्हण यांच्या दिव्य सानिध्यात हजारो भक्ताचे उपस्थितित नवसाला पावणारा सोलापूर येथील सोमवार पेठचा राजा सुप्रसिद्ध गणपती देवस्थानात श्री विश्व गणपतीचे नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम व विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

गुरूवारी मुंबईचे यजमान राजेश व दिनेश महिंद्रकर बंधू याच्या हस्ते अखंड दीपआराधना, गणेश पूजन, नवग्रह पूजा, अग्नि प्रतिष्ठापना असे धार्मिक विधीद्वारे यात्रेची सुरवात करण्यात आली. ३१ रोजी मंडप पूजा, मूलमंत्र हवन, मूर्तीस जलाशयन, पंचामृत शयन, विष्णुसहस्रनाम पारायण, वेदपारायण व सामूहिक अथर्वशीर्ष पठण, धार्मिक कार्यक्रम व हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडले. यावेळी अथर्वशीर्ष पठणकरिता सुमारे दोनशे महिलांची लक्षणीय उपस्थिती लाभली होती.

हळदी-कुंकू समारंभकरिता एका सुप्रसिद्ध सुवर्ण व चांदी पेढीकडून चांदी उपहारचे प्रयोजकत्व भेट म्हणून देण्यात आली. १ फेब्रुवारी रोजी श्री गणेश जयंती दिवशी यंत्र प्रतिष्ठापना, मूर्ती प्राणप्रतिष्ठापना, श्री पालखी सोहळा, गुलाल, पाळणा व महाआरती सोहळा शेकडो महिला व भक्तगणांच्या उपस्थितीत पार पडला. ट्रस्ट सचिव गोविंदराज तिरनगरी, सहकोषाध्यक्ष उपअभियंता चंद्रकांत खमितकर यांनी परिश्रम घेतले.




### मंद्रुपमध्ये दर्शनासाठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, २ फेब्रुवारी-**

संकटमोचक व वरद विनायक गणेशाची जयंती मंद्रुपमध्ये साजरी करण्यात आली. दर्शनासाठी गर्दी झाली होती.

नांदणी रस्त्यावरील गणेश मंदिर व माळकवठे रस्त्यावरील अष्टविनायक गणेश मंदिरात गणेश जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी परिसरातील हजारो भक्तांनी गणेश मूर्तीचे दर्शन घेतले. नांदणी रस्त्यावरील गणेश मंदिरात शुक्रवारी रात्री गावातील भजनी मंडळांमार्फत भजन कार्यक्रम पार पडले. पहाटे मंदिराचे पुजारी रेवणसिध्द लच्याणे यांच्या हस्ते 'श्री'स अभिषेक करून महाआरती करण्यात आली. दुपारी बारा वाजता भक्तांच्या उपस्थितीत पाळणा पार पडला. यावेळी मल्लिनाथ जोडमोटे, संतोष दुधनी, शिवपुत्र म्हेत्रे, केदार माळी, राम माळी, महेश घाले व उदय व्हनमाने यांच्याकडून महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. माळकवठे रस्त्यावरील अष्टविनायक मंदिरातही धार्मिक कार्यक्रम पार पडला. दुपारी पाळण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी परिसरातील भक्तांकडून महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी काशिनाथ ख्याडे, संतोष घाले, सिद्धेश्वर घाले, महेश घाले, चन्नप्पा ख्याडे, विश्वनाथ ख्याडे, मलकारी घाले, माळाप्पा घाले, मलकारी मायनाळे, गुरबसप्पा घाले, विश्वनाथ लच्याणे, विनायक लच्याणे आदींनी परिश्रम घेतले. अष्टविनायक मंदिरात नागनाथ कुंभार, दयानंद कुंभार, सुभाष सुतार, राजकुमार कुंभार, चंद्रकांत कुंभार, श्रीमंत कुंभार,ज्योतिबा बोराळे आदींनी गणेश जयंती उत्साहात पार पाडली.

### टेंभुर्णी येथे नरसिंह प्रतिष्ठानतर्फे गणेश जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २ फेब्रुवारी-**

टेंभुर्णी येथील महादेव गल्ली येथील नरसिंह प्रतिष्ठान, नरसिंह नगर टेंभुर्णी यांच्या वतीने श्री नरसिंह गणेश मंदिरामध्ये गणेश जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी श्री मंगलमूर्ती महिला भजनी मंडळ वाघोली, जय तुळजाभवानी महिला भजनी मंडळ, टेंभुर्णी, श्रीराम महिला भजनी मंडळ टेंभुर्णी यांचा भजनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर श्री संजय शेठ कोठारी यांच्या हस्ते श्री गणेश मूर्तीला अभिषेक करण्यात आला. उपस्थित गणेश भक्तांनी फुलांची उधळण व फटाक्याची आतिषबाजी करून जल्लोषात गणेश जन्मोत्सव साजरा केला. नरसिंह प्रतिष्ठानच्या वतीने अन्नदाते व कोठारी ज्वेलर्स चे मालक संजय कोठारी यांना गणेशाची प्रतिमा भेट देऊन पो. गणेश शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पंचायत समितीचे सभापती विक्रम शिंदे, भाजपचे माढा तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, राष्ट्रवादी युवकचे जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब देशमुख, सतीश नेवसे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी तालुकाध्यक्ष औदुंबर देशमुख, डॉ. गंभीरे, ॲड. रितेश बोबडे, ग्रा. पं. सचिन होदाडे, ऋषिकेश बोबडे, सोमनाथ तांबे उपस्थित होत.



### मोडनिंबमध्ये जयजयकारात पाळण्याचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता. माढा) येथे गणेश जयंती सोहळा धार्मिक व भक्तिमय वातावरणात पार पडला. जयजयकारात पाळणा पार पडला.

श्री गणेशाच्या दर्शनासाठी शहरातील दत्तनगर, श्रीराम चौक, आदर्श नगर, यमाई मंदिरांमध्ये भाविकांच्या सकाळपासूनच रांगा लागल्या. गणपती मंदिरात आकर्षक फुलांची सजावट तसेच विद्युत रोषणाई, रांगोळी करण्यात आली होती. सहस्त्रावर्तन, अभिषेक, महापूजा, कीर्तन, प्रवचन, अथर्वशीर्ष पठण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. भक्त मंडळांच्या वतीने शहरातील विविध मंदिरांमध्ये साग्रसंगीत पूजन, आरतीसह महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रंगीबेरंगी फुलांनी केलेली ही आरास भाविकांचे लक्ष अधिकच वेधून घेत होती. बाप्पाच्या मूर्तीसमोर छोट्या पाळण्यामध्ये श्रीफळरूपी



बाप्पाला बसवून पारंपरिक पाळणा म्हणत बाप्पाचा जन्मोसत्व साजरा करण्यात आला. दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. फटाक्यांची आतषबाजी झाल्यानंतर महाआरती झाली. दिवसभर भजनकीर्तन व गणपती भक्तिगीतांचे कार्यक्रम सुरू होते. गजराज गणेश मंदिर येथे युवा किर्तनकार हभप किरण सुरवसे यांचे कीर्तन झाले. महाप्रसादाने सांगता झाली.

# ज्येष्ठांनी सामाजिक योगदान द्यावे

## आ. डॉ. बाबासाहेब देशमुख : एसएससी १९७५ बॅचचे मित्र संमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ फेब्रुवारी-**

ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे धन असुन त्यानी उर्वरित आयुष्यात समाजाला मार्गदर्शन करावे व आपल्या प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग समाजासाठी करावा असे प्रतिपादन आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केले. ते सांगोला विद्यामंदिर प्रशालेत झालेल्या सांगोल्यातील एस एस सी- १९७५ बॅच मित्र संमेलनात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, विठ्ठलराव शिंदे, चंद्रशेखर अंकलगी, मिरा अंकलगी यांचेसह सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते.

प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी त्यांनी शिकवलेल्या या पहिल्या बॅचचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी मित्र संमेलन आयोजनाची माहिती दिली. यावेळी कै.गुरुवर्य बापुसाहेब झपके यांच्या प्रतिमेचे पूजन दिपक चोथे, चंद्रकांत पतंगे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी विठ्ठलराव शिंदे, एम.डी.बनकर, डी.डी जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरूण पाटील, अशोक पाटील, मोहन माळी, किरण पतकी, रामचंद्र इंगोले, तानाजी घाडगे, अमर गुळमिरे, संदीपान सावंत, नारायण चव्हाण, नंदकुमार ठोंबरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी मुंबई, कल्याण, पुणे, सोलापुर, पंढरपुर, सांगली, कोल्हापुर, खेड या ठिकाणाहून आलेले एस एस सी- १९७५ बॅचचे वर्गमित्र, मैत्रिणी उपस्थित होते.

# आई-बाप हीच खरी दैवते : वसंत हंकारे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**



आई-बाप हीच खरी दैवते आहेत. आई- वडिलांचा आदर करा..व्यसने करु नका. मोबाईलपासून दूर रहा. आपले ध्येय निश्चित करा. आई-वडिलांचा सांभाळ करा. आई-वडिलांसारखे दैवत दुसरे नाही. मुलांच्या गरजेसाठी सर्वतोपरी मदत करणारा हा बापच असतो. आई-वडिलांच्या संस्काराचा अनादर करुन त्यांच्या भावनांना ठेच पोहचू देऊ नका, असे आवाहन प्रा. वसंत हंकारे यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत बाप समजून घेताना या विषयावर ते बोलत होते. यावेळी यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले, संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमारबापू शितोळे, डॉ. प्रकाश बुरगुटे उपस्थित होते. प्रा. हंकारे म्हणाले, क्षणिक सुखासाठी आई-वडिलांना विसरु नका. आई-वडिलांना चुकीचे बोलू नका. त्यांचा राग करु नका. त्यांनी भोगलेले दिवस लक्षात ठेवा. आई-वडिलांना अपमानित करु नका. आई-वडिलांचे कष्ट, जिद्द, चिकाटी लक्षात घ्या. स्वतःच्या सदवर्तनाने आई वडिलांच्या उपकाराची परतफेड करा. यावेळी उपस्थित मुलींच्या डोळ्यातील अश्रू थांबले नाहीत. कित्येक मुलींनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करुन दिली. बाबा.. असे म्हणून एकच हंबरडा फोडला. डॉ. बी. वाय. यादव यांनी कर्मवीर जयंती सोहळ्याविषयी माहिती विशद केली. प्रास्ताविक डॉ. एम. व्ही. मते यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कसबे यांनी करुन दिला. आभार डॉ. आर. ए. फुरडे यांनी मानले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गांधी विचार संस्कार परीक्षेत ज्ञानेश्वरी जाधव जिल्ह्यात प्रथम

**पंढरपूर, दि. २ फेब्रुवारी-**

तालुक्यातील सिद्धेवाडी येथील जवाहरलाल नेहरू हायस्कूलची विद्यार्थीनी ज्ञानेश्वरी श्रीकांत जाधव हिने गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेत जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. ज्ञानेश्वरीला डी. डी. जाधव यांनी मार्गदर्शन केले.तिला मेडल व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. ती नववीमध्ये शिकत आहे.





## संक्षिप्त वृत्त...



### आवताडे शुगर कार्यस्थळावर ३५५ जणांची आरोग्य तपासणी

**मंगळवेढा, दि.२ फेब्रुवारी-**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आवताडे शुगर अँड डिस्टिलरीज नंदूर या साखर कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या संकल्पनेतून कारखाना कार्यस्थळावर ऊस तोडणी कामगार व कारखान्यातील कर्मचाऱ्यांसाठी क्षयरोग व सर्व रोग तपासणी शिबीर पार पडले. यावेळी ३५५ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके व कार्यकारी संचालक मोहन पिसे यांनी श्री गणेशाच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी डॉ. डी.जी. शिंदे, डॉ. नंदकुमार शिंदे, डॉ. अरुणकुमार महिंद्रकर, डॉ. श्रेयश जाधव, डॉ. गौरीशंकर बुगडे, डॉ. महेश माळी, डॉ. सिद्राया बिराजदार, डॉ. आनंद हत्तरसंग, माजी संचालक भारत निकम, सरव्यवस्थापक सुहास शिनगारे, मोहन पवार, डी. बी. बळवंतराव, संभाजी फाळके, बजरंग जाधव, राहुल नागणे, तोहीद शेख, दामोदर रेवे, निलेश रणदिवे, चंद्रकांत राठोड, रणजीत पवार उपस्थित होते.



### शेतकऱ्यांच्या लेकरांनी लुटला बाजाराचा आनंद; कोळेगाव जिल्हा परिषद शाळेत बाजार दिवस

**पिलीव, दि. २ फेब्रुवारी-**

शाळेतील विद्यार्थ्यांना सामान्य व्यवहार ज्ञान मिळावे यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा येथे बाजार दिवस भरविण्यात आला. या बाजाराचा आनंद विद्यार्थ्यांनी लुटला. ताजी भाजी, किराणा माल, खाण्याचे पदार्थ, भेळ, इडली यासारखे पदार्थ घरी बनवून शाळेच्या बाजारात आणले होते. आपल्या आजीबरोबर भाजी मंडईमध्ये जाऊन खरेदी केल्याचा अनुभव असलेले विद्यार्थी मोठमोठ्याने ओरडून बाजार पाहण्यासाठी आलेल्या पालकांना आपल्याकडून खरेदी करावी, असा आग्रह करीत होते. या बाजार दिवसाचे मुख्याध्यापिका रुक्मिणी पारसे, शिक्षिका माधुरी पवार, शिक्षक नवनाथ धांडोरे यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.




### कोळेगाव विद्या प्रबोधिनी स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**पिलीव, दि. २ फेब्रुवारी-**

कोळेगांव (ता. माळशिरस) येथे विद्या प्रबोधिनी इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी पोलीस पाटील बिभीषण दुपडे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी सरपंच रजनी दुपडे, संस्थेचे संचालक सतीश दुपडे, संचालिका रूपाली दुपडे, राजे प्रतिष्ठानचे सागर दुपडे, झेप फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष संतोष माने, संचालिका अनिता माने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा स्कूलमध्ये घेण्यात आल्य. आनंदी बाजार, विविध पारंपारिक वेशभूषा, विद्यार्थ्यांबरोबर पालकांच्यासुद्धा कलागुणांना वाव देण्यासाठी स्पर्धा घेण्यात आल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन पंकज दुपडे व माधुरी पवार यांनी केले. आभार मुख्याध्यापिका प्रियांका सावंत यांनी मानले.



### अमोल भगत कलाभूषण पुरस्काराने सन्मानित

**श्रीपूर, दि. २ फेब्रुवारी-**

श्रीपूर येथील श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय येथील कला शिक्षक अमोल मोहन भगत यांना अजंठा आर्ट अकॅडमी सांगोलातर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय हस्ताक्षर स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी सहभाग याबद्दल कलाभूषण पुरस्कार देण्यात आला. अमोल भगत कला शिक्षक असून विद्यार्थ्यांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण होण्यासंबंधी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत. अमोल भगत यांचे प्रशालेचे मुख्याध्यापक पांडुरंग बनसोडे यांनी अभिनंदन केले.

# करकंब-उंबरे-करोळे रस्त्याची दुरवस्था

## ठिकठिकाणी खड्डे, चाऱ्यांचे साम्राज्य; साईड पट्ट्यांचे मुरमीकरण न झाल्याने होताहेत वारंवार अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२ फेब्रुवारी-**

करकंब ते उंबरे-करोळे (ता. पंढरपूर)या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे व चाऱ्या पडल्याने या मार्गावरील साईड पट्ट्यांचे मुरमीकरण न केल्याने, रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाढलेल्या झाडाझुडपांच्या फांद्यांमुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांसह वाहनचालकांचे हाल होत आहेत.

श्रीपूर येथील साखर कारखान्याकडे जाणारा शेतकरी वर्ग, अकलूज परिसरात जाणारा व्यापारीवर्ग, शिखर शिंगणापूर व पंढरपूर या तीर्थक्षेत्रांना जाणारे भाविक तसेच या भागातील नागरीक, व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी, नौकरदारवर्ग याच रस्त्याने जात असल्याने मोठ्या प्रमाणात वाहनांची



वाहतूक सुरू असते. या रस्त्यावरूनच पांडुरंग सहकारी साखर कारखाना श्रीपूर, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना युनिट नंबर २ करकंब, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना गुरसाळे या कारखान्यांना ऊस घेऊन जाणारी वाहनेही ये-जा करत असतात. साईड पट्ट्यांचे मुरमीकरण न झाल्याने संबंधित वाहनांच्यापुढे जाण्यासाठी पाठीमागील वाहनधारकांना तारेवरची कसरत करत जीव मुठीत धरूनच सदरच्या वाहनास ओलांडून पुढे जावे लागत आहे. या अपूर्ण रस्त्यामुळे एखादा अपघात होऊन कोणी जखमी किंवा मृत होण्याअगोदरच संबंधित ठेकेदार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्यावरील खड्डे व चाऱ्या बुजवणे, साईड पट्ट्यांचे मुरमीकरण करणे, झाडाझुडपांच्या फांद्या काढून वाहन चालकांचा प्रवास निर्धोक होण्यासाठी ही सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशी मागणी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांकडून करण्यात येत आहे. या मार्गावर वाहनांची सतत वर्दळ असते तरीही या रस्त्याच्या दुरुस्तीकडे लोकप्रतिनिधी व प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने याविषयी संताप व्यक्त होत आहे.

### तर गैरसोय दूर होणार

या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम झाल्यास या मार्गावरून सोलापूर ते अकलूज, मोडनिंब ते अकलूज, कुर्डूवाडी ते अकलूज अशा अनेक एसटीच्या फेऱ्या सुरू झाल्यास या मार्गावरील नागरिकांची, प्रवाशांची होणारी गैरसोय दूर होणार आहे. मोडलिंब, करकंब, जळोली, उंबरे, करोळे, श्रीपूर येथील नागरिक अकलूज व अकलूज परिसरात जाण्यासाठी याच मार्गावरून प्रवास करत असतात.

## उसाचे गाळप हंगाम अंतिम टप्प्यात

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यात यंदा पाऊसमान कमी झाल्यामुळे ऊसाच्या क्षेत्रात लक्षणीय घट झाली आहे. यामुळे यंदाच्या गळीत हंगामात तीन महीन्यातच ऊस तोडणी झाल्यामुळे गळीत हंगाम जवळपास अंतिम टप्पयात आला आहे.

यंदा नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणूक झाल्यानंतर गळीत हंगाम सुरु झाला होता. सध्या फेब्रुवारी महीन्यातच पिलीव व आसपासच्या गावातील संपूर्ण उसाचे गाळप झाले आहे. यामुळे ऊसतोडणी मालक त्याचबरोबर ऊसतोडणी कामगार यांना यंदाचा गळीत हंगाम तसा कमी दिवसाचा असल्याने परवडला नसल्याचे बोलले जात आहे. यंदा पिलीव भागात समाधान कारक पाऊस न पडल्यामुळे या भागात ऊस लागवड अतिशय कमी झाली. तसेच पाऊस नसल्याने जो ऊस होता त्याची वाढ चांगली झाली नाही. यामुळेच तर जो ऊस होता तो लवकर तोडुन झाला आहे. पिलीव च्या पश्चिम भागातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, पठाणवस्ती, चांदापुरी, गारवाड, मगरवाडी या भागात यंदा आतापासुनच दुषकाळाचे सावट जाणवत आहे. या भागात लवकरच पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावे लागतील अशी परिस्थिती सध्या आहे.

यंदा या भागातील शेतकऱ्यांनीही पाऊस नसल्याने ऊस लागवड केली नाही यामुळे सुद्धा गळीत हंगामावर परिणाम झाल्याचे जाणवत आहे. पिलीव व आसपासच्या भागातील संपुर्ण ऊसाची तोडणी झाल्यामुळे आता ऊस तोडणी मालकांनी आपला मोर्चा आटपाडी, माण तालुका या भागाकडे वळविला असुन येत्या दहा-पंधरा दिवसात त्याठिकाणी असणारा ऊस सुद्धा संपेल अशी परिस्थिती आहे. काही असो समाधान कारक पाऊस न पडल्यामुळे यंदाचा गळीत हंगाम तिन महीन्याच्या आतच गुडांळला असल्याचे चित्र सध्या पाहवयास मिळत आहे.

## नाविन्यपूर्ण मूल्यमापन पद्धतीचा वापर आवश्यक

### प्राचार्य डॉ. गणेश चव्हाण : शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जानेवारी-**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार नावीन्यपूर्ण मूल्यांकनाच्या पद्धती, परीक्षा पद्धती या अवलंबने ही काळाची गरज आहे आणि त्यानुसारच हे शैक्षणिक धोरण तयार करण्यात आलेले आहे. नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज असणार आहे, असे प्राचार्य डॉ. गणेश चव्हाण यांनी सांगितले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय येथे ३१ जानेवारी रोजी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित समाजदिन सप्ताहानिमित्त व्याख्यानमालेचे पुष्प पाचवे गुंफण्याण्यासाठी एसएनडीटी विद्यापीठातील प्राचार्य डॉ. गणेश चव्हाण बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दीपक गुंड होते.



यावेळी लखन मडके, श्री. सुरज गायकवाड उपस्थित होते. प्रास्ताविक प्रणव भडंगे यांनी केले. प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रा. डॉ. जितेंद्र जळकुटे यांनी करुन दिला.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय शिक्षणाचे असणार आहे. अध्ययन अध्यापनात नाविन्यपूर्ण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच मूल्यमापण पद्धतींचा वापर करणे हे आवश्यक आहे. या बाबींवर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भर देणारे आहे, डॉ. चव्हाण यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी समाजदिन सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानांचा आढावा घेतला. आभार शिवराज घोंगडे यांनी तर सूत्रसंचालन भोसले व बगाडे यांनी केले.

## आध्यात्मिक शिक्षणातून घडते कुटुंब

### काशी जगद्गुरु : वीरशैव सिध्दान्त परीक्षा सुवर्ण केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, २ फेब्रुवारी-**

कुटुंबातील संस्कार जपण्याचे काम फक्त आईच करते. मानवी जीवनामध्ये लौकिक शिक्षणाने आर्थिक प्राप्ती होते, तर आध्यात्मिक शिक्षणाने कुटुंव संस्कारक्षम घडते. तेव्हा वीरशैव धर्मातील जास्तीत जास्त भक्तांनी वीरशैव सिध्दांत परीक्षा द्यावी, असे आवाहन श्री काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींनी आपल्या आशीर्वचनातून केले.



जुळे सोलापुरातील जानकी नगर येथील ओंकारेश्वर मंदिर येथे वीरशैव सिध्दान्त परीक्षा सुवर्ण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी काशी जगद्गुरू बोलत होते. सनातन हिंदू वीरशैव आध्यात्मिक संस्कार केंद्राच्या सदस्या राजश्री गोटे यांची केंद्र संचालिकापदी नियुक्ती केल्याचे पत्र काशी जगद्गुरूंच्या हस्ते प्रदान करण्यात आले. याचवरोवर ५१ व ५२ व्या केंद्राचेही उद्घाटन होऊन शोभा तोरणगी यांना वृहन्मठ होटगी मठ, वाळीवेस तर विनोद मठपती यांना केंद्र संचालकासह उदगीर तालुका प्रमुखपदी नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी सतीश ईसापुरे, डॉ. शिवयोगीशास्त्री होळीमठ, ईश्वर होळीमठ, विकास गोटे, सुभाप महंत, काशीनाथ जोडमोटे, हिंदू लिंगायत मंच शहर संयोजक चिदानंद मुस्तारे, सहसंयोजक सचिन विभूते आदी उपस्थित होते. प्रास्ताविक परीक्षा विभागप्रमुख राजेंद्र वलसुरे यांनी केले. स्वागत गुरुशांत रामपुरे यांनी तर आभार राजू पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन रेवणसिध्द वाडकर यांनी केले.

## प्रा. विजयकुमार भांजे यांचे वखारिया विद्यालयात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

तालुक्यातील उपळे दुमला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त शनिवारी बार्शी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रा. विजयकुमार भांजे यांचे श्रम, शिक्षण आणि यश या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर उपस्थित होते. प्रा. भांजे यांनी कर्मवीर मामांनी श्रम आणि शिक्षणाला महत्व देत, बहुजनांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा पोहचवून ज्ञान प्रकाशाने अनेकांची घरे उजळून टाकण्याचे काम केले, हे सांगतानाच घराघरांतून श्रमाचे संस्कार केले गेले तर प्रत्येकजण सुखी समाधानी होईल, पराभव दिसला तरी हताश न होता पराभवाच्या मस्तकावर पाय देवून खंबीरपणे उभे राहिल्यास यश नक्कीच मिळते. हा आत्मविश्वास दिला. कितीही मोठे झालात तरी आई-वडील आणि शिक्षक यांना विसरु नका, हा संदेश ही दिला. प्रा.भांजे हे इतिहासाचे चिकित्सक अभ्यासक व संशोधक असून त्यांनी हैदराबाद मुक्ती संग्रामातील आर्य समाजाचे योगदान,भारतीय समाज व्यवस्थेतील लिंगायत समाजाचे योगदान या विषयावरील संशोधन केले आहे. शंकर शिंदे यांनी प्रास्ताविक केले तर महाले यांनी पाहुण्याचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन राधिका पवार व समृद्धी ठोंगे यांनी केले तर आभार मकरंद जगदाळे यांनी मानले.

## ट्रॉय पब्लिक स्कूलमधून सक्षम पिढी घडविण्याचे कार्य

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २ फेब्रुवारी-**

हत्तूर येथील ट्रॉय पब्लिक स्कूलमधून संस्कारक्षम, गुणवत्तापूर्ण सक्षम विद्यार्थी घडविण्याचे कार्य होत आहे. ग्रामीण भागात उत्तम ज्ञानदान व सुजाण नागरिक घडविण्याच्या शिकवणुकीमुळे या शाळेचे लवकरच वटवृक्षात रूपांतर होणार असल्याचे प्रतिपादन कामतीचे श्रीकृष्ण गुरूकुलचे संस्थापक प्रमोद आवताडे यांनी केले.

ते अग्निपंख बहुउदेशीय संस्था संचलित ट्रॉय पब्लिक स्कूलच्या स्नेहसंमेलन कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी



शोभाश्री पतसंस्थेचे चेअरमन किरण पुजारी होते. यावेळी श्रीकृष्ण गुरुकुलचे उपाध्यक्ष मामा निकम, शहर पोलीस पिंटू जाधव, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर रमेश जाधव, युवा उद्योजक सलीम शेख, जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष राघवेंद्र पाटील, ससून रुग्णालयाचे अधिकारी अरुण बनसोडे, पुणे येथील सॉफ्टवेअर इंजिनिअर प्रशांत कवेकर, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा उपप्रमुख अणप्पा सतुबर,अमजद नदाफ, बनसिध्द पटेवडीयार, मलकारसिद्ध पतसंस्थेचे चेअरमन संदीप कोळी, बंटी गायकवाड, रेवणसिध्द भरले आदी उपस्थित होते

यावेळी केदार डोळे, महेश आवताडे, रवी डोळे, जिलानी शेख, विनोद न्हावी, संस्थेचे अध्यक्ष खाजामिन अतार, सचिव श्रीकांत भरले, सोमनाथ वाघमोडे, बनसिध्द वडरे, मुख्याद्यापिका रेश्मा जमादार, मलकारी कोरे, मल्लू आकळवाडे, संतोष कुलकर्णी, महादेव ममदापुरे, इरण्णा भरले, सोमनिंग व्हनमाने, कल्लप्पा हिरकुर, दावल लोणी, प्रदीप पाटील, इरफान अतार आदी उपस्थित होते. प्रास्ताविक खाजामिन अतार यांनी केले. सूत्रसंचालन रेश्मा जमादार यांनी केले, तर श्रीकांत भरले यांनी आभार मानले. यावेळी चिमुकल्यांनी हिंदी, मराठी, तेलुगु गाण्यावर पारंपरिक नृत्य सादर करून श्रोत्यांची दाद मिळविले.

### ध्येय निश्चित केल्यास यश हमखास

विद्यार्थ्यांनी ध्येय बाळगून वाटचाल केल्यास भविष्यात यश मिळण्यास मदत होईल. त्यासाठी पालकांनी पाल्यांना योग्य मार्गदर्शन करून सहकार्य करण्याचे आवाहन अणप्पा सतुबर यांनी केले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भाजपा सदस्य नोंदणी अभियानास वाशी येथे उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ फेब्रुवारी -**
भारतीय जनता पार्टीच्या वतीने महाराष्ट्रात सदस्य नोंदणी अभियान राबवून मोठ्या प्रमाणात भाजपाचे सदस्य करून घ्यावयाचे होते.

त्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी असल्याने भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव आप्पा आखाडे यांच्या सुपीक डोक्यातून वाशी शहरांमध्ये छत्रपती शिवाजी चौकामध्ये अभियान राबविण्याची कल्पना तालुका अध्यक्षा यांना दिली.

त्यानुसार वाशी तालुका अध्यक्ष राजगुरू कुकडे यांनी शिवाजी चौकामध्ये पाच २५ खुर्च्या टेबल लावून सकाळी दहा ते चार वाजेपर्यंत सदस्य नोंदणी अभियान राबवले.

यामध्ये भाजपा वाशी तालुका सरचिटणीस प्रशांत कुलकर्णी तालुका कोषा अध्यक्ष सुहास चौगुले तसेच विनायक टेकाळे, गणेश कवडे, सुधाकर देवडीकर, विलास क्षीरसागर, यांनी उपस्थित राहून सदस्य नोंदणी केली. यावेळी १०० चे वर सदस्य नोंदणी झाली.

शेवटच्या दिवशी भाजपा नोंदणी अभियान वाशी येथील मुख्य ठिकाणी राबविल्यामुळे गावातील नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात असून कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले जात आहे.



## संक्षिप्त वृत्त...




### 'पोदार' मध्ये विद्यार्थ्यांची दंततपासणी

**उमरगा, दि.२ फेब्रुवारी -**
शहरातील पोदार जम्बो किड्स शाळेतील नर्सरी, ज्युनिअर व सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा इवायएफएस अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून दात तपासणी म्हणजेच दंतचिकित्सा हा कार्यक्रम संपन्न झाला.ह्या कार्यक्रमास डॉ. साधना ईनामदार उपस्थित होत्या व त्यांनीच सर्व चिमुकल्यांना दातांचे आरोग्य कशाप्रकारे राखता येईल व त्याची निगा कशी राखावी. याबदल मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी प्रत्येक मुलाच्या दातांची तपासणी करून त्या मुलांना एक टूथब्रश व प्रमाणपत्र देऊन दातांच्या आरोग्याबदल मार्गदर्शन केले. ह्या उपक्रमासाठी मुख्याध्यापक श्रीकांत वारुडे, उपमुख्याध्यापक अतुल फावडे, मंजिरी सूर्यवंशी व त्यांच्या सहकारी रागिनी जावळे, अश्विनी पाटील, ज्योती काळे, आश्विनी दुधभाते, नीतीप्रिया पांचाळ, रेणूका हिरमुखे, विजयालक्ष्मी अंबुसे, अनुसया शिंदे, अंजली क्षीरसागर, सरस्वती भालके यांनी परिश्रम घेतले.



### गणेश जयंतीनिमित्त हरिनाम सप्ताह

**येरमाळा, दि.२ फेब्रुवारी -**
धाराशिव तालुक्यातील येडशी येथे दि.२६ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाची सुरुवात दि.२६ रोजी सकाळी हस्ते कलश पूजन करून झाली. विना पुजन देशमुख परिवार यांच्या हस्ते तर टाळ व मृदंग पुजन जेष्ठ ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. येडशी येथील देशमुख गल्लीतील गणेश मंदिरासमोर गणेश जयंतीच्या निमित्त होणाऱ्या या सप्ताहाचे १८ वे वर्ष असुन त्याची सुरुवात विघ्नहर्ता गणेश भक्त मंडळ व परिवार येडशी यांनी केली आहे. या सप्ताहामध्ये दररोज रात्री ९ वाजता किर्तनाचे कार्यक्रम झाले. तर हभप. प्रकाश महाराज बोधले यांच्या दि.२ रोजी झालेल्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.



### सुनील धानुरे यांचा सत्कार

**जळकोट, दि.२ फेब्रुवारी -**
हराळी येथील युवक सुनील धानुरे यांची पाषाण (पुणे) येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. आई-वडिलांनी शेतात कष्ट केल्याची जाणीव ठेवत सुनील धानुरे या युवकांनी वयाच्या २३ व्या वर्षात यश संपादन केले आहे. गेल्या काही वर्षांत हराळी गावातील अनेक युवक विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत शासकीय विभागात विविध पदांवर विराजमान झाले आहेत. हराळी येथील ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजकुमार धानुरे, अनिल धानुरे, उपसरपंच रविंद्र पाटील, अजित सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी, राहुल पाटील, संतोष मोरे, श्रीराम धानुरे, आनंद सूर्यवंशी, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, नितीन सूर्यवंशी, मनोज पाटील, धनराज सूर्यवंशी, बाळासाहेब कस्तुरे, ज्योतलींग कंटेकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



### पोलिस अधीक्षक यांची तेरला भेट

**उमरगा, दि.२ फेब्रुवारी -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी भेट दिली. तेर येथे जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय पुराणवस्तू संग्रहालयात भेट देऊन पुरातन वस्तूंची पहाणी करून तेर दुरक्षेत्र कार्यालयास भेट देऊन पाहणी केली. यावेळी मेघा राऊत, भाग्यश्री बिराजदर, अविनाश राठोड, किसन काळे, सविता बागडे आदी उपस्थित होते.

### हळदी, कुंकू-माता पालक मेळावा संपन्न

**मंगरूळ, दि.२ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगरूळ येथे शनिवार १ फेब्रुवारी रोजी बाल आनंद बाजार व माता पालक यांच्यासाठी हळदी कुंक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याकार्यक्रमाचे उद्घाटन उपसरपंच गिरीश डोंगरे, लक्ष्मण माळी, चांदसाहेब शेख, आदमशा फकीर, आप्पासाहेब जेटीथोर, दिलीप जाधव, मनोज डोंगरे, उद्धव हजारे व उपस्थित माता पालक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक डोलारे, हेरकर, रामशेटे, वडुळे, युवा प्रशिक्षणार्थी डोलारे यांच्यासह युवक, ग्रामस्थ उपस्थित होते.

### धाराशिवला अद्ययावत सुविधांसह रेल्वेस्थानक होणार तिप्पट मोठे...

# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाची सुधारित प्रकल्प किंमत ३००० कोटी

### रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली निधीची मागणी... आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**
धाराशिव रेल्वेस्थानक प्रस्तावित होते त्यापेक्षा तिप्पट मोठे होणार आहे. नवीन पर्यायी रेल्वेमार्ग (लूप लाईन) उभारला जाणार आहे आहे. प्रवासी बांधवांसह रेल्वेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी विविध सोयीसुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. रस्त्याच्या वरून आणि खालून जाणाऱ्या पुलांची संख्येत वाढ करण्यात आली आहे. सोलापुर शहरातील जागा संपादन करताना तिथले प्रचलित दर गृहीत धरले आहेत. तसेच वाढलेल्या कामांच्या साठी लागणारे वाढीव भूसंपादन या सर्व बाबींचा विचार करत भूसंपादनासाठी तब्बल १ हजार कोटी रुपयांचा आराखडा अंतिम करण्यात आला आहे.

ठाकरे सरकारने राज्य हिस्स्याचा पन्नास टक्के वाटा न दिल्याने रेल्वेमार्गाचे काम अडीच वर्ष रखडले. त्यामुळे प्रकल्प किंमतीत ११७.४९ टक्के म्हणजेच रु.१०६३.२३ कोटींची वाढ झाली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ९०० कोटी रूपयांच्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गासाठी आता ३००० कोटी रुपये लागणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी वाढीव प्रकल्प किंमतीनुसार रेल्वे बोर्डाने निधीची तरतूद करावी अशी मागणी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर आणणाऱ्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाला २०१९ साली मंजुरी मिळाली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कामाचा शुभारंभही झाला. ८४.४४ किमी अंतराच्या महत्वपूर्ण प्रकल्पाचे २०१९ साली भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर राज्यात ठाकरे सरकार आले. तत्कालीन ठाकरे सरकारने राज्याचा हिस्सा तातडीने देणे अपेक्षित असताना एक छदामही दिला नाही. परिणामी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाचे काम पुन्हा अडीच वर्ष रखडले. पूर्वी एकूण ८४.४४ किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी एकूण ९०४ कोटी ९२ लाख रुपयांची मंजुरी देण्यात आली होती. आता त्यात साधारणपणे दुपटीने वाढ झाली आहे. आपण सातत्याने विधिमंडळात हा विषय लावून धरला होता. ठाकरे सरकारच्या कालावधीत तत्कालीन परिवहन मंत्री अनिल परब यांनी तातडीने या महत्वपूर्ण रेल्वेमार्गासाठी राज्य वाटयाचा हिस्सा देण्यासाठी पावले उचलली असती आणि निर्णय घेतला असता तर कदाचित हा प्रकल्प आतापर्यंत पूर्णही झाला असता. जून २०२२ मध्ये राज्यात पुन्हा एकदा आपले महायुती सरकार आले. शिंदे-फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गतिमान कारभार सुरू झाला. आपले सरकार आल्याने या रेल्वेमार्गाबाबत सर्व अनुषंगिक बाबींची पूर्तता तातडीने करवून घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीर्थक्षेत्र तुळजापूरला रेल्वेच्या नकाशावर आणण्याचा जिल्हावासीयांना दिलेला शब्द लवकरच पूर्णत्वाला जाईल अशी खात्री आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.

या नवीन रेल्वेमार्गामुळे प्रवासी संख्या निश्चितच वाढणार आहे. त्यामुळे पायाभूत सोयीसुविधांची अडचण होऊ नये याकडे आपण लक्ष वेधले होते. त्यानुसार धाराशिवचे रेल्वेस्थानक आता अधिक सुसज्ज आणि अद्ययावत होणार आहे. मुख्य रेल्वेस्थानकाची इमारत ४००० चौरस मीटरवरून तब्बल १२,६३० चौरस मीटर होणार आहे. एकंदरीत मुख्य रेल्वेस्थानकाची इमारत तिप्पट मोठी होणार आहे. पूर्वीच्या आराखड्यानुसार ११,४०० चौरस मीटर मान्यता असलेल्या सर्व्हिस इमारती सुधारित आराखड्यानुसार १७,६०० चौरस मीटर होणार आहेत. वेगात जाणाऱ्या जलदगती रेल्वेगाड्यांना तात्काळ मार्ग मिळावा यासाठी आवश्यक असणारी पर्याय व्यवस्थाही हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार यार्डाच्या आवश्यकतेनुसार मोठ्या लांबीची लूप लाईन अंथरली जाणार आहे. विविध रस्त्यांखालून जाणाऱ्या पुलांची संख्या यापूर्वी २० होती त्यात वाढ करण्यात आली असून ३१ रस्त्यांच्या खालून रेल्वेमार्गासाठी पूल तयार केले जाणार आहेत. राष्ट्रीय महामार्गावरील सर्वात महत्वाचा पुलाची लांबीदेखील वाढणार आहे. ३८५ मीटर ऐवजी आता हा पूल ३९९ मीटर लांबीचा असणार आहे. याव्यतिरिक्त प्रावशी बांधवांसाठी अनेक महत्वपूर्ण सोयीसुविधांचा यात अंतर्भाव करण्यात आला आहे. पथमार्ग, दादरा, प्लॅटफॉर्म यासह जमिनीखालील आणि जमिनीवरील पाण्याच्या मोठ्या टाक्यांची उभारणीही केली जाणार आहे. यापूर्वी ही सर्व कामे २,८७,८७२ चौरस मीटर जागेवर केली जाणार होती आता त्यात वाढ करण्यात आली असून ४,४४,९२२ चौरस मीटर क्षेत्रावर या सर्व सोयीसुविधा साकारल्या जाणार आहेत.

रेल्वेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची संख्याही ३४२ वरून ३७३ एवढी करण्यात आली आहे. त्यासाठी सुधारित आराखड्यानुसार ३००० कोटी रुपये खर्च येणार असल्याचे रेल्वे बोर्डाने सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

### रेल्वेमंत्री वैष्णव यांना मुख्यमंत्र्यांचे पत्र : आमदार पाटील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीपासून या प्रकल्पाकडे लक्ष दिले आहे. राज्यात सत्ताबदल झाल्याबरोबर त्यांनी प्राधान्याने हा विषय अजेंड्यावर घेतला. तुळजाभवानीच्या चरणी हा रेल्वेमार्ग समर्पित करण्यासाठी तातडीने राज्याच्या वाट्याचा ५० % हिस्सा देण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री महोदयांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना २० जानेवारी रोजी पत्र लिहून सुधारित किंमतीनुसार सादर करण्यात आलेल्या आराखड्यानुसार केंद्राच्या वाट्याचा निधी लवकर देण्यात यावा अशी मागणी केली असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

## महात्मा गांधी विद्यालयात भरला आनंद बाजार

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ फेब्रुवारी -**
महात्मा गांधी विद्यालय परंडा येथे चिमुकल्यांनी विविध वस्तूंची दुकाने थाटून व्यापार कसा करावा हे आज सिद्ध करून दाखवले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख दत्त साळुंखे, पोनि. इज्जपवार साहेब, नसीरभाई शहाबर्फी वाले, मेघराज पाटील, भाऊसाहेब खरसडे, श्रीहरी नाईकवाडी, माऊली गोडगे, जनार्धन मेहेर साहेब, नंदू शिंदे, शेरे अनेक पालक, तसेच अनेक महिला पालकांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावून या छोट्या व्यापाऱ्यांचा उत्साह द्विगुणीत केला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ, स्टेशनरी, भाजीपाला, फळे, चहा, दूध अशा विविध वस्तूंची १०० ते १२० दुकाने थाटली होती.

या सर्व मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे मुख्याध्यापक रणजीत घाडगे, पर्यवेक्षक काशीद, ठाणंबीर, मिसाळ व विद्यालयातील सर्वच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

## वाशी तालुक्यात वरिष्ठांच्या चुकीमुळे भाजपाला खिंडार ?



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ फेब्रुवारी -**
वाशी तालुक्यातील भाजपचे वाशी शहराध्यक्ष बळवंतराव श्रीमंतराव कवडे, भाजपा महिला कार्यकारिणी सदस्या संजना चौधरी, जिल्हा व्यापारी संघ सदस्य शिवशंकर चौधरी व तालुका उपाध्यक्ष देशमुख विलासराव अशा चार भाजपाच्या तालुका पदाधिकाऱ्याने आपल्या पदाचे राजीनामे जिल्हाध्यक्ष चालुक्य यांच्याकडे पाठवले आहेत.

त्यांच्या प्रमाणेच तालुक्यातील काही भाजपाचे पदाधिकारी राजीनामे देणार असल्याचे विचारात असल्याने तालुक्यातून भाजपाला फार मोठे खिंडार पडणार असल्याचे लवकर दिसून येईल, असे विश्वसनीय गोटातून समजते.

चार पदाधिकाऱ्यांनी राजीनामा पत्रात आपल्या वैयक्तिक अडचणीमुळे राजीनामा देत असल्याचे लिहिले असेल तरी खरे कारण म्हणजे वरिष्ठ नेत्यांच्या कारभाराला व एकाधिकार शाहीला कंटाळून राजीनामे दिले असून अशाप्रकारे तालुक्यातून बरेच कार्यकर्ते नाराज असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. तसेच सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते असूनही त्यांची एकही कामे होत नाहीत; वरिष्ठ नेते स्वतःची च पोळी भाजून घेत आहेत. सामान्य कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करीत आहेत अशा विविध कारणामुळे नाराज होऊन पदाचे राजीनामे दिल्याचे विश्वसनीय समजते.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत्या काळात होण्याची शक्यता असताना भाजपामध्ये नाराजीचे विपरीत सत्र सुरू असल्याने त्याचा पक्षावर फार मोठा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याकरिता वरिष्ठ नेत्यांनी याची त्वरित दखल घेऊन भाजपामध्ये होऊ लागलेली गळती थांबवावी अशी सामान्य कार्यकर्त्यांची मागणी आहे.

## पायीवारी दिंडी व पालखीचे न.प.च्या वतीने स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ फेब्रुवारी -**
श्री. नाथ संस्थान औसा येथून निघालेली माघ वारी निमित्त पंढरपूरकडे निघालेली पायीवारी दिंडी व पालखीचे तुळजापूर खुर्द येथे आगमन झाले असता नगरपरिषदेच्या वतीने न प. चे कार्यालयीन अधीक्षक वैभव पाठक, कर्मचारी प्रमोद भोजने, न.प. शाळा क्रमांक ३ चे मुख्याध्यापक तुकाराम मोटे सर यांनी स्वागत केले.

यावेळी गणेश नन्नवरे, हणमंत साबळे, हनमंत माळी, शंकर भोजने, संतोष एकदंते, ॲड. बालाजी देशमाने आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना हमीभाव नाही : आ. पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**
केंद्रीय अर्थसंकल्पात डाळ उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले असले तरी, शेतकऱ्यांचा विचार न करता व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठी योजना आखण्यात आल्याचा आरोप आमदार कैलास पाटील यांनी केला. सरकारने शेतकऱ्यांना हमीभाव न देता केवळ उत्पादन वाढीवर भर देणे म्हणजे व्यापारीधार्जिणे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना आमदार पाटील म्हणाले, शेतकऱ्यांना हमीभाव उत्पादन खर्चावर आधारित मिळायला हवा, पण धोरणकर्ते व्यापारी व दलालांचीच अधिक काळजी घेत आहेत. शेतकरी कष्ट करून माल पिकवतो, पण आयात-निर्यात धोरणामुळे त्याला कवडीमोल दराने आपला माल विकावा लागतो.

किसान क्रेडिट कार्ड मर्यादा पाच लाखांपर्यंत वाढविली असली, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. सीबील आणि एकरकमी परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना बँका कर्ज देत नाहीत, त्यामुळे अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहतात, असेही त्यांनी सांगितले.

## संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार शिक्षण उपसंचालकांना देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**
प्राथमिक व माध्यमिक शिक्षक कर्मचाऱ्यांच्या संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार त्या त्या विभागातील विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देण्यात यावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या दोन तीन वर्षांपासून अनेक शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक संचमान्यतेमुळे त्रस्त आहेत. संचमान्यता दुरुस्तीसाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांना पुणे येथील शिक्षण संचालक कार्यालयात चकरा माराव्या लागतात. अनेकदा चकरा मारुनही दुरुस्तीचे काम होत नाही. मुख्याध्यापक, शिक्षक यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. संचमान्यता दुरुस्ती न झाल्यामुळे शिक्षकांवर टांगती तलवार असते. विभागीय शिक्षण उपसंचालक यांना संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार दिल्यास संचमान्यता दुरुस्ती लवकर होण्यास मदत होईल. शिवाय मुख्याध्यापक, शिक्षक यांना होणारा नाहक त्रासही कमी होईल.

तसेच सेमी इंग्रजी तुकडयांची मान्यता शिक्षणाधिकारी स्तरावरच मिळावी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शाळाबाह्य कामे देऊ नयेत, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणीसाठी शिक्षकांच्या ऑफलाईन प्रशिक्षणाचे आयोजन त्वरित करण्यात यावे, माध्यमिक शिक्षक कर्मचाऱ्यांची प्रलंबीत फरक बीले, वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके त्वरित काढावीत, यासह अनेक महत्त्वपूर्ण मागण्या शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.

> उच्च माध्यमिक शाळा, स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालक यांना आहेत. त्या धर्तीवर प्राथमिक व माध्यमिक शिक्षक कर्मचाऱ्यांच्या संचमान्यता दुरुस्तीचे अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देण्यात आले. तर संचमान्यता दुरुस्ती प्रकरणे गतीने निकाली निघतील. शिवाय यासाठी होणारा मुख्याध्यापक व शिक्षक यांचा त्रास कमी होईल.
>
> **- उमाकांत कुलकर्णी,**
> राज्य कार्याध्यक्ष.

## १० व्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाची ग्रंथदिंडीने सुरुवात



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**
शिक्षणमहर्षी वसंतराव काळे प्रतिष्ठान, किसान वाचनालय पळसप आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १० व्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाची सुरुवात रविवार, दि.१० जानेवारी रोजी सकाळी भव्य ग्रंथ दिंडीने करण्यात आली.

ग्रंथ दिंडीचे उद्घाटन संमेलनाध्यक्ष आसाराम लोमटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष आ. विक्रम काळे, प्राचार्य अनिल काळे, अनुराधा काळे, शुभांगी काळे, प्राचार्य मधुकरराव कुंभार, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा. अंकुश नाडे, गंगाधर आरडले, बालाजी तांबे, राजकुमार मेढेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रंथदिंडीत विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्ती व महापुरुषांच्या वेशभूषा करून सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या वेशभूषेने सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

पळसप गावातील प्रमुख मार्गावरून ही दिंडी संमेलन स्थळी पोहचली. दिंडीत ज्ञानविकास प्राथमिक विद्यामंदिर पळसप, जि.प. प्राथमिक विद्यामंदिर पळसप, जि.प. हायस्कुल पळसप, वसंतराव काळे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय ढोकी, राजर्षी शाहू विद्यालय गौर (ता. कळंब), सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय शिरढोण, लोकनायक विद्यालय नायगाव, जिजामाता प्राथमिक विद्यालय लातूर, जिजामाता माध्यमिक विद्यालय लातूर यासह धाराशिव व लातूर जिल्ह्यातील शाळेचे विद्यार्थी, किसान परिवाराचे सदस्य, मराठवाड्यातून आलेले साहित्यिक आणि पळसप व परिसरातील ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# महानुभाव पंथाच्या श्रद्धास्थळांचा विकास करणार : फडणवीस

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०२ फेब्रुवारी**

पुढील पाच वर्षामध्ये महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रध्दास्थळांचा विकास करण्याचा संकल्प राज्य शासनाने केला आहे. काही ठिकाणी विकास कामांना सुरुवात झाली आहे, उर्वरित ठिकाणी लवकरच कामे सुरु होतील,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

नांदेड जिल्ह्यातील महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या हदगाव येथील श्री. गुरुवर्य बापू नगर परिसरातील श्रीकृष्ण देव उखळाई मंदिराच्या नवपर्व व कलशारोहण सोहळ्यात उद्घाटक म्हणून ते उपस्थित होते. मराठवाडा,विदर्भ व महाराष्ट्रातील ठीक ठिकाणच्या महानुभाव पंथाच्या मठाधिपतींसह हजारोच्या संख्येने महानुभवपंथीय या सोहळ्याला उपस्थित होते.

वैराग्यमूर्ती मठाधिपती महंत श्री. योगी बापू यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तर माहूर पिठाधीश कवीश्वराचार्य माहुरकर बाबा यांच्यासह परिसरातील मठाधिपती धर्मपीठावर विराजमान होते. महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या या मठाधिपतींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महानुभाव पंथीयांसाठी केलेल्या कार्यकर्तृत्वाला लक्षात घेऊन स्तुती सुमनांनी साकारलेले सन्मानपत्र बहाल केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम चक्रधर स्वामीना दंडवत घातला. त्यानंतर धर्मपीठावरून बोलताना सर्वज्ञ चक्रधर स्वामी व त्यांच्या अनुयायांनी अतिशय विपरित परिस्थितीत धर्म रक्षणाचे कार्य केल्याचे स्मरण केले.महानुभव पंथीयांच्या कार्यकर्तृत्वाचा त्यांनी गौरव केला.परकीय आक्रमणामुळे कृष्णदेवाची पुजा करून घेणे, हिंदू म्हणवून घेणे कठीण होते. त्या काळात चक्रधर स्वामीनी जातीपाती, पंथाचा विचार न



करता महानुभव दाखवला, समरसता व समतायुक्त समाज त्याकाळी देशात निर्माण केला.

महाराष्ट्र शासनाने राज्यभरात आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी महानुभाव पंथीयांचे मंदिर आहेत. त्या मंदिरांचा विकास करण्याचे काम केल्याचे सांगितले.रिद्धपुरचा पांचाळेश्वर, जाळीचा देव, गोविंदप्रभू देवस्थान या अनेक ठिकाणी संवर्धनाचे काम सुरु आहे. याही पुढे हे कार्य सुरू राहील,असे आश्वस्थ केले. तसेच या स्थळांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे हटविण्यासाठी चर्चे तून मार्ग काढून येथील विकास कामे केली जातील. चांगल्या कामांसाठी राज्य सरकार ताकदीने पाठिशी उभे राहील, असे सांगितले.

यावेळी त्यांनी महानुभावपंथीयांच्या ग्रंथ प्रेमाची, धर्म साहित्य निर्मितीच्या चिकाटीचे कौतुक केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, राजमान्यता मिळाली. यामध्ये महानुभाव साहित्याचा मोठा वाटा आहे. आपण जे पुरावे दिले आणि जे स्वीकारले गेले.यातील एक महत्वाचा पुरावा लीळाचरित्र होते. मराठी भाषा किती प्राचीन याचा पुरावा यानिमित्ताने देता आला.लीळाचरित्र ग्रंथ ज्या ठिकाणी लिहिला गेला, त्या रिद्धपूरला मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठाचा विकास पुढील टप्यात करण्यात येणार आहे. महानुभाव पंथाच्या माध्यमातून मराठी भाषा विद्यापीठाचा उपयोग करून आपले साहित्य ,विचार,अध्यात्म जगभरामध्ये पोहोचवण्याचे काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. देशाच्या कानाकोप-यात नाही तर अफगाणिस्तानपर्यंत महानुभव पंथ पोहोचला आहे. आज इतका मोठा संप्रदाय आपल्याला समतेच्या अधिष्ठानावर काम करतांना दिसतो. आज या धर्मपीठावर या स्थानावर इतकी मोठी महंत मंडळी येऊन गेली. तत्पूर्वी, त्यांनी आगमन झाल्यानंतर जीर्णोद्धार करण्यात आलेल्या उखळाई माय मंदिरात जाऊन मायचे विडाअवसर ( दर्शन घेतले ) केले. आजच या ठिकाणी संत महात्म्यांच्या उपस्थितीत कलशारोहण झाले. हे मंदिर पाचशे वर्षापूर्वीचे असल्याची मान्यता आहे. यावेळी त्यांनी श्रीकृष्ण मूर्तीचे भक्तार्पण केले. कार्यक्रमाचे आयोजक वैराग्यमूर्ती दत्ता बापू यांचा त्यांनी सत्कार केला. भक्तांना प्रातिनिधिक सेवा पुरस्कार बहाल केला. या कार्यक्रमाला बाळासाहेब ठाकरे हरीद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ.हेमंत पाटील, हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर,आ. भीमराव केराम, आ. आनंद पाटील बोंढारकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर,आ. बालाजी कल्याणकर,नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार सुरेखा नांदे, आदीसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या महानुभव पंथाचे पिठाधीशांसह मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक योगीबापु विद्वांस यांनी केले तर आभार संदिपराज दादा कपाटे यांनी मानले. यावेळी अविनाश ठाकरे व कारंजेकर बाबा यांनी मनोगत व्यक्त केले.

**महाराष्ट्रातील उपस्थित पीठाधीश**

अ.भा.म.प. अध्यक्ष प.म.श्री विद्वांसबाबा, माहूर पिठाधीश आचार्य श्री माहूरकरबाबा, उपाध्य कुळाचार्य वर्धनस्थबाबा, प.म.श्री. रिधपुरकर बाबाजी, पारिमांडाल्य कुळाचार्य लासुरकर बाबाजी, कविश्वर कुळाचार्य करंजेकर बाबाजी, प.म.श्री मठाधीपती महंत योगीबापु, श्रीगुरु दत्ताबापु, गोपीराजबाबा, कान्हेराज बाबा विद्वांस,पुणंताबेकर महानुभाव, परसराज बाबा विद्वांस, संदीपराज शास्त्री कपाटे, अर्जुनराज दादा नांदेडकर, रमेशराज शास्त्री कपाटे, महंतबाबा वाघोदेकर, बाळकृष्णदादा सरळ, भाईदेवमुनी नांदेडकर, मधुकरदादा धाराशिवकर,विजयराजदादा कारंजेकर आदीसह अन्य पिठाधीशांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी श्रीमती शकुंतला पाटील

**देगलूर**-तालुक्यातील शिवणी येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक जाहीर करण्यात आली होती.रमेश सोनकांबळे शिवणीकर माजी पं. स. सदस्य देगलूर यांच्या मार्गदर्शनाखाली ती निवडणूक न करता गावातील प्रतिष्ठित नागरिकांना एकत्र बसून निवडणूक न करता बिनविरोध करण्याचे ठरवण्यात आले. त्यात चेअरमन पदासाठी श्रीमती शकुंतलबाई निळकंठराव पाटील तर वाईस चेअरमन इरशेट्टी माधप्पा जक्कावाड यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आले.सदस्य हणमंत मारोती पेंडपल्ले,माणिक संगप्पा कवरे, संग्राम गवर्धन पाटील, रमेश लालू सोनकांबळे,रमेश इरन्ना पेंडपल्ले, शिवराज हणमंतराव पाटील, हणमंत मारोती माली पाटील, संजय गंगायप्पा मठपती, हणमंत सिद्धगोड्डा हड्डे, यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आले आहे. निवडणूक अधिकारी म्हणून श्री तम्मेवाड,गुलबराव कुलकर्णी,सचिव राजुरे यांनी कार्यरत होते. या वेळी उपसरपंच नंदकुमार पाटील, हणमंत बुक्के, बसवंत जक्कावाड,शिवराज तांगवार, बसवंत तांगवार, रघुनाथ गाडेकर, चंद्रकांत मठपती, बसवंत चेंडके, चंद्रकांत वाघमारे, बाबू उपलवारे, गंगाराम उपलवारे, शिवराज कवरे, विजय कुलकर्णी, माधव जक्कावाड, दयानंद मठपती, व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते. त्यांच अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिले.

### मुदखेड मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार साहेबराव हौसरे यांचा सत्कार



**मुदखेड**-सामाजिक शैक्षणिक साहित्यिक सांस्कृतिक आधी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुदखेड येथील दैनिक गोदातीर समाचारचे ज्येष्ठ पत्रकार साहेबराव हौसरे यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठाण उमरीच्या वतीने दि.२७ जानेवारी रोजी मुदखेड येथे चौथ्या जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य समेलनात माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आला आहे. साहेबराव हौसरे यांना उत्कृष्ट पत्रकारिता २०२५ चा पुरस्कार मिळाल्याबद्दल मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दि. ३१ जानेवारी रोजी शासकीय विश्रामग्रह येथे त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. तसेचे सा. सिता वार्ता चे मुख्य संपादक कुणाल चौधरी यांनी देखील हौसरे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी सा. देशवाणीचे संपादक शेख अजगर हुसेन साब, उत्तम हानमंते, साहेबराव गागलवाड, संतोष पाटील गाडे,प्रल्हाद मस्के, सिद्धार्थ चौदंते, धम्मा कांबळे, अब्दुल रज्जाक, हाफिज कुरेशी, महम्मद हकिम, यांची उपस्थीती होती.साहेबराव हौसरे यांना पुरुस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

### साध्वी मुक्ताईनाथ माऊली यांच्या भागवत कथेला उमरीत सुरूवात

**उमरी**-उमरी शहरातील श्रीसंत दासगणूनगर, शिक्षक कॉलनी भागात दिनांक २ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण



व लक्ष्मण शक्ती प्रसंग कथेचे आयोजन करण्यात आले आहे. साध्वी बालयोगिनी महंत ह भ प मुक्ताईनाथ माऊली यांची दररोज दुपारी एक ते चार वाजेपर्यंत श्रीमद् भागवत कथा होणार आहे. दरम्यान या सप्ताहात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भागवत कथा, हरिपाठ व रात्री हरी जागर असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. ज्ञानेश्वरी व्यासपीठ प्रमुख ह भ प बालाजी महाराज ठाकूर, संगीतमय साथ देण्यासाठी मृदंगाचार्य मनोजकुमार सिंगनगावकर, गायनाचार्य संतोष महाराज बितनाळकर, दिगंबर पांचाळ, राम महाराज ठाकूर, ज्ञानेश्वर देवकर, कृष्णा वडजे, पुंडलिक मंगलवाड, प्रमोद करडे, भजनी मंडळातील तुकाराम पेशरवार, किशन देवकर, पप्पू देवकर, आनंदा सिंगनवाड, गणेश वडजे, शिवाजी मंगरूळे, दिगांबर पांचाळ यांची संगीत साथ लाभणार आहे. दिनांक आठ फेब्रुवारी सायंकाळी सहापासून ते दिनांक नऊ फेब्रुवारी सकाळी सात वाजेपर्यंत लक्ष्मण शक्ती प्रसंग कथा होईल. तसेच दिनांक नऊ फेब्रुवारी सकाळी दहा वाजता साध्वी बालयोगीनी महंत ह भ प मुक्ताईनाथ माऊली यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व धार्मिक कार्यक्रमाच्या भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत दासगणू नगर, शिक्षक कॉलनी उमरी येथील समस्त गावकरी मंडळींनी केले आहे.

# नांदेडमध्ये आजपासून दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. ०२ फेब्रुवारी**

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातर्गत जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि ३ व ४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले असून या संदर्भात जिल्हा समाजकल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील दिव्यांग शाळेच्या सर्व मुख्याध्यापकांसह व्यवस्थापकीय अधीक्षक व समिती प्रमुखांनी या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेची जय्यत तयारी केली आहे.

३ डिसेंबर जागतिक दिनाचे औचित्य साधून दरवर्षी दिव्यांगाच्या शाळेतील विदयार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत घेण्यात येते.दिनांक ३ फेब्रुवारी रोजी दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा पोलीस कवायत मैदानात होणार आहेत. तसेच दिनांक ४ फेब्रुवारी रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी अभिजित राऊत, स्वामी रामानंद विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी किर्तिका सी.एम, श्रीमती दलजितकौर जज, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. संदिप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा राजकुमार मुक्कावार, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग लातूर अविनाश देवसटवार,सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग नांदेड शिवानंद मिनगिरे, जिल्हा माहिती अधिकारी, प्रविण टाके, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत व सांस्कृतिक कार्यक्रमात दिव्यांगाच्या अस्थिव्यंग, मूकबधिर, मतिमंद, अंध या प्रकारातील जवळपास ८५० मुले मुली सहभागी होणार आहेत. या दिव्यांग विदयार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हा समाजकल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी सर्व मुख्याध्यापक, व्यवस्थापकीय अधीक्षक, विविध समित्याचे प्रमुख व सदस्य यांच्या उपस्थितीत दिव्यांग विदयार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था, भोजन व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, मैदानाची व्यवस्था, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन या सह अनेक विषयायांचा तेरा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

# आदिवासी महिलांचा आज स्नेहमिलन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

देशातील अनेक मागास समाजापैकी एक पण स्वाभिमानी असलेली आदिवासी जमात भलेही स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनंतरही आर्थिकदृष्ट्या कमकुवत असेल परंतु सांस्कृतिक आणि नैसर्गिकदृष्ट्या मजबूत आहे. आदिवासी समाजात आजही मातृसत्ताक संस्कृती असून एकूण लिंग गुणोत्तराचा विचार करता महिलांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. याच समाजातील महिला माता सावित्री, माता जिजाऊ, माता रमाई यांचा वारसा जपत हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करून ३०० च्यावर महिलांना पुस्तकांचे वाण देणार आहेत. याप्रसंगी समाजातील प्रतिष्ठित महिलांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. शहरातील मालेगाव रोडवरील रेड्डी गार्डनमध्ये ३ फेब्रुवारी रोजी आंध आदिवासी महिला मेळावा,हळदी कुंकू व स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आदिवासी महिलांचे नृत्य,गायन, मूक अभिनय, भजन, खेळ व वक्तृत्व अशी अनेक कला गुणदर्शन, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

त्याच ठिकाणी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणि इतरही अनेक वस्तूंचे विक्रीसाठी स्टॉलही लावण्यात येणार असून ३०० आदिवासी महिला मेळाव्यात सहभागी होणार आहेत. सोमवारी सकाळी ११ पासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही विविध वस्तूंची विक्री होणार असून ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन आंध आदिवासी महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आदमपुरात हरिनाम सप्ताह व भागवत कथेला आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. ०२ फेब्रुवारी**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे सोमवार दि.०३ फेब्रुवारी पासून ४५ व्या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथेला प्रारंभ होत आहे. भागवताचार्य ह.भ.प.योगेश महाराज अग्रवाल वसमतकर यांच्या रसाळ वाणीतून नियमित दुपारी २ ते ५ प्रवचन ऐकता येणार आहे.समवेत ऑर्गन वादक संतोष महाराज, तबला वादक सोपान महाराज, झाँकीवाले बापू महाराज अमळनेरकर हे साथसंगत करणार आहेत. हा भक्तिरूपी सोहळा यशस्वी करण्यात सर्व गावकरी एकमनाने गुंतले आहेत. येथील अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा आदमपूर गाव परिसरात दरवर्षीप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण असते. दि.०३ फेब्रुवारी पासून क्रमाने ह.भ.प. व्यंकट महाराज एकलारकर, ह.भ.प. चंद्रकांत महाराज लाठीकर, वारकरी भूषण ह.भ.प. ज्ञानोबा माऊली महाराज सिंदगीकर, ह.भ.प.माधव गुरूजी वडगावे पांगरीकर, ह.भ.प.वासुदेव महाराज कोलंबीकर,ह.भ.प.गुरूराज महाराज देगलूरकर, ह.भ.प. योगेश महाराज गवंडगावकर, अखेर दि.१० फेब्रुवारी रोजी ह.भ.प.चांगदेव महाराज काकडे कंडारीकर यांच्या उपस्थितीत काल्याचे किर्तन हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

# नव्या घड्याळाचे काटे आता लवकरच फिरणार..!

## पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

जुना मोंढा येथील ऐतिहासिक टॉवरवरील घड्याळ बसविण्याची प्रक्रिया नांदेड वाघाळा महापालिकेने सुरु केली असून त्यासाठी संबंधित ठेकेदारांकडून लवकरच निविदा दरपत्रके मागविण्यात येणार असल्याची माहिती आहे. पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी ही घड्याळ बसविण्यासाठी मनपा नांदेडसह थेट मंत्रालयात धडक मारली होती. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

नांदेड शहरातील जुना मोंढा भागात शहराचे वैभव असलेल्या टॉवरवरील घड्याळ गेल्या अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत आहे.



मनपा उद्यान विभागाने २०१८ मध्ये नवीन घडी बसविली होती. परंतु ती बंद बडली. तेव्हापासून घड्याळ्याचे काटे स्थिर आहेत. ही घडी बसविण्यात यावी व शहराचे गतवैभव पुन्हा प्राप्त व्हावे यासाठी पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी गेल्या काही दिवसांपासून स्थानिक मनपा प्रशासनासह नगरविकास मंत्रालय आणि मुख्यमंत्र्यांना निवेदने सादर करून याकडे लक्ष्य वेधले होते. वागदरीकर यांच्या निवेदनाची दखल घेऊन मनपा आयुक्तांनी नांदेड-वाघाळा महापालिका उद्यान अधिक्षकांना नवीन घड्याळ बसविण्यासाठी आवश्यक त्या निविदा दरपत्रके मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्याच्या सूचना काही दिवसांपूर्वीच दिल्या आहेत. त्यामुळे टॉवरवरील घड्याळ बसविण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली असून पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याचे मानले जात आहे.

# पारसमल दर्डा यांची रेल्वे डिव्हिजन सदस्यपदी हॅट्रीक बिनविरोद्ध निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०२ फेब्रुवारी**

उमरी शहरातील प्रसिद्ध व्यापारी पारसमल दर्डा यांची हैद्राबाद रेल्वे डिव्हीजन सदस्य पदी पुनच्छ एकदा निवड झाली असून रेल्वे विभागात सदस्यपदी निवड होण्याची हॅट्रीक झाली आहे.



हैद्राबाद रेल्वे विभागाने पारसमल दर्डा यांचे उमरी रेल्वेस्टेशन सह विभागात मोडणाऱ्या विविध रेल्वेस्टेश समस्या संदर्भात महत्वाचे मुद्दे समोर करून जनतेच्या समस्याचे निवारण केले आहे दर्डा यांनी वेळो वेळी पदाचा उपयोग जनहितासाठी केल्याने यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांची दखल घेऊन हैदराबाद डिव्हिजनच्या रेल्वे डी. आर. यु. सी. सी. सदस्य पदी फेर निवड करण्यात आली आहे. त्यांची निवड झाल्याबद्दल खासदार प्राचार्य रवींद्र चव्हाण, राज्यसभा खा. अशोक चव्हाण, खा.अ डॉ. अजित गोपछडे, आ. राजेश पवार, माजी आ. प्रकाश पोकर्णा, उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर, भाऊसाहेब देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, माजी नगराध्या प्रविणभाऊ सारडा, नांदेड जिल्हा मधवर्ती बॅक संचालक कैलास देशमुख गोरठेकर, उमरी भाजपा नेते बापूसाहेब कौवडगावकर, प्रसिद्ध व्यापारी खाज्या सेठ , शिवसेना शिंदे गट तालुका प्रमुख सुभाष पेरेवार, शासकीय गुत्तेदार संजीव विठ्ठलराव सवई, शेतकरी पुरस्कृत नेते सुभाष देशमुख गोरठेकर (नाना), विष्णू पंडित, विष्णू अट्टल, अनिल दर्डा, बाबू राजा झंवर, महेश पंडित, श्यामसुंदर लापसेटवार, पत्रकार बी .व्ही चव्हाण, पी. जी. गिलचे , शेख हुसेन्नी , लक्ष्मीकांत देशमुख, प्रल्हाद हिवराळे, अब्दुल समद, अनिल सोनकांबळे, कैलास सोनकांबळे, साहेबराव तुरेराव, त्रिरत्न सवई, अशोक मामीडवार, गजानन श्रीरामवार, श्रीनिवास अनंतवार, विठ्ठल मुकावार बालाजी येरावार, न. पा वरिष्टीट लिपीक गणेश मदने, दासा शिंदे, नगसेवक प्र. सोनू वाघमारे, रतन खंदारे छावा राजेश जाधव तालुक्यातील सर्व साराजीक राजकीय संघटना , व्यापारी मित्रपरिवार उमरी रेल्वे स्टेशनचे सर्व कर्मचारी पत्रकार बंधू आदींनी पारसमल दर्डा यांच्या निवडी बद्दल अभिनंदनाचा वर्षाव करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत .

# मंदिराच्या उभारणी साठी पुढाकार घ्यावा : बिंगेवार

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०२ फेब्रुवारी**

समाज बांधव एक संघ राहवे, शिक्षणाचा ध्यास घ्यावा व प्रगती साधावी तसेच सर्वांच्या आर्थिक सहकार्याने मार्कंडेय मंदिराच्या उभारणी साठी पुढाकार घ्यावा असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष जगन्नाथ बिंगेवार यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जगन्नाथ बिंगेवार तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा. शंकरराव कुंटुरकर, प्रा. शंकर पवार आदि उपस्थित होते. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महर्षि मार्कंडेय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याच कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी व समाज संघटनेचे नवनियुक्त पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास पोशट्टी सब्बनवार, नरेश जिठ्ठावार, नरेश सब्बनवार, डॉ. अश्विनी सब्बनवार, राजेश्वर कनकमवार, साईनाथ बाबलीकर, राहुल सब्बनवार, अशोक पडकुटलावार यांच्या सह शहर व परिसरातील महिला व पुरुष उपस्थित होते.

# उपविभागीय कृषी अधिकारी राजकुमार रणवीर यांची भोकर येथे प्रक्षेत्र भेट

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ०२ फेब्रुवारी**

दि.२७ जानेवारी २०२५ रोजी भोकर येथील भोसी ताटकळवाडी बोरवाडी आमदारी वाडी व वाकद येथे उपविभागीय कृषी अधिकारी राजकुमार रणवीर तसेच मंडळ कृषी अधिकारी भोकर प्रमोद कद्रेकर यांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत ठिबक व तुषार ची तपासणी तसेच राष्ट्रीय अन्न व पोषण अभियानांतर्गत रब्बी गहू लागवड प्रात्यक्षिक यांची पाहणी केली.

त्यासोबतच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बराटे यांनी तालुका कृषी अधिकारी भोकर कार्यालयास भेट देऊन मा.मुख्यमंत्री यांच्या क्षत्रिय तसेच कार्यालयीन १०० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत कार्यालयीन तसेच क्षत्रिय कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना सूचना दिल्या तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रात्यक्षिके कृषी यांत्रिकीकरण योजना इत्यादी कामांची पाहणी केली यावेळी तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी याबाबत कृषी विभागाच्या योजना सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. आनंद रूमनवाड बोरगाव या शेतकऱ्यांनी त्यांच्या प्रक्षेत्रावर लागवड केलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पेरू पिकाच्या लागवडीची पाहणी केली तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर व पावर विडर याची तपासणी केली व सदरील अवजाराचे वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्यात यावे अशा सूचना दिल्या. सदरील भेटीदरम्यान कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना बाबत प्रक्षेत्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी प्रात्यक्षिक प्लॉटची पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे जेणेकरून त्यांचे आर्थिक स्थैर्य व उत्पादनात वाढ होईल अशा सूचना दिले तसेच पुढील आठवड्यामध्ये इतर मंडळातील विविध प्रक्षेत्रांना भेटी देण्यात येणार असण्याचे सांगितले.

# अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळ सिडको कार्यालयातील कामास विलंब : साटोटे

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०२ फेब्रुवारी**

नांदेड येथील सिडको कार्यालयातील मालमत्ता धारकांची कामे वेळेवर होत नसल्याने शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांनी सिडको प्रशासक गजानन साटोटे यांना विचारपुस करण्यात आली.

तेव्हा यापुढे येथील कामे प्रलंबित राहणार नाहीत असे आश्वासन सिडको कार्यालयाचे प्रशासक यांनी दिले. नांदेड सिडको कार्यालय येथील मालमत्ता धारकांचे व भोगवटदारांचे कामे वेळेवर होत नसल्याने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांनी प्रशासक गजानन साटोटे यांना धारेवर धरून जाब विचारण्यात आला.



सिडको येथीलअनेक लोकांचे कामे प्रलंबित असताना तुम्ही वेळेवर कामे का ? करत नाही. चार चार महिने एखाद्या कामासाठी मालमत्ता धारकांना कार्यालयाच्या चकर माराव्यात लागतात तेव्हा तुम्ही काय करता. असे अनेक प्रश्न उपस्थित करून प्रशासकास धारेवर धरले तेव्हा प्रशासक गजानन साटोटे यांनी सांगितले की या कार्यालयात पूर्वीपासूनच अपुरे कर्मचारी असल्याने व माझ्याकडे चार चार कामे पाहण्याची जबाबदारी वरिष्ठांनी दिली असल्यामुळे मला महिन्यातून काही दिवस तिकडे काही दिवस इकडे काम लागते. तेव्हा मला सारखे वेगवेगळ्या ठिकाणी दोन दोन दिवस कामे करत फिरावे लागते. त्यामुळे कामाला विलंब लागत असतो सदरील समस्या सोडविण्यासाठी मी वरिष्ठांना कर्मचारी वाढवण्या विषयी चर्चा करून सदरील प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करीन. सदरील कार्यालयीन कामकाजाची विचारपूस करने विनय गिरडे यांचे योग्येच असल्याचे ही सांगितले. तसेच या ठिकाणच्या दलाला मुळे इतर लोकांचे कामे प्रलंबित आहेत. मी माझ्याकडून कामे प्रलंबित राहू देत नाही. यापुढे दलालांना या कार्यालयात येण्यास आवर घालण्याचे आदेश मी दिले आहेत. अशी माहिती सिडकोचे प्रशासक साटोटे यांनी दिली.

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अगोदर सुविधा द्या मगच करांची वसुली करा : सतीश टोणगे

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२ फेब्रुवारी -**
नगर परिषदेने नागरिकांसाठी अगोदर मूलभूत सुविधा द्याव्यात आणि मगच करांची वसुली करावी, तसेच लावलेले दोन टक्के मासिक व्याज माफ करण्यात यावे, अशी मागणी सतीश टोणगे यांनी केली आहे.

गेल्या तीन ते चार महिन्यापासून बाजारपेठा थंड आहेत.व्यापारी वर्गाकडे ग्राहक नाही, तसेच न.प. कडून नागरिकांना मूलभूत सुविधाही मिळत नाहीत. शहरातील प्रत्येक भागात कचऱ्याचे ढिगारे आहेत. नाल्यांची साफसफाई होत नाही, घंट्या गाड्या फिरत नाहीत.

धनेगाव धरणात मुबलक पाणी साठा असतानाही पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांना भटकंती करावी लागत आहे. पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. अंधाराचे साम्राज्य आहे.

कसल्याही सुविधा उपलब्ध नसताना न.प.चे कर्मचारी मात्र रजाकारी पद्धतीने करांची वसुली करत आहेत.

मुख्याधिकारी यांनी शहरातील नागरिकांना अगोदर मूलभूत सुविधा द्याव्यात आणि मगच करांची वसुली करावी अशी मागणी माजी नगरसेवक सतीश टोणगे यांनी निवेदनाद्वारे करून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### मन्मथस्वामी जन्मोत्सव साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि.२ फेब्रुवारी -**
विरशैव-लिंगायत संप्रदायातील १६ व्या शतकातील संतश्रेष्ठ संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचा ४६४ वा जन्मोत्सव शिरूर अनंतपाळ शहरातील महात्मा बसवेश्वर चौक येथे दयानंद वंलाडे, बंडू शेटे व धनराज सरकाळे यांच्या वतीने जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी विजयकुमार संभाळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व आरती करून साजरा करण्यात आला. यावेळी शंकरराव बेंबळगे, भिमाशंकर सलगरे, बी.बी.शिंदाळकर, गुरुनाथ अचवले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, नियोजन सभापती संतोष शिवणे, सोमेश्वर तोंडारे, व्यंकट हांद्राळे, अमर देवंगरे, राजू शिवणे, शिवकांत संभाळे, गोपाळ हांद्राळे, आसिफ उजेड आदी ग्रामस्थ व भक्ती मंडळी उपस्थित होते.

### हरिश्चंद्र नमनगे यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि.२ फेब्रुवारी -**



हरिश्चंद्र सखाराम नमनगे यांचे अतिशय अल्प आजारात हृदयविकाराच्या झटक्याने दुपारी ३ वाजता निधन झाले. यांच्यावती अंत्यसंस्कार २ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. हे दैठणा येथील रामराव पाटील विद्यालयाचे संचालक होते. यांच्या पश्चात यांच्या कुटुंबात तीन मुले, पत्नी असा परिवार आहे.

### वाचन करणे हे काळाची गरज आहे : विनायक अहंकारी

**नळदुर्ग, दि.२ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसंत नगर नळदुर्ग येथे दप्तराविना शाळा उपक्रमांतर्गत वाचनाचे महत्व या विषयावर वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नळदुर्ग शहरात वाचन कट्टा उपक्रम राबविणारे, अभ्यासु व्यक्तिमत्त्व विनायक अहंकारी यांचे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. विनायक अहंकारी यांनी विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत, अनेक थोर पुरुषांचे उदाहरणे देऊन प्रत्येक विद्यार्थ्याने वाचन करावे, आपले आई,वडील आणि शिक्षक यांचा मान राखावा व त्यांना आयुष्यभर स्मरणात ठेवावे असा संदेश दिला. यावेळी विनायक अहंकारी यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेच्या विकासात योगदान देणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, शिक्षणप्रेमी नागरीक यांची माहिती सोनवणे यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार सोनवणे डी.एन. यांनी केले.

## शेती आणि शेतकऱ्यांसाठी नव्या संधी निर्माण करणारा अर्थसंकल्प : आ. संभाजी पाटील निलंगेकर




**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२ फेब्रुवारी -**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पातून शेती आणि शेतकऱ्यांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. उद्योजक, व्यावसायिक,तरुण अशा प्रत्येक घटकासाठी या अर्थसंकल्पाने काही ना काही दिले आहे, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

आ. निलंगेकर म्हणाले की, देशातील १०० जिल्ह्यांसाठी विशेष प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात आली आहे. तेलबिया उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखण्यात आले असून १०० टक्के माल खरेदी केली जाणार आहे. यातून शेतकऱ्यांना सुविधा मिळणार आहेत. या अर्थसंकल्पामुळे कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढणार असून असंख्य नव्या संधी निर्माण होणार असल्याचे ते म्हणाले.



मच्छीमारांना ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, युवा उद्योजकांसाठी कर्ज मर्यादा आणि वारंवारतेचा निकष वाढविणे हे महत्त्वपूर्ण निर्णय आहेत. स्टार्टअपसाठी कर्ज मर्यादा २० कोटी रुपयांची करण्यात आली असून पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी राज्यांना ५० वर्ष बिनव्याजी कर्ज योजनेचाही फायदा होणार आहे.

देशाला पुढे घेऊन जाणारा, सर्व समाजघटकांचा विचार करणारा हा अर्थसंकल्प आहे.यावर्षीच्या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न करमुक्त करून सरकारने सामान्यांना दिलासा दिला आहे. मध्यमवर्गीय, पगारदार, कष्टकरी यांच्याबाबत आखलेल्या धोरणामुळे सामान्यांच्या विकासाला गती येणार असल्याची प्रतिक्रियाही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केली.

## हिप्परगा ताड व सलगरा मड्डी येथे श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा ताड व सलगरा मड्डी येथे शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा उत्साहात संपन्न झाला.

प्रतिवर्षाप्रमाणे या ही वर्षी हिप्परगा ताड व सलगरा मड्डी येथे श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला असुन श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री. भावार्थ रामायणाचे हे दुसरे वर्ष होते शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता ग्रंथ वाचन व निरुपणास सुरुवात करण्यात आली.

तब्बल बारा तास हा सोहळा सुरू होता. श्री. भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय क्रमांक ४३ ते ४९ असे सात अध्याय ओव्या ११३५ याचे रात्रभर वाचन व निरूपण करण्यात आले.

या लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्यास परिसरातील तुळजापुर, उमरगा, कळंब, लातूर, सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, मंगळवेढा, परंडा, बार्शी, औसा, अक्कलकोट आदि तालुक्यातील ग्रंथ वाचक व सूचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सुरू केलेले ग्रंथ वाचन निरूपण सरविवार दि.२, फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता श्री लक्ष्मण सावचित्य झाल्या नंतर लक्ष्मण शक्ती सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे स्वयंशासन दिन व निरोप समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ फेब्रुवारी -**
उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये आज दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ कार्यक्रम मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून महंमद रफी शेख, ताज्योद्दीन सरवडीकर, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, धनराज तेलंग उपस्थित होते. शाळेत मुख्याध्यापक म्हणून ममता वरवटे व गौस शेख, तर उपमुख्याध्यापक म्हणून सृष्टी बिरादार महंमद व्हंताळे, पर्यवेक्षकपदी यासिन खैराटे यांनी काम पाहिले. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांना एक दिवस शाळा चालवण्याचा अनोखा व नाविन्यपूर्ण अनुभव मिळाला उत्कृष्ट अध्यापक म्हणून अक्षरा पवार यासिन खैराटे इसा उस्ताद सिफा शेख अरमान लदाफ या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप दिला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला घड्याळ भेट दिले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, सुमन साठे, कविता केदारे, सखुबाई चव्हाण, वनमाला वाले, सुनिता राठोड, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, शिल्पा चंदनशिवे, ममता गायकवाड, वर्षाराणी पाटील, संजय रूपाजी, सदानंद कुंभार, महंमद फसद शेख यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रहितासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या उर्जेचा वापर करावा : रोहित थोरात

### आलमला फार्मसीचा पुढाकार... राज्यस्तरीय १०व्या फार्मा व्हॉलीकपचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२ फेब्रुवारी -**
विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याची संस्कृती विश्वेश्वर संकुलाने उत्कृष्टपणे जोपासली आहे. यामुळे या मैदानावरील अनेक खेळाडू विविध स्पर्धेतून पदकं पटकावीत आहेत. महाविद्यालयीन जिवनात विद्यार्थ्यांनी वाईट सवयीपासून दूर रहावे, निरोगी रहावे आणि केवळ राष्ट्रहितासाठी आपल्या उर्जेचा वापर करावा, असे आवाहन जनरल सेक्रेटरी ऑफ महाराष्ट्र युथ ट्रेडीशनल असोशिएशन ऑफ इंडिया तथा फुटबॉल प्लेअर रोहित थोरात यांनी केले.

औसा तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज येथे आयोजित करण्यात आलेल्या दहाव्या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन फार्मा व्हॉली कप २०२५ चे उद्घाटन रोहित थोरात यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाच्या १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आधुनिक व सांस्कृतीक महाकुंभ मेळाव्यावर आधारीत सांघिक पारंपरिक नृत्य करुन आपली संस्कृती जपण्याचे काम केले. असेनमुद करुन विध्यार्थ्यांचे कौतुक केले. या स्पर्धेसाठी राज्यातून आलेल्या संघातील स्पर्धकांचे स्वागत करुन शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, लातूर येथील दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, डॉ. सचिन घोळवे, प्राचार्य नारायण



चाटे, प्रताप भोसले, प्राचार्य डॉ. कैलास कापसे, सय्य्द रहेमान, अमोल कुंभार, कृष्णा लोया व आदित्य बजाज, नसीर फुलारी जालना, अनिरुध्द बिराजदार, नितेश स्वामी, शिवाजी फावडे, संस्थेचे संचालक जयशंकर हुरदळे, विश्वनाथ निलंगेकर, विश्वनाथ बिराजदार, सरपंच विकास वाघमारे, उपसरपंच, इरफान मुलानी, विभागप्रमुख प्रविण साबदे, रेवणसिध्द बुक्का, मंगेश बिडवे, अंकुश बिडवे, संदेश माडे, प्रचार्या स्वाती कापसे, प्राचार्य योगेश माशाळकर व इतर मान्यवर उद्घाटनकार्यक्रमास उपस्थित होते. स्पर्धेत महाराष्ट्रातील ३९ संघानी सहभाग घेतला आहे.

प्रा.डॉ. सुरज मालपाणी व डॉ. सचिन हंगरगेकर यांनी सुत्रसंचालन केले तर स्पर्धेचे समन्वयक डॉ. प्रसाद कटारे, गोपाळ माळी, प्रा. दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, डॉ. अजय फुगटे, विकास मुगळे, किरण रोडगे, डॉ. मोहमद रईस, युवराज काटु, वागदरे एस.एस., गणेश गोसावी, कापसे विद्या, भागवत सोमवंशी, अजहर ठेंगाडे, गिरीशंकरभावले सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला.

## विलास हसबे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.२ फेब्रुवारी -**
राष्ट्रीय उत्सवाचे औचित्य साधून दैठणा जि.प. शाळेतील विलास हसबे सरांचा सेवापूर्ती गौरव सोहळा शिरूर अनंतपाळ य ठिकाणी शिक्षकी पेशातील ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर संपन्न झाला. यावेळी अनेक मान्यवराकडून हसबे यांचे पुष्पगुच्छ देऊन व शाल, श्रीफळ व अनेक प्रकारच्या शब्दसुमनाने सामाजिक राजकीय शैक्षणिक आर्थिक अशा अनेक क्षेत्रातील मान्यवराकडून स्वागत करण्यात आले.

अनेक माजी विद्यार्थ्याकडून या ठिकाणी विलास हसबे यांच्या बाबतीत भावना व्यक्त करण्यात




आल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दैठणा येथील शालेय समितीचे अध्यक्ष सदानंद पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पागे, गणपतराव मोरे यांनी स्थान भूषवले. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव पाटील यांच्याकडूनही या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती लावण्यात आली. शिक्षण उपसंचालक संभाजीनगर सुधाकरराव बानाटे, बी.टी. चव्हाण, बिडवे बी.एन., शिंदादाळकर जीएस., बालाजी शिंदे, सुधीर लखनगावे या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते या नात्याने प्रवीण जाहुरे यांच्याकडून हे काम पाहण्यात आले. याप्रसंगी बालूरे डी.टी., दैठणा गावचे सरपंच शेषराव कांबळे, ऊस्तुरगे व्ही.जी., घटकार एस.व्ही., मुख्याध्यापक आर.बी., मुळे विजयकुमार, सांभाळे, हिप्परगे बी.पी., उपसरपंच योगेश बिरादार, दिवेकर एम.के., हंद्राळे व्ही.जी., भारत सातपुते उपस्थिती होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण साकोळे, आनंत डोंगरे यांच्याकडून करण्यात आले. शेवटी परमेश्वर तोंडारे यांच्याकडून आभार प्रदर्शन करण्यात आले.

## आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये कॅम्पस टू कॉर्पोरेट कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ फेब्रुवारी -**
गडपाटी, धाराशिव येथील आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसी, मध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील नवीन रोजगाराच्या व व्यक्तिमत्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेचे विश्वस्त डॉ.प्रतापसिंहजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवशीय कॅम्पस टू कॉर्पोरेट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील जवळपास १५० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. यावेळी प्रा. विक्रांत नवले व प्रा. विजय सुतार उपस्थित होते.

## हासेगावातील वार्षिक स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२ फेब्रुवारी -**
हासेगाव येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित ज्ञानसागर विद्यालय व गुरुनाथप्पा बावगे इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनचे उद्घाटन औसा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, ओबीसी सेल भाजपाचे जिल्हाध्यक्ष सुधीर पोतदार, हैद्राबाद येथील नारायना इंग्लिश स्कूलचे प्राचार्य हरिश गौडा, शिवम बुके यांच्या हस्ते थाटात करण्यात आले.

लेझीम कवायतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक कालिदास गोरे यांनी प्रास्ताविक सादर केले. तर ज्ञानसागर विद्यालयाच्या वतीने शेंडगे यांनी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक शैक्षणिक प्रगतीचा लेखाजोखा सादर केला. वेताळेश्वर शिक्षण संस्था दर्जेदार शिक्षण कमी दरात शिक्षण देत आहे आणि भविष्यामध्ये सुद्धा देणार असे आश्वासन संस्था सचिव वेताळेश्वर बावगे यांनी दिले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धेत प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य, गीत गायन, सामाजिक जाण ठेवून समाज प्रबोधन करण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून एक पात्री नाटक सादर केला. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, उपाध्यक्ष जयदेवी बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालीका माधुरी बावगे, प्राचार्य नंदकिशोर बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, आनंद शेंडगे, मुख्याध्यापक कालिदास गोरे, प्राचार्य डॉ. नितीन लोणीकर, प्राचार्य डॉ. वीरेंद्र मश्राम, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्या योगिता बावगे, र्या कल्पना गिरी व हासेगाव पंचक्रोशी मधील सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे चेअरमन पोलीस पाटील इतर मान्यवर आणि संस्थेतील सर्व युनिटचे शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## बोरोळ येथे व्याख्यान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२ फेब्रुवारी -**
तालुक्यातील बोरोळ येथे श्रीनाथ कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. विवेक सौताडेकर यांचे शिक्षण यशस्वी जीवनाचा पासवर्ड या विषयावरील प्रेरणादायी व्याख्यान देत असताना विद्यार्थ्यांना व पालकांना शिक्षणाबद्दलचे महत्त्व पटवून दिले. ग्रामीण भागामध्ये सुद्धा दर्जेदार शिक्षण मिळते याची उदाहरण त्यांनी व्याख्यानाच्या माध्यमातून दिले.

याप्रसंगी दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व तसेच स्कॉलरशिप व इतर स्पर्धा परीक्षेतील घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान व सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच याप्रसंगी श्रीनाथ पब्लिक स्कूलच्या चीमुनी व विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर भारदस्त असे नृत्य सादर केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच प्रमोद मनोहर पाटील हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक जनसेवा सेवा भावी प्रतिष्ठान चे अध्यक्ष गोविंदराव भोपनीकर हे होते.

तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अरविंद भातंब्रे, सोनू डागवाले, ॲड. अजित बेळकोने, प्रदीप गौंड, प्राचार्य निलेश राजमाने, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, दीपक पाटील, ॲड. दयानंद देवणे, बालाजी देवणे, औदुंबर पांचाळ हे होते. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण पवळे, पूजा गायकवाड, भाग्यश्री पांचाळ, लक्ष्मण देवणे, आरती शेंडगे, राजश्री पाटील, प्रतीक्षा बालूरे, मीरा येणकूरे इ.परिश्रम घेतले.

## प्रजासत्ताक दिनी चित्ररथ सादरीकरणात निलंग्याच्या भूमिपुत्राचा बोलबाला

### १८ पैकी ५ चित्ररथांची केली निर्मिती... मागील ३ वर्षांत तब्बल ११ चित्ररथ केले तयार

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२ फेब्रुवारी -**
प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षी २६ जानेवारी रोजी राज्य शासनाद्वारे ध्वजसंचालन पार पडते. या कार्यक्रमात विविध शासकीय विभागाच्या योजनांविषयी माहिती असलेले चित्ररथ बनवून ते पथसंचलनात सहभागी केले जातात.

यामाध्यमातून विभागातील महत्वाच्या योजना हायलाईट केल्या जातात. यावर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त दादर येथील शिवाजी पार्कवर पार पडलेल्या पथसंचलनात १८ विभागांनी आपले चित्ररथ सादर केले. यातील ५ चित्ररथ हे लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील डांगेवाडी येथील शुभम हुलसुरे या कलाकाराने बनवले होते हे विशेष.




शुभम हा मुळचा निलंगयांचा रहिवासी आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण हे त्याचे मुळ गाव डांगेवाडी येथे झाले. त्यानंतर त्याने मुंबईतील प्रतिथयश अशा जे जे स्कुल ऑफ आर्टस मधून डिझाईनिंगचे उच्च शिक्षण घेतले आहे.

सध्या तो वडाळ्याच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना डिझाइनिंगचे धडे देतो. त्याची स्वताची डिझाइनिंग एजन्सी सुद्धा आहे. यामाध्यमातून तो फावल्या वेळेत महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांची कामे करतो. या क्षेत्रात काम करण्याचा त्याला तब्बल ५ वर्षांचा अनुभव आहे.

मागील ३ वर्षांत त्याने प्रजासत्ताक दिनाच्या पथसंचनलनासाठी विविध विभागांच्या ११ चित्ररथांची निर्मिती केली आहे.

यंदाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित पथसंचलनात एकूण १८ विभागांनी आपले चित्ररथ सादर केले. त्यातील ५ चित्ररथ एकट्या शुभम हुलसुरे याने डिझाईन केले होते.

यात गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या संकल्पनेवर आधारित मृदा व जलसंधारण विभागाचा चित्ररथ, भूजल सर्वेक्षण व अटल भूजल योजनेवर आधारित पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे चित्ररथ, महाज्योती ज्ञानदीप समतेचा या संकल्पनेवर आधारित इतर मागास बहूजन कल्याण विभाग, नवीन तंत्रज्ञान व कौशल्य युक्त महाराष्ट्र यावर आधारित कौशल्य व नाविन्यता विभागाचा चित्ररथ तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला त्यावर आधारित अभिजात मराठी दर्जा हा मराठी भाषा विभागाचा चित्ररथ यांचा समावेश होता.

लातूर

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उद्या संत गोपाळबुवा कारखान्याचा बॉयलर अग्नी सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
लातूर तालुक्यातील दिंडेगाव रोडवर मौजे रामेश्वर परिसरात शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी उभा राहत असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यासह भागधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याची चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार रामेश्वर परिसरात संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली आहे.

चालू हंगामात साखर कारखान्याचे गाळप सुरू व्हावे या दृष्टीने विविध अडचणीवर मात करत युद्धपातळीवर कारखान्याच्या उभारणीचे काम सुरू झाले असल्याचे चेअरमन राजेश कराड यांनी सांगीतले. येत्या ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा अध्यात्मिक क्षेत्रातील परमपूज्य विद्यानंद सागर महाराज गातेगाव, हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, हभप लालासाहेब नाना पवार, हभप बाबा महाराज बोराडे आणि जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### अण्णाभाऊ साठे विद्यालयात आरोग्य शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
लातूर येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विद्यालयात भाजपा महिला मोर्चाच्या सरचिटणीस सौ.निर्मलाताई कांबळे यांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबिर घेण्यात आले. यावेळी नांदेड रोड परिसरातील नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.
कार्यक्रमाच्या सुरूवातीला राजमाता जिजाऊ व शिक्षणाची मुहुर्तमेढ रचणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर, भाजपा जिल्हाध्यक्ष देविदास काळे, भाजपा प्रवक्ता प्रेरणाताई होणराव,महिला मोर्चा अध्यक्षा सौ.रागीणीताई यादव,महिला मोर्चा सरचिटणीस सौ.रत्नमालाताई घोडके यांच्या हस्ते पुजन करून दिप प्रज्वलीत करीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी लातूर शहर पुर्व भागातील नागरीकांचे रक्त तपासणी व आयुष्यमान कार्डचे मोफत देण्यात आले.यावेळी भारतीय जनता पार्टी सरचिटणीस रविभय्या सुडे,दिग्वीजय काथवटे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मंडल अध्यक्ष प्रमोद गुडे,सरचिटणीस सचिन मदने,पुर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे,वसिमभय्या पटेल,आतिष कांबळे,संतोष तिवारी महिला मोर्चा सरचिटणीस शोभाताई कोंडेकर, मंडळ अध्यक्षा जयश्री भुतेकर, सुमनश्री राठोड,सुनिता उबाळे,निर्मला आलापुरे तसेच पुर्व भागातील जेष्ठ नागरिक महिला,पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हमीभावाने सोयाबीन खरेदीवर प्रशासनाची करडी नजर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
जिल्ह्यात सुरु असलेल्या हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्रांवर अनियमितता होत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधी, शेतकऱ्यांनी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासमोर मांडल्या होत्या. त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी तालुकास्तरीय पथके गठीत करण्यात आली असून याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केले आहेत.
केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमतीने सोयाबीन खरेदीसाठी जिल्ह्यात नाफेडच्यावतीने चार संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे. विविध ५२ खरेदी केंद्रांच्या माध्यमातून जिल्ह्यात हमीभावाने सोयाबीन खरेदी केली जात आहे. या खरेदीमध्ये अनियमितता होत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधी, शेतकरी यांनी पालकमंत्री ना. भोसले लातूर दौऱ्यावर असताना त्यांच्याकडे मांडल्या. या तक्रारींची दखल घेवून पालकमंत्र्यांनी खरेदी केंद्रांच्या नियमित तपासणीसाठी पथके नेमण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी तातडीने कार्यवाही करून तालुकास्तरीय पथके गठीत करण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

### प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांना विद्यापीठाचा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर च्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांना गुरुवारी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा उत्कृष्ट युवा संशोधक प्राध्यापक पुरस्कार महाराष्ट्र राज्याच्या सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील आणि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह,प्रशस्तीपत्र व रोख दहा हजार रु. असे होते.
सदरील पुरस्कार विद्यापीठ परीक्षेत्रातील महाविद्यालयातील संशोधन करणाऱ्या युवा संशोधक प्राध्यापकाला दरवर्षी दिला जातो.डॉ.क्रांती सातपुते यांना फार्मसी क्षेत्रातील अध्यापनाचा १८ वर्षांचा अनुभव आहे.त्यांचे १५ पुस्तके,५२ रिसर्च पेपर,२ बुक चॅप्टर प्रकाशित झाले आहेत.त्यांच्या वैयक्तिक नावाने ३ पेटंट रजिस्टर्ड आहेत.त्यांची फार्मसी विद्याशाखेच्या अभ्यास मंडळावर फार्मसी विषयतज्ञ(बी.ओ.एस.)अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून निवड ही झाली आहे. त्या पीएचडी संशोधन मार्गदर्शक आहेत आणि त्यांच्या मार्गदर्शनात २२ हून अधिक विद्यार्थ्यांनी पी.जी.करिता मार्गदर्शन घेतलेले आहे.

## नियोजन केल्यास यश निश्चीत : डॉ. लहाने




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत लेखा व कोषागार दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वित्त विभागांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील विविध कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी यावेळी जीवनातील सकरात्मक दृष्टीकोन याविषयी मार्गदर्शन केले.

राज्य शासनाने १ फेब्रुवारी १९६५ रोजी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेची स्थापना केली. त्यामुळे हा १ फेब्रुवारी हा दिवस लेखा व कोषागारे दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने लातूर जिल्हा कोषागार कार्यालयाच्यावतीने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील होत्या. तसेच लातूर शहर महानगरपालिकेच्या मुख्य लेखा अधिकारी कांचन तावडे, सहायक संचालक वनिता देवरे, स्थानिक निधी लेखा परीक्षणचे प्रभारी सहायक संचालक श्याम कडेकर आदी उपस्थित होते.

कोणत्याही क्षेत्रात काम करताना वेळेला वेळेचे योग्य नियोजन आवश्यक आहे. शासकीय अथवा खासगी क्षेत्रात नोकरी करताना कार्यालयीन कामकाज आणि कौटुंबिक जीवन याचा योग्य मेळ घालून आयुष्य जगले पाहिजे. कार्यालयात सोपविण्यात आलेली कामे त्या-त्या वेळी पूर्ण करण्याला प्राधान्य द्यायला हवे. कार्यालय आणि कुटुंब यांच्यासाठी द्यावयाच्या वेळेचे योग्य नियोजन केल्यास कोणत्याही आपल्यावरील जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडणे शक्य होईल, असे डॉ. विठ्ठल लहाने यांनी यावेळी सांगितले.

तसेच आयुष्यात नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करावे. कार्यालय, तसेच कुटुंबात किरकोळ कारणांमुळे होणारे वाद टाळून दोन्ही ठिकाणी कुटुंब म्हणून काम केल्यास मानसिक ताणतणावाचे प्रसंग उद्भवणार नाहीत, असे त्यांनी सांगितले.

## प्रा. माने यांना राज्यस्तरीय 'कला सन्मान' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील संगीत विषयाचे प्रा. वैभव माने यांना आर्ट बिटस् फौंडेशन, पुणे यांच्याकडून 'राज्यस्तरीय कला सन्मान पुरस्कार' २०२४ प्रदान करण्यात आला.

आर्ट बिटस् फौंडेशन ही संस्था गेली २४ वर्षे सातत्याने कलाकारांना प्रोत्साहन तसेच उत्तम व्यासपीठ देण्यासाठी कार्यरत आहे. चित्र, शिल्प, संगीत, अभिनय, नृत्य, लोककला तसेच इतर सर्व कलाक्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांना आर्ट बिटस् फौंडेशन या संस्थेमार्फत पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. तरुण कलाकारांना प्रोत्साहन, प्रौढ कलाकारांचा सन्मान, तसेच कला, संगीत, नृत्य, चित्रपट, कला संस्था व या क्षेत्रात नवीन पिढीला आपला अनुभव देऊन घडवण्यासाठी प्रयत्न करीत असलेल्या गुरुतुल्य कलाकारांची व शिक्षकांच्या कार्याची दखल घेत पुढील प्रवासासाठी प्रोत्साहन व ऊर्जा देण्यासाठी हे कला पुरस्कार प्रदान करण्यात येतात. प्रा. वैभव माने हे प्रतिभावंत कलावंत आहेत. लातूर येथील पं. विठ्ठलरावजी जगताप यांचे ते शिष्य आहेत.

प्रा. वैभव माने यांनी शास्त्रीय संगीत, सुगम संगीत तसेच लोककला इत्यादी क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. त्यांनी स्टार प्रवाह या मराठी वाहिनीवरील 'मी होणार सुपरस्टार, आवाज महाराष्ट्राचा' या रियालिटी शो तसेच विविध वाहिन्यांवरील सांगीतिक कार्यक्रमातून आपल्या आवाजाची ख्याती सबंध महाराष्ट्रभर पसरवली आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात गुणवंताचा सत्कार करण्यात आला.
तत्त्वज्ञान विभागाच्यावतीने प्राचार्य डॉ. संजय गवई यांना भारतीय दलित पँथरचा पहिला राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्कार-२०२४ प्राप्त झाल्याबद्दल, स्कूल ऑफ ऑनलाइन एज्युकेशन करिता भारतीय दर्शन शास्त्राचा परिचय हा अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी प्रा. अलका चिकुर्डेकर यांची यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे निवड झाल्याबद्दल, राज्य पात्रता चाचणी परीक्षेत प्रा. रत्नाकर केंद्रे हे उत्तीर्ण झाल्याबद्दल आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा-२०२४ परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी सूर्यवंशी हिला एम. ए. तत्त्वज्ञान विषयात सुवर्णपदक मिळाल्याबद्दल त्यांचा तत्त्वज्ञान विभागातर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ. शितल येरुळे, प्रा. दयानंद बोयने, प्रा. श्रीराम देशपांडे, संशोधक विद्यार्थी जगन्नाथ कदम, सिद्धेश्वर घोडके, वैशाली दिवे आणि तत्त्वज्ञान विषयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## शेताच्या बांधावर जैविक प्रयोगशाळा उभारणी व्हावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
बियाणे आणि रासायनिक खतांवर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या खर्चामुळे शेतकऱ्यांच्या हाती काही लागत नाही. त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती बिकट बनते. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल तर त्यांचा बियाणे, खतांवरील खर्च कमी करणे आवश्यक आहे. यासाठी कृषि विभागाने शेताच्या बांधावर जैविक प्रयोगशाळा उभारणीचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देवून त्यांना घरीच बीज प्रक्रिया, जैविक खते, कीड नियंत्रक सापळे निर्मितीचे प्रशिक्षण द्यावे, अशा सूचना कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश पाटील यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात शुक्रवारी आयोजित विविध शासकीय विभागांच्या आढावा सभेत ड. हेलोंडे पाटील बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संगमेश्वर बदनाळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, जिल्हा कौशल्य विकास सहायक आयुक्त बालाजी मरे, कृषी उपसंचालक महेश क्षीरसागर, जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात उन्हाळ्यात पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांना अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे ७ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील गायरान जमिनींवर चारा लागवड करण्यासाठी कृषी, पशुसंवर्धन विभागाने पुढाकार घ्यावा. पहिल्या टप्प्यात प्रत्येक तालुक्यातील किमान ५ एकर गायरान जमिनीवर चारा लागवड करावी. टेकडी, डोंगराळ भागातही चारा लागवडीसाठी प्रयत्न करावेत, असे ॲड. पाटील यांनी सांगितले. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे आहे, त्याच्यासाठी राबविण्यात येत असलेल्या शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे असे ते शेवटी म्हणाले.

## दोन महिला सोनसाखळी चोर अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळसूत्र आणि गंठण चोरणाऱ्या दोन महिला चोरांना अटक करून त्यांच्याकडून चोरलेल्या ४०.५ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यासह १ लाख ३३ हजार १९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातून चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांमार्फत जिल्ह्यातील विविध गुन्हेगारांची माहिती एकत्र करून तपास सुरू होता.

दरम्यान, चोरलेले सोन्याचे दागिने विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन महिला रेणापूर नाका ते गरुड चौक रोडवर फिरत असल्याची माहिती शुक्रवारी पथकाला मिळाली. पथकाने तत्काळ तेथे पोहोचून संशयित स्वाती उमाकांत तपसाळे (वय ३२) आणि महादेवी सर्जेराव देडे (वय ३४, दोघीही रा. जयनगर, लातूर) यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी करण्यात आली. मागील काही महिन्यांपासून लातूर शहरासह व जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील बस स्थानकामध्ये गर्दीचा फायदा घेऊन, बसमधून चढ-उतार करणाऱ्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण चोरल्याची त्यांनी कबुली दिली.



त्यांच्याकडील चोरलेल्या ४०.५ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यासह १ लाख ३३ हजार १९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोघींना अटक करून गांधी चौक पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. यातून औसा पोलीस ठाण्याची मंगळसूत्र चोरीचे २, गांधी चौक व निलंगा पोलीस ठाण्यातील प्रत्येकी १ असे चार गुन्हे उघडकीस आले. या चोरट्यांकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, राजेश कांचे, तुळशीराम बरुरे, गोविंद भोसले, महिला पोलीस अंमलदार हिंगे, चालक पोलीस अंमलदार चंद्रकांत केंद्रे यांनी ही सेवा बजावली.

## तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाचे आज वार्षिक स्नेहसंमेलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
अंबिका बहुउद्देशीय महिला मंडळ, रोहिणा संचलित येथील संत ज्ञानेश्वरनगरातील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाच्या उडान-२०२५ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे दि. ३ फेब्रुवारी रोजी मार्केट यार्डातील दगडोजीराव (दादा) देशमुख सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते दुपारी ३ वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सौदागर तांदळे यांची तर तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी आमदार विक्रम काळे यांना शिक्षण क्षेत्रातील विशेष सेवा योगदान व उपक्रमशीलता मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. उपस्थित राहावे, असे आवाहन तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे, तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले आहे.

## अर्थसंकल्प:सत्ताधाऱ्यांसाठी दिलासादायक तर विरोधकांसाठी निराशाजनक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
निर्मला सीतारामन यांनी शनिवारी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला आहे. यात विविध क्षेत्रांसाठी अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. या अर्थसंकल्पाबाबत लातूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. सत्ताधाऱ्यांसाठी दिलासादायक तर विरोधकांसाठी हा निराशाजनक अर्थसंकल्प आहे.

### अर्थसंकल्पाबाबत लोकप्रतिनिधींच्या प्रतिक्रिया

#### बेरोजगार आणि कष्टकऱ्यांचा भ्रमनिरास

उद्योग वाढीला चालना नाही, शेती उत्पादन आणि शेतीमालाचे भाव वाढवून देण्यासाठी कोणतेही नियोजन नाही, महागाई कमी करण्यासाठीही कोणत्याही उपायोजना नसलेला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सादर केला. यामुळे सामान्य नागरिक, कष्टकरी, शेतकरी, बेरोजगार युवक यांची या सरकारने घोर निराशा केली आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान सर्वसामान्यांना भरघोस आश्वासने देऊन सत्तेवर आलेल्या सरकारने या जनतेचा आता विश्वासघात केला. मुठभर उद्योगपतींच्या हितांचे रक्षण करणारे सरकार अशी पूर्वीपासूनच या सरकारची प्रतिमा आहे. या अर्थसंकल्पानंतर ती आणखीन गडद झाली आहे. नोकरदार वर्गासाठी आयकर स्लॅबमध्ये काही प्रमाणात सूट दिल्याचे दाखवले असले तरी जीएसटी व इतर करातून या वर्गाच्या खिशातून अधिकचे पैसे काढून घेण्याचे नियोजन केले आहे.

**- अमित देशमुख**
आमदार, लातूर शहर

#### शेती आणि शेतकऱ्यांसाठी नव्या संधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पातून शेती आणि शेतकऱ्यांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. उद्योजक, व्यावसायिक, तरुण अशा प्रत्येक घटकासाठी या अर्थसंकल्पाने काही ना काही दिले आहे. देशातील १०० जिल्ह्यांसाठी विशेष प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात आली आहे. तेलबिया उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखण्यात आले असून १०० टक्के माल खरेदी केला जाणार आहे.

सर्व समाजघटकांचा विचार करणारा हा अर्थसंकल्प आहे. मध्यमवर्गीय, पगारदार, कष्टकरी यांच्याबाबत आखलेल्या धोरणामुळे सामान्यांच्या विकासाला गती येणार आहे.

**- संभाजी पाटील निलंगेकर**
आमदार, निलंगा

#### शेतकऱ्यांसह मध्यमवर्गीयांना दिलासा

अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला आत्मनिर्भर्तेकडे घेऊन जाण्यावर भर दिला असून क्रेडीट कार्डची मर्यादा तीन लाखांहून पाच लाखापर्यंत करण्याची घोषणा करून शेतकऱ्यांना त्याचबरोबर बारा लाखापर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करून मध्यमवर्गीयांसह नोकरदारांना दिलासा देणारा पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचा अर्थसंकल्प जाहीर झाला आहे.

या अर्थसंकल्पात शेती, उत्पादन, रोजगार, सूक्ष्म मध्यम आणि लघुउद्योग, ग्रामीण भागाचा विकास आणि संशोधन या दहा विशेष क्षेत्रांवर भर दिला आहे. महिलांना उद्योग वाढीसाठी प्रशिक्षण, मार्केटिंग आणि सरकारी योजनाशी जोडण्याची संधी दिली जाणार असून एस. सी. आणि एस. टी. प्रवर्गाच्या पाच लाख नव्या महिला उद्योजकांसाठी दोन कोटी रुपये मुदतीचे कर्ज मिळणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशहित आणि देशातील सर्वसामान्यांना डोळ्यांसमोर ठेवून अर्थसंकल्प जाहीर केला आहे, याचे स्वागत आहे.

**- रमेश कराड**
आमदार, लातूर ग्रामीण

#### मध्यमवर्गीय आणि गरिबांना दिलासा

या अर्थसंकल्पानुसार यापुढे स्टँडर्ड डिडक्शनसह १२.७५ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त असणार आहे. याचा फायदा देशातील लाखो मध्यमवर्गीय करदात्यांना होणार आहे. लवकरच नवीन इनकम टॅक्स कायदा सादर करण्यात येणार असून एकूणच इनकम टॅक्स प्रणालीत आमूलाग्र सुधारणा होणार आहेत. सध्या 'एआय' तंत्रज्ञानामुळे जगापुढे मोठ्या संधी आणि आव्हाने एकाच वेळी उभ्या राहिल्या आहेत. शिक्षण क्षेत्रासाठी AI Center of Excellence (AI CoE) स्थापित करण्याचा कालसुसंगत निर्णयही घेण्यात आला आहे. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. वरील मुद्द्यांसह गोरगरिबांना आणि मध्यमवर्गीयांना दिलासा देणारे तसेच विकसित भारताच्या महत्त्वाकांक्षेला बळकटी देणारे अनेक दिलासादायक निर्णय अर्थसंकल्पात घेण्यात आले आहेत. यामुळे विकसित भारत निर्माण करण्यास मदत होणार आहे.

**- अभिमन्यू पवार**
आमदार, औसा मतदारसंघ

#### 'सब का विकास' धोरणाला फाटा देणारा अर्थसंकल्प

'सब का साथ सब का विकास', हे सरकारचे धोरण आहे. पण प्रत्यक्षात सरकार सर्वांच्या विकासावर बोलत नाही.

आजचा अर्थसंकल्पही त्याच पध्दतीचा होता. मुठभर उद्योगपतींचाच विकास साधण्यावर सरकारचा कायम भर राहिला आहे.

त्यामुळे महागाई कमी होताना दिसत नाही. पेट्रोल, डिझेलचे दर गगनाला भिडले आहेत. घरगुती गॅसचे भाव वाढतच आहेत. यामुळे सर्वसामान्य जनतेचे जगणे अवघड होत आहे. याकडे केंद्र सरकारचे लक्ष नाही. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करू, अशी घोषणा भाजपने केली होती. अद्याप ही घोषणा पूर्ण केली नाही. वाढत्या महागाईला आळा घालण्यात सरकार अपयशी ठरत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी यंदाचा अर्थसंकल्प निराशादायक आणि अपेक्षाभंग करणारा असाच आहे.

**- धीरज देशमुख**
माजी आमदार तथा सरचिटणीस, प्रदेश काँग्रेस कमिटी

## 'अभाविप'ची कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ फेब्रुवारी -**
अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) दरवर्षी महाविद्यालयीन कार्यकारिणीची निवड करत असते. त्यानुसार, दयानंद विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषद कार्यकारिणीची घोषणा अभाविप लातूर महानगर मंत्री तेजुमई राऊत व महानगर सहमंत्री नरेंद्र ठाकूर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी दीपक यादव यांची निवड करण्यात आली असून, मंत्रीपदाची जबाबदारी किरण शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. उपाध्यक्ष म्हणून प्रसाद हलकंचे आणि अमित जाधव, तर सहमंत्री म्हणून प्रथमेश राठोड आणि प्रतीक्षा लोहकरे व संपर्क प्रमुख पदी प्रसाद केदार यांची नियुक्ती करण्यात आली.कार्यक्रमात अभाविपचे महानगर सहमंत्री नरेंद्र ठाकूर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.